म. ग्रं. सं. ठाणें
विषय
सं. नं. ३८२.

ग्रंथमाला : पुस्तक ३
ठाणें.

# ज्ञानदेव

( ..., ग्रंथ व तत्त्वज्ञान )

लेखक

शंकर वामन दांडेकर, एम. ए.
तत्त्वज्ञानविषयाचे अध्यापक, सर परशुरामभाऊ कॉलेज, पुणें

REFBK-0004616

शके १८५४ ] किंमत १२ आणे [ इ. स. १९३२

निबंध

मराठी ग्रंथ संग्रहालय,
स्थळ प्रत
सं. नि नं. ८३०
ता. २५।१।८५
ठाणे.

मराठी ग्रंथ संग्रहालय
नोंद नं. ७१८
ठाणे.

लोकशिक्षण-लघुग्रंथमाला : पुस्तक ३

# श्रीज्ञानदेव

## ( चरित्र, ग्रंथ व तत्त्वज्ञान )

मराठी ग्रंथ संग्रहालय
स्थळ प्रत
सं.......... नं...........
ता..............
ठाणें.

लेखक

शंकर वामन दांडेकर, एम्. ए.

तत्त्वज्ञानविषयाचे अध्यापक, सर परशुरामभाऊ कॉलेज, पुणें

REFBK-0004616
ग्रंथ संग्रहालय ठाणे
४६१६
पुणें

शके १८५४ ] किंमत १२ आणे [ इ. स. १९३२

संपादक व प्रकाशक : गणेश गंगाधर जांभेकर
'लोकशिक्षण–लघुग्रंथमाला'
सदाशिव पेठ, पुणें

१९५१

" अणुभ्यश्च महद्भ्यश्च शास्त्रेभ्यः कुशलो नरः ।
सर्वतः सारमादद्यात् पुष्पेभ्य इव षट्पदः ॥ "

मुद्रक : गणेश काशिनाथ गोखले
सेक्रेटरी, श्रीगणेश प्रिंटिंग वर्क्स
४९५–४९६ शनिवार पेठ, पुणें

मराठी ग्रंथ संग्रहालय
स्थळ प्रत
सं. ........ नं. ........
ता. ........
ठाणे.

“ हें सारस्वताचें गोड । तुम्हींच लाविलें जी झाड ।
तरी आतां अवधानामृतें वाड । सिंपोनि कीजो ॥ ”

ज्ञा. अ. ११।१९

**कै. गुरुवर्य ह. भ. प. विष्णुबोवा जोग**
**यांच्या चरणीं**
**सप्रेम व सादर समर्पण**

ग्रंथकर्ता

# संदर्भग्रंथ

**ज्ञानदेवांचे ग्रंथ**

(१) ज्ञानेश्वरी–संपादक व प्रकाशकः ह. भ. प. वंकटस्वामी
(२) अमृतानुभव ,, श्रीनानामहाराज साखरे
(३) चांगदेवपासष्टी ,, ,,
(४) अभंग ,, त्र्यं. ह. आवटे
(५) ज्ञानेश्वरवचनामृत ,, प्रो. रा. द. रानडे, एम्. ए.

**नामदेवांचे अभंग**

(१) आदि (२) तीर्थावळि (३) समाधि [ सकलसंतगाथा-आवटे ]

**ज्ञानदेवांचे चरित्रकार**

(१) निरंजन माधव–' ज्ञानेश्वरविजय '
(२) कै. ह. भ. प. श्रीपतबोवा भिंगारकर–
('चरित्र व 'ज्ञानदेव–नामदेवकालनिर्णय')
(३) श्री. ल. रा. पांगारकर
(४) ,, ज. र. आजगांवकर

**ज्ञानदेवविषयक लेख व चर्चा**

(१) कै. वि. का. राजवाडे ( ज्ञानेश्वरी-प्रस्तावना )
(२) श्री. आबा चांदोरकर ( भा. इ. सं. मंडळ अहवाल )
(३) ह. भ. प. 'पांडुरंगशर्मा' ( चित्रमय जगत्, केसरी )
(४) कै. 'भारद्वाज' ( विविधज्ञानविस्तार, 'इंडियन् इंटरप्रिटर' )

**इतर ग्रंथ**

(१) य. खु. देशपांडे–महानुभावीय वाङ्मयाचा इतिहास
(२) कै. वि. ल. भावे–महाराष्ट्र सारस्वत
(३) C. V. Vaidya–*History of Mediaeval India*
(४) *Ṣhiva-Sutras* ('Kashmir Sanskrit Series)

# प्रस्तावना

—:०:—

मराठीच्या नगरींत थोर कवि, महातत्त्वज्ञ व साधुश्रेष्ठ म्हणून ज्यांची गेलीं सहाशें वर्षें प्रसिद्धि आहे अशा श्रीज्ञानदेवांचीं अनेक लहानमोठीं मराठीं चरित्रें यापूर्वींच छापून निघालीं आहेत. तथापि यांपैकीं बहुतेक चरित्रग्रंथ चरित्रकथनासच मुख्यत्वें वाहिलेले आहेत. प्रस्तुत पुस्तकांतहि चरित्रभाग आहेच; परंतु त्याबरोबरच ज्ञानदेवांचे ग्रंथ, कवित्व व तत्त्वज्ञान यांचाहि ऊहापोह यांत केला आहे, हा या प्रयत्नाचा विशेष होय. मात्र '**लोकशिक्षण-लघुग्रंथमालें**'तील हें एक पुस्तक असल्यामुळें वरील विषयांचा प्रपंच येथें फारच थोडक्यांत आटपावा लागला. तसेंच पुस्तक सर्वसामान्य वाचकवर्गाकरितां असल्यानें शास्त्रीय परिभाषा शक्य तेवढी कमी केली आहे. सारांश, या प्रयत्नाचा उद्देश ज्ञानदेवांचें चरित्र, ग्रंथ व तत्त्वज्ञान यांच्याशीं सामान्य वाचकांचा स्थूल परिचय होऊन त्यांची ज्ञानदेवांच्या मूळ ग्रंथांकडे प्रवृत्ति व्हावी हा आहे; आणि तो कितपत सिद्धीस गेला आहे हेंहि त्यांनींच ठरवावयाचें आहे.

प्रस्तुत लघुग्रंथ या स्वरूपांत आज जो बाहेर पडत आहे त्याचें बरेंचसें श्रेय '**लोकशिक्षणा**'चे विद्वान् व साक्षेपी संपादक श्री. जांभेकर यांस देणें अवश्य आहे. त्यांच्या सूक्ष्म व चिकित्सक दृष्टीची मदत न मिळती तर सांप्रत राहिले असतील त्यापेक्षां कितीतरी अधिक दोष यांत राहिले असते यांत शंका नाहीं. अर्थात् श्री. जांभेकर यांनीं जें मनोभावें साहाय्य केलें त्याबद्दल लेखक त्यांचा अतिशय ऋणी आहे. पुस्तकाची सूचि करून दिल्याबद्दल लेखकाचे तरुण स्नेही पं. नारायणशर्मा यांचाहि तो आभारी आहे. शेवटीं प्रस्तुत लघुग्रंथ तयार होण्यास बराच विलंब झाला याबद्दल वाचकांची क्षमा मागून त्यांची रजा घेतों.

शं. वा. दांडेकर

# अनुक्रमणिका

—o—


| | | | |
|---|---|---|---|
| प्रकरण | १ | श्रीज्ञानदेवकालीन महाराष्ट्राची लोकस्थिति | १ |
| ,, | २ | गुरुसंप्रदाय व कुलपरंपरा | २८ |
| ,, | ३ | जन्म, कर्म व समाधि | ४७ |
| ,, | ४ | ज्ञानदेवांची ग्रंथरचना | ६७ |
| ,, | ५ | ज्ञानदेवांचें कवित्व | ८० |
| ,, | ६ | ज्ञानदेवांचें तत्त्वज्ञान व अध्यात्म | ९६ |
| ,, | ७ | उपसंहार | ११७ |

मराठी ग्रंथ संग्रहालय
स्थूळ प्रत
सं. ...
ता. ...
मराठी ग्रंथ संग्रहालय
नोंद नं. ...

# श्रीज्ञानदेव

## चरित्र, ग्रंथ व तत्त्वज्ञान

" तैसें हारपलें आपणपें पावें । तें संतांतें पाहतां गिंवसावें ।
म्हणोनि वानावे ऐकावे । तेचि सदा ॥ "

—ज्ञानेश्वरी अ. १८, ओ. ४००

## प्रकरण पहिलें

### श्रीज्ञानदेवकालीन महाराष्ट्राची लोकस्थिति

महाराष्ट्रांतील सर्व साधुसंत ' ज्ञानियांचा राजा ' म्हणून ज्यांच्या आध्यात्मिक प्रभुत्वास गौरवितात, लक्षावधि प्रेमळ वारकरी ' ज्ञानोबा माउली ' या नांवानें ज्यांचा नित्य जयघोष करितात, जुने नवे रसज्ञ पंडित ज्यांच्या ' ज्ञानदेवी ' ऊर्फ ' ज्ञानेश्वरी ' ग्रंथास समस्त महाराष्ट्र वाङ्मयांत ' काव्यां रावो ' म्हणून शिरसावंद्य मानतात, आणि त्याच्याबरोबरच ' अमृतानुभव ' रूप श्रेष्ठ तत्त्वज्ञान प्रकट करून ज्यांनीं उत्तमापासून अंत्यजापर्यंत सर्वांचा सारखाच उद्धार करणाऱ्या भागवतधर्ममंदिराचा पाया रचिला, असे लोकोत्तर संत, कवि, ज्ञानी व धर्मप्रवर्तक श्रीज्ञानदेव ऊर्फ ज्ञानेश्वर यांस महाराष्ट्राच्या धार्मिक व वाङ्मयात्मक इतिहासांत गेलीं सहाशें वर्षें अग्रपूजेचा मान लाभला आहे हें निर्विवाद होय. अर्थात् अशा महापुरुषाचें चरित्र व कार्य प्रत्येक महाराष्ट्रियास स्थूलतः तरी अवगत असणें अगत्याचें असल्यामुळें तें यथामति निवेदन करण्याचा प्रस्तुत अल्पस्वल्प प्रयत्न करण्यांत येत आहे.

कोणत्याहि श्रेष्ठ पुरुषाच्या कार्यांची थोरवी यथार्थपणें लक्षांत येण्याकरितां तत्कालीन एकंदर परिस्थिति प्रथम लक्षांत घेणें अवश्य आहे. थोर पुरुष कोणत्याहि देशांत व कालांत जन्मास आले तरी ते थोरच; तथापि थोर पुरुषांच्या कार्यानें त्या त्या कालीं जें विशिष्ट रूप धारण केलें त्यास तत्कालीन परिस्थिति बऱ्याच अंशानें कारणीभूत नव्हती असें म्हणतां येणार नाहीं. तत्त्वज्ञानाच्या अथवा सामाजिक सुधारणेच्या इतिहासांत दोन्ही प्रकारचीं उदाहरणें आढळून येतात. एखादा श्रेष्ठ तत्त्वज्ञ किंवा समाजसुधारक अशा प्रकारचीं तत्त्वें समाजापुढें मांडतो कीं, तीं तत्कालीन समाजाच्या प्रगतीस आवश्यक असतात; व समाजहि त्या तत्त्वांची किंमत ओळखून त्यांचा अंगीकार करावयास तयार असतो. उलट कित्येक वेळां अशी गोष्ट घडते कीं, एखादा तत्त्वज्ञ वा समाजसुधारक जे विचार प्रकट करितो ते पचविण्यास तत्कालीन समाज असमर्थ असतो; व त्यामुळें तो श्रेष्ठ पुरुष आपल्या काळीं मान पावण्याच्या ऐवजीं लोकनिंदेसच अधिक पात्र होतो. परंतु थोर लोकांचा थोरपणा हा कांहीं सर्वांशीं कालमर्यादित नाहीं. कालांतरानें समाजाची प्रगति होऊन टाकून दिलेल्या तत्त्वांचाच समाज अंगीकार करतो व एके वेळीं तिरस्कारिलेल्या व्यक्तीलाच डोक्यावर घेतो. तात्पर्य, समाजाकडून थोर पुरुष मान पावो वा अपमान पावो, त्याच्या कार्याचें महत्त्व आपणांस जाणून घ्यावयाचें तर तो पुरुष ज्या देशांत होऊन गेला त्या देशांतील त्या काळची राजकीय, धार्मिक व सामाजिक स्थिति कशी होती याचें प्रथम पर्यालोचन केलें पाहिजे.

श्रीज्ञानदेव यांची कामगिरी धार्मिक, तत्त्वज्ञानात्मक व वाङ्मयात्मक अशी त्रिविध आहे. तेव्हां ज्ञानदेवांच्या पूर्वी व प्रत्यक्ष त्यांच्या काळीं धर्म, तत्त्वज्ञान व वाङ्मय यांसंबंधीं काय स्थिति होती हें सांगणें तर अवश्य आहेच; परंतु तत्कालीन देशस्थितीचाहि थोडक्यांत उल्लेख करणें अपरिहार्य आहे. कारण एखादी व्यक्ति राजकीयपरिस्थितिनिरपेक्ष आपली नैतिक, धार्मिक अथवा पारमार्थिक उन्नति करून घेऊं शकेल; परंतु समाजाचें

धार्मिक, वाङ्मयात्मक व राजकीय जीवन एकत्र निगडित झालेलें असतें. म्हणून धार्मिक व वाङ्मयात्मक इतिहासाबरोबर राजकीय इतिहासाकडेहि लक्ष पुरविणें अवश्य आहे. यास्तव आपण ज्ञानदेवकालीन राजकीय स्थितीचें प्रथम थोडक्यांत निरीक्षण करूं.

आपल्याकडील साधुसंतांचा इतिहास लिहिणाऱ्याच्या मार्गांत सामान्यतः जी एक नेहमी धोंड असते, ती सुदैवानें ज्ञानदेवांच्या चरित्रलेखकाच्या मार्गांत नाहीं. आपले साधुसंत 'हा अमुका ऐसी नोहावी। सोंचि लोकां' या वृत्तीचे असल्याकारणानें ते आपल्या व्यावहारिक जीवनवृत्तान्ताबद्दल आपल्या ग्रंथांतून फारसा उल्लेख करीतच नाहींत. यामुळें त्यांचा काळ ठरविणें हें पुष्कळ वेळां अत्यंत दुर्घट होऊन बसतें. परंतु प्रस्तुत अडचण ज्ञानेश्वरीच्या कालासंबधानें तरी ग्रंथाच्या शेवटच्या ओवीनें दूर झाली आहे. ती ओवी येणेंप्रमाणें:—

> "शके बाराशतें बारोत्तरें। तैं टीका केली ज्ञानेश्वरें।
> सच्चिदानंदबाबा आदरें। लेखकु जाहला॥" अ. १८।१८१०

ही ओवी कोणाची यासंबंधीं कदाचित् मतभेद असूं शकेल व आहेहि. परंतु या ओवींत ज्ञानेश्वरीचा जो काल दिला आहे, तो ज्ञानेश्वरीलेखनाचा काल आहे याविषयीं मात्र दुमत नाहीं. प्रस्तुत ओवीवरून ज्ञानेश्वरी ग्रंथ शके १२१२ म्हणजे इ. स. १२९० मध्यें लिहून पूर्ण झाला ही गोष्ट निर्विवाद असून ज्ञानदेवांसंबंधीं इतर जो वृत्तांत प्रसिद्ध आहे त्यावरून त्यांचा जन्म व निर्याण हीं तेराव्या शतकांत झालीं ही गोष्टहि निश्चित आहे. तेव्हां तेराव्या शतकाच्या उत्तरार्धाच्या सुमारास महाराष्ट्राची राजकीय, धार्मिक व वाङ्मयात्मक स्थिति कशी होती तें आपण आतां पाहूं.

## राजकीय स्थिति

ज्ञानदेवांच्या पूर्वीच 'महाराष्ट्र' देशास त्या नांवानें व संस्कृतीनें स्वतंत्रपणें संबोधिलें जाण्याइतकें विशिष्टत्व प्राप्त झालें होतें; व खुद्द त्यांच्या

कोणत्याहि श्रेष्ठ पुरुषाच्या कार्याची थोरवी यथार्थपणें लक्षांत येण्याकरितां तत्कालीन एकंदर परिस्थिति प्रथम लक्षांत घेणें अवश्य आहे. थोर पुरुष कोणत्याहि देशांत व कालांत जन्मास आले तरी ते थोरच; तथापि थोर पुरुषांच्या कार्यानें त्या त्या कालीं जें विशिष्ट रूप धारण केलें त्यास तत्कालीन परिस्थिति बऱ्याच अंशानें कारणीभूत नव्हती असें म्हणतां येणार नाहीं. तत्त्वज्ञानाच्या अथवा सामाजिक सुधारणेच्या इतिहासांत दोन्ही प्रकारचीं उदाहरणें आढळून येतात. एखादा श्रेष्ठ तत्त्वज्ञ किंवा समाजसुधारक अशा प्रकारचीं तत्त्वें समाजापुढें मांडतो कीं, तीं तत्कालीन समाजाच्या प्रगतीस आवश्यक असतात; व समाजहि त्या तत्त्वांची किंमत ओळखून त्यांचा अंगीकार करावयास तयार असतो. उलट कित्येक वेळां अशी गोष्ट घडते कीं, एखादा तत्त्वज्ञ वा समाजसुधारक जे विचार प्रकट करितो ते पचविण्यास तत्कालीन समाज असमर्थ असतो; व त्यामुळें तो श्रेष्ठ पुरुष आपल्या काळीं मान पावण्याच्या ऐवजीं लोकनिंदेसच अधिक पात्र होतो. परंतु थोर लोकांचा थोरपणा हा कांहीं सर्वांशीं कालमर्यादित नाहीं. कालांतरानें समाजाची प्रगति होऊन टाकून दिलेल्या तत्त्वांचाच समाज अंगीकार करतो व एके वेळीं तिरस्कारिलेल्या व्यक्तीलाच डोक्यावर घेतो. तात्पर्य, समाजाकडून थोर पुरुष मान पावो वा अपमान पावो, त्याच्या कार्याचें महत्त्व आपणांस जाणून घ्यावयाचें तर तो पुरुष ज्या देशांत होऊन गेला त्या देशांतील त्या काळची राजकीय, धार्मिक व सामाजिक स्थिति कशी होती याचें प्रथम पर्यालोचन केलें पाहिजे.

श्रीज्ञानदेव यांची कामगिरी धार्मिक, तत्त्वज्ञानात्मक व वाङ्मयात्मक अशी त्रिविध आहे. तेव्हां ज्ञानदेवांच्या पूर्वी व प्रत्यक्ष त्यांच्या काळीं धर्म, तत्त्वज्ञान व वाङ्मय यांसंबंधीं काय स्थिति होती हें सांगणें तर अवश्य आहेच; परंतु तत्कालीन देशस्थितीचाहि थोडक्यांत उल्लेख करणें अपरिहार्य आहे. कारण एखादी व्यक्ति राजकीयपरिस्थितिनिरपेक्ष आपली नैतिक, धार्मिक अथवा पारमार्थिक उन्नति करून घेऊं शकेल; परंतु समाजाचें

काळीं तर स्वराज्य आणि सुराज्य या दोहींचेंहि भाग्य त्यास लाभलें होतें. मध्ययुगीन भारतांत बदामीचे चालुक्य, मालखेडचे राष्ट्रकूट, कल्याणचे चालुक्य व देवगिरीचे यादव अशीं चार घराणीं दक्षिणेंत कालानुक्रमानें उदय पावलीं. पैकीं ज्ञानदेवांच्या काळीं महाराष्ट्रावर यादव वंशाचा अंमल चालू होता. यादव हे मूळचे मथुरेचे राहणारे असून त्यांचीं कित्येक घराणीं प्राचीन काळीं केव्हां तरी गुजराथेंत व महाराष्ट्रांत आलीं. हेमाद्रीच्या व्रतखंडांत या घराण्यांची हकीकत दिली आहे. यादवांचे दोन वंश प्रसिद्ध आहेत. एक नाशिकजवळ चंद्रादित्यपूर अथवा चांदवड येथें राज्य करीत होता; आणि दुसरा देवगिरी अथवा दौलताबाद येथें होऊन गेला. पहिल्या यादव वंशानें इ. स. ७९५ ते ११९१ पर्यंत राज्य केलें.*

ज्ञानदेवांनीं ज्ञानेश्वरीच्या शेवटीं जो उल्लेख केला आहे त्यावरून त्यांच्या वेळीं देवगिरि अथवा दौलताबाद येथील राजे महाराष्ट्रांत राज्य करीत होते असें दिसतें. यादव वंशांतील पराक्रमी राजा पांचवा भिल्लम यानें सोमेश्वर चालुक्याचें मांडलिकत्व झुगारून देऊन व द्वारसमुद्राच्या वीरबल्लाळ यादवाचाहि पराभव करून देवगिरि येथें स्वतंत्र सत्ता स्थापन केली. देवगिरि शहरहि यानेंच वसविलें. हा सन ११९१ त निवर्तला. याच्या पाठीमागून याचा पुत्र जैतुगी ऊर्फ जैत्रपाळ हा गादीवर बसला. हाहि चांगला शूर होता. प्रसिद्ध ज्योतिषी भास्कराचार्य यांचा पुत्र लक्ष्मीधर हा जैत्रपाळाचा मुख्य पंडित होता. ‘ परमामृत ’ व ‘ विवेकसिंधु ’ या ग्रंथांचे कर्ते व विख्यात सत्पुरुष मुकुंदराज हे याच्याच राजवटींत होऊन गेले. जैत्रपाळ सन १२१० त निवर्तल्यानंतर त्याचा मुलगा सिंघण हा सिंहासनारूढ झाला. हा फारच पराक्रमी होता. याच्या कारकिर्दींत यादवांची सत्ता अतोनात वाढली. यानें उत्तरेस माळवा व गुजराथ, पूर्वेस छत्तीसगड, पश्चिमेस कोंकण व दक्षिणेस दक्षिण महाराष्ट्र हे प्रांत आपल्या

---

* **महाराष्ट्रीय ज्ञानकोश (य)**–विभाग १९, पृ. २३

राज्यास जोडिले आणि आपलें राज्य पुष्कळ वाढविलें. सिंघण हा मोठा धार्मिक असून त्यास देवालयें बांधण्याचा फार नाद होता. सोधलचा मुलगा शार्ङ्गधर यानें 'संगीतरत्नाकर' नांवाचा ग्रंथ सिंघणाच्या कारकिर्दीतच लिहिला. सिंघणानंतर त्याचा नातु कृष्णदेव हा सन १२४७ त गादीवर आला. त्यानें पुष्कळ यज्ञ केले. त्याच्या पश्चात् त्याचा धाकटा भाऊ महादेव यास १२६० त राज्यपद प्राप्त झालें. हाहि पराक्रमी होता. याच्याच कारकिर्दीत सुप्रसिद्ध महापंडित हेमाडपंत हे यादव साम्राज्याचे 'श्रीकरणाधिप' झाले.

महादेवामागून सन १२७१ मध्यें त्याचा मुलगा रामदेव यास गादी मिळाली. ज्ञानेश्वरीच्या शेवटीं "तेथ यदुवंशविलासु । सकळकळानिवासु । न्यायातें पोषी क्षितीशु । श्रीरामचंद्र ॥"* असा जो गौरवपूर्वक उल्लेख करण्यांत आला आहे तो याचाच. हा राजा धर्मनिष्ठ कसा होता हें त्यानें सत्तावन ब्राह्मणांस तीन गांवें दान दिल्यावेळीं घातलेल्या पुढील अटींवरून दिसून येतें:—"या ब्राह्मणांनीं व त्यांच्या वंशजांनीं तीं गांवें सोडूं नयेत व गहाण टाकूं नयेत. गांवांत वेश्या राहूं देऊं नये, जुवा खेळूं नये, हत्यारें वापरूं नयेत व सत्कर्मांत वेळ घालवावा." ‡ रामदेव धार्मिक होता; परंतु दुर्दैवानें मोठा राजकारणपटु अथवा योद्धा असावा असें दिसत नाहीं. कारण याच्याच कारकिर्दीत अल्लाउद्दीन खिलजीनें देवगिरीवर स्वारी करून त्याचा पराभव केला आणि त्यास आपला अंकित करून अपार संपत्ति दिल्लीस नेली. पुढें रामदेवराय खंडणी देईना म्हणून मलिक काफरनें पुनः त्याजवर स्वारी करून त्यास पकडून दिल्लीस नेलें. तेथून सहा महिन्यांनीं परत आल्यावर मात्र तो खंडणी नियमानें धाडीत असे. यानंतर दोन वर्षांनीं म्हणजे सन १३०९ मध्यें तो मरण पावला. त्याच्या मागून त्याचा मुलगा

---

* अ. १८।१८०४

‡ महाराष्ट्रीय ज्ञानकोश (य)–विभाग १९, पृ. ...

मराठी ग्रंथ संग्रहालय नोंद नं. ........ ठाणे

शंकरदेव हा गादीवर आला. यानें धैर्यानें खंडणी देण्याचें नाकारलें; परंतु इतर हिंदु राजांनीं मदत न केल्यानें मलिक काफरच्या विरुद्ध त्याचें कांहीं चालेना. शेवटीं मलिक काफरनें त्याजवर स्वारी करून त्यास ठार मारलें व यादवांचें राज्य खालसा केलें.

या संक्षिप्त इतिहासावरून स्वधर्मीय यादव राजांच्या कृपाछत्राखालीं महाराष्ट्र देश स्वराज्यसुख अनुभवीत असतां ज्ञानदेवांचा जन्म झाला हें दिसून येईल. हेमाद्रीच्या ‘ राजप्रशस्तीं ’त या ऐश्वर्याचें वर्णन आहेच. तथापि खुद्द ज्ञानेश्वरी ग्रंथाकडे जरी पाहिलें तरी वाचकांस असें आढळून येईल कीं, ग्रंथकर्ता ज्या समाजांत वावरत होता तो समाज चांगलाच धनाढ्य व ऐश्वर्यसंपन्न होता. कां कीं, ज्ञानदेवादि चार भावंडें म्हणजे वास्तविक समाजबहिष्कृत, अर्थात् जवळजवळ निर्धन अशा संन्याशाचीं मुलें. सोन्याचांदीचा स्पर्श त्यांस कोठून होणार ! परंतु ज्ञानेश्वरींत पाहावें तों कितीतरी सोन्यामोत्यांचे व रत्नांचे दृष्टांत विखुरलेले आहेत: “तुकोनि घेतलीं मोतियें जैसीं । ” अ. १८।३१४; “ अगा डोळांवीण मोतियें । घेतां पाडु मिळे विपायें । ” अ. १८।७२१; व “ कां मोतियांची जैसी जाती । सोनयाही मान देती । नातरी मानवती । अंगेंचि सडी ॥ ” अ. १८।१७३९. हे केवळ एका अध्यायांतील उतारे आहेत हें लक्षांत ठेविलें पाहिजे. ज्ञानदेवांच्या काळीं सोन्याचीं नाणीं प्रचलित होतीं. “ पैं भांगार जऱ्ही पंधरें । तऱ्ही राजावळीचीं अक्षरें । लाहे तैंचि सरे । जियापरी ॥” अ. १७।३२२. तसेंच त्या काळीं सोनें फार स्वस्त असून त्याचा भाव १५–१५॥ व १६ असा होता. *

याशिवाय सोनें गाळण्याच्या पद्धतीचेहि दृष्टांत त्यांनीं वारंवार दिलेले आढळतात. अर्थात् ज्ञानदेवांच्या समोर व ज्या समाजाकरितां ते लिहीत

* ज्ञा. अ. १५।३४१, १५।५६७, १८।९८१, १८।१०८७, १८।१२५४.

होते त्या समाजासमोर सोनें–मोतीं सारखें खेळत असल्याशिवाय वारंवार त्यांचाच उल्लेख ग्रंथांत येणें शक्य वाटत नाहीं. तसेंच ज्ञानदेवकाळीं देश कसा धनधान्यसमृद्ध व सुखी होता याचें एक नमुनेदार उदाहरण म्हणजे तेव्हां द्राक्षाच्या वेलीस उत्कृष्ट व रसाळ द्राक्षांचे घोस लागावे म्हणून तिच्या बुडाशीं दूध घालीत असत!* आजकाल पिण्यास पुरेसें दूध मिळावयाची जेथें वानवा तेथें द्राक्षवेलीच्या बुडाशीं खत म्हणून हंडेच्या हंडे दूध कोण घालणार!

देशांत नाना शास्त्रें व कला यांची वाढ होणें हेंहि त्याच्या संपन्नतेचें द्योतक आहे. ज्योतिष, शिल्प, नौकानयन, सूप, कोक, व्याकरण, नीति, वैद्यक, धातुवाद, तर्क, वेदान्त, योग इत्यादि शास्त्रांचे उल्लेख ज्ञानेश्वरींत अनेक वेळां आलेले आहेत. ज्ञानदेवांच्या काळीं विशेषतः शिल्प व चित्र-कला यांत किती प्रगति झाली होती हें त्यांच्या पुढील दृष्टांतावरून कळून येईल. "कां प्रतिभिंतीं चोरवटें। समोरील चित्र उमटें।" ज्ञा. १५।१४४. त्यांच्या काळीं किल्ले व देवालयेंहि बरींच बांधलीं जात होतीं. खुद्द ज्ञाने-श्वरींत, किल्ल्यांच्या व देवालयांच्या बांधणीचीं रूपकें अनेक आहेत. परंतु अमृतानुभवांतील खालील उल्लेख महत्त्वाचा आहेः—

"देव देऊळ परिवारु। कीजे कोरूनि डोंगरु।
तैसा भक्तीचा वेव्हारु। कां न व्हावा॥" प्र. ९।४१

ही ओळ लिहितांना ज्ञानदेवांच्या समोर वेरूळ येथील सुंदर लेणीं असावींत यांत संशय नाहीं. लोकांच्या डोळ्यांसमोर अशाच इतरहि रम्य कृति होत्या, म्हणूनच असले दृष्टांत दिलेले असावे.

येणेंप्रमाणें देवगिरी येथील यादव वंशाच्या व मुख्यतः रामदेवराव यादवाच्या राजवटींतील महाराष्ट्राचा थोडा इतिहास सांगितला. त्यासंबंधीं

---

* "जेव्हां द्राक्षीं दूध घातलें। तेव्हां वायां गेलें गमलें।
परी फळपाकीं दुणावलें। देखिजे जेवीं॥"–ज्ञा. अ. १५।५९१

पुढील एक दोन गोष्टी विशेष लक्षांत ठेवण्यासारख्या आहेत. पहिली गोष्ट ही कीं, ज्ञानदेवांच्या पूर्वी किती तरी वर्षें व खुद्द त्यांच्याहि संपूर्ण हयातींत महाराष्ट्र देश स्वधर्मीय राजछत्राखालीं स्वराज्यसुख अनुभवीत होता. दुसरी गोष्ट म्हणजे त्यांच्या कालांत मुसलमानांचा व म्लेच्छ धर्माचा महाराष्ट्रांत प्रवेश झालेला नव्हता. कारण तेव्हां रामदेवराय राज्य करीत होता असा ज्ञानेश्वरीच्या शेवटीं स्पष्ट खुलासा असल्याचें वर सांगितलेंच. शिवाय ज्ञानेश्वरींत सबगोलंकार करणाऱ्या अवैदिक तामस ज्ञानाचा उल्लेख करतांना "येरींही शास्त्र बटिकरीं। जें निंदेचे विटाळवरी। बोळविलेंसे डोंगरीं। म्लेंच्छधर्माच्या ॥" (अ. १८।५५०) असा म्लेंच्छधर्म आपल्या हद्दीपासून दूर असल्याचा गर्भित उल्लेख ज्ञानदेव करतात. तसेंच त्यांच्या ग्रंथांत मूर्तिभंजकांच्या कृत्यांचाहि उल्लेख आढळत नाहीं. उलट बहुतेक लोक 'स्थावरीं बहुभक्त' असल्याचे उल्लेख आहेत; आणि देवाला दगड समजणाऱ्या मूर्तिपूजेच्या निकृष्ट स्वरूपावर त्यांनीं पुष्कळ ठिकाणीं प्रहार केले आहेत. याचा अर्थ त्यांस मूर्तिपूजा नको होती असा नव्हे, तर डोंगर अथवा धातु यांसच देव मानणाऱ्यास ते अज्ञाणी समजतात; परंतु मूर्तींत देव नाहीं, प्रतिमापूजा मिथ्या आहे असें मानणाऱ्यास ते पाखंडी गणतात (ज्ञा. अ. १६।२९८). नामदेवांच्या अभंगांतून "राजे भ्रष्ट यवन जाले" असा जो उल्लेख आढळतो त्याचा अर्थ एवढाच घ्यावयाचा कीं, हिंदुस्थानांत–महाराष्ट्रांत नव्हे–यवनांची सत्ता बळावत चालली होती. शिवाय खुद्द महाराष्ट्रांत यवन मातलेले पाहण्यास दीर्घायुषी नामदेव जगले होते; व त्याचे संस्कार या वर्णनांत उमटले असण्याचा संभव आहे.

## धार्मिक स्थिति

ज्ञानदेवकालीन महाराष्ट्रांत स्वधर्मीय राजांच्या छत्राखालीं लोक सुखी होते, तरी हिंदुस्थानभर जी एक धार्मिक व सामाजिक अधोगति या सुमारास होत होती तिला हा प्रांत पूर्णपणें अपवाद होता असें

मात्र नाहीं. यादव साम्राज्याची अभिवृद्धि होऊन लोक साम्राज्य-वैभव भोगण्यांत दंग झाल्यामुळें वैदिक धर्म जरी अद्यापि तगून होता तरी त्याचा पूर्वीचा जोम व परधर्माशीं टक्कर देण्याची शक्ति हीं आंतून बरींच पोखरलीं गेलीं होतीं. या वेळीं वैदिक धर्माचें मूळचें यज्ञीय स्वरूप केव्हांच पालटून गेलें होतें; आणि पूर्वीच्या आचारविचारांतहि महत्त्वाचें रूपांतर झालें होतें. व्रतें, उद्यापनें, नियम, मंत्रतंत्र, जडीबुटी, तीर्थयात्रा, * नाग, बहिरोबा, देवी, दैवतें, भुतेंखेतें इत्यादि पूजा यांचा नुसता सुकाळ झाला होता. त्यामुळें मुख्य जो वैदिक धर्म त्याला लोक जवळजवळ विसरूनच गेले होते असें म्हणण्यास हरकत नाहीं. साम्राज्यविस्ताराबरोबर सुरक्षितता व वैभव हीं प्राप्त झालीं; आणि त्या योगानें लोकांचीं मनें सहजच धर्माचरणाकडे-परंतु सुखसोईच्या धर्माकडे वळलीं. अर्थात् धार्मिक लोकांची दृष्टि धर्माच्या बाह्यांगावरच विशेष खिळून राहिली व त्याचें खरें अंतःस्वरूप लोक विसरून जाऊं लागले. महाराष्ट्रापुरता तरी महमदी धर्माच्या चांदाचा उदय अद्यापि व्हावयाचा होता हें वर सांगितलेंच; तथापि या सुमारास महाराष्ट्राच्या भोंवतालीं स्वरूपतः हिंदु, परंतु वस्तुतः कमी-अधिक प्रमाणानें वैदिक धर्मविरुद्ध असे निदान तीन अवैदिक पंथ वैदिक धर्म पोखरण्याचें काम करीत होते. ते म्हणजे (१) जैन, (२) लिंगायत, व (३) महानुभाव अथवा मानभाव. यांशिवाय खुद्द वैदिक धर्मांतहि पंथ, उपपंथ कांहीं कमी नव्हते. त्यांतल्यात्यांत प्रस्तुत चरित्राशीं ज्यांचा निकट संबंध आहे असे तीन होते ते असेः—( १ ) रामानुजाचार्यांचा विशिष्टाद्वैतवादी भागवतधर्म, ( २ ) नाथपंथ, व ( ३ ) पंढरपुरचा भागवतधर्म, अथवा वारकरी पंथ. आपण आतां या सर्वांचा थोडक्यांत विचार करूं. म्हणजे श्रीज्ञानदेवकालीं महाराष्ट्राची व त्याच्या आसपासच्या भागाची धार्मिक

* ज्ञा. अ. ३। ८९-९१ व अ. १३।८१२-८२२

स्थिति काय होती हें कळून येईल व त्यायोगें ज्ञानदेवांनीं ती सुधारण्याचा काय प्रयत्न केला हें आपल्या लक्षांत येईल.

## अवैदिक पंथ

( १ ) **जैनः**—जैनधर्म हा अतिशय पुरातन आहे. या पंथाचा मूळ पुरुष महावीर हा होय. हा बुद्धापूर्वीं होऊन गेला ही गोष्ट सर्वमान्य आहे. वैदिक धर्मावर प्रहार करून त्यांतून प्रथम फुटून बाहेर पडणाऱ्यांपैकीं महावीर व गौतमबुद्ध हे होत. वैदिक धर्माचीं मुख्यतः सात तत्त्वें सांगतां येतील*:—( १ ) श्रुतीचें अपौरुषेयत्व, ( २ ) इंद्र, वरुण, अग्नि इत्यादि वैदिक देवता व वैदिक कालानंतरच्या शंकर, विष्णु या देवतांविषयीं पूज्यभाव, ( ३ ) वैदिक देवतांस संतुष्ट करण्याच्या हिंसायुक्त यज्ञादि कर्मसाधनांवर श्रद्धा, ( ४ ) चातुर्वर्ण्यव्यवस्था व ब्राह्मणांचें पुरोहितत्व, ( ५ ) चतुराश्रमव्यवस्था, ( ६ ) वेदांत वर्णन केलेला ब्रह्मवाद, व ( ७ ) कर्मानुसार पुनर्जन्म. या तत्त्वांपैकीं महावीर व गौतमबुद्ध या दोघांनीं पहिल्या पांच तत्त्वांचा व गौतमानें तर सहाव्याचाहि त्याग करून आपल्या तत्त्वज्ञानाची व धर्माची उभारणी केली. बौद्धधर्मास राजाश्रय मिळाल्यामुळें कांहीं काळपर्यंत सर्व हिंदुस्थानभर त्याचा फार प्रसार झाला होता. परंतु मुख्यतः कुमारिलभट्ट व त्यानंतर झालेले आद्य शंकराचार्य यांनीं बौद्धमताचें समूळ खंडन करून बौद्धधर्म हिंदुस्थानांत जवळजवळ नामशेष करून टाकला. परंतु जैनधर्मास मात्र तशी नामशेषता प्राप्त झाली नाहीं. कारण त्यानें दोन आश्रमांचा व तपस्येचा अंगीकार केला; आणि गृहस्थाश्रम्यासहि तपश्चर्या लावून दिली. या दोन्ही धर्मांतील ज्या एका महातत्त्वाचा हिंदुस्थानावर इतका भारी परिणाम झाला कीं, त्यांच्यामागून आलेल्या प्रत्येक धर्मप्रवर्तकास आपल्या धर्मांत त्यास अंतर्भूत करून घेणें भाग पडलें व

---

* C. V. Vaidya—*History of Mediaeval India*, Vol. III, P. 404.

ज्याचे संस्कार आपल्यावर अद्यापि दृढ आहेत, तें तत्त्व म्हणजे 'अहिंसा' हें होय. उपनिषदांनीं 'प्लवा ह्येत अदृढा यज्ञरूपाः' असें म्हणून ब्रह्मप्राप्ति-रूप अमृतत्व प्राप्त होण्यास वैदिक यज्ञीय संस्थेचें गौणत्व दाखविलें होतें, व नंतर भगवद्गीतेनेंहि 'यामिमां पुष्पितां वाचम्', 'ते तं भुक्त्वा' इत्यादि श्लोकांनीं यज्ञीय कर्ममार्गाचें गौणत्वच दाखविलें. गीतेनें अहिंसेचा ज्ञानगुण व शारीरिक तप म्हणून अंगीकारहि केला आहे; परंतु तिनें या तत्त्वाचें भलतेंच गौरवमात्र केलें नाहीं. उलट हिंसा व अहिंसा यांच्या मर्यादा ओळखून कर्माकर्माची गुंतागुंत सोडवितांना हिंसा कीं अहिंसा या कूटाचाहि 'हत्वाऽपि स इमाँल्लोकान् न हन्ति न निबद्ध्यते' या श्लोकांत ( गी. अ. १८, श्लो. १७ ) उलगडा करून दाखविला आहे. महावीर व गौतम यांच्या कोंवळ्या अंतःकरणावरमात्र यज्ञीय पशुहिंसेचा पराकाष्ठेचा परिणाम होऊन त्यांनीं यज्ञीय पशुहिंसेविरुद्ध व त्यावरून एकंदरींत वेदा-विरुद्ध बंड पुकारलें. बुद्धाच्या तपस्येच्या योगानें या तत्त्वाचा फारच लवकर प्रसार झाला; आणि त्यामुळें यागादिक विधानें तर बंद पडलींच, पण पुष्कळशा लोकांनीं मांसाशनहि वर्ज्य करून शाकाहारित्व स्वीकारिलें. कित्येक विद्वान् इतिहासकारांच्या मतें अतःपर मुसलमानांच्या स्वाऱ्यांपुढें हिंदुस्थानांतील लोक टिकाव धरूं शकले नाहींत याचें हें एक महत्त्वाचें कारण आहे. तथापि आपणांस तूर्त या अहिंसातत्त्वाच्या इष्टानिष्ट परिणामां-विषयीं कांहीं म्हणावयाचें नाहीं, तर या तत्त्वानें लोकांच्या अंतःकरणांत केवढी जागा व्यापिली होती एवढेंच फक्त लक्षांत घ्यावयाचें आहे. तेराव्या शतकाच्या प्रारंभीं जैन धर्माच्या प्रसारास पुनः भरती आली होती व या खेपेस ही लाट थेट दक्षिणेपर्यंत पोंचली होती. यामुळें दक्षिणेंत या काळीं उदयास आलेल्या रामानुजाचार्य, बसव, चक्रधर वगैरे सर्व नवमत-प्रस्थापकांनीं आपआपल्या आचारधर्मांत व तत्त्वज्ञानांत अहिंसेस स्थान देऊन तिचें श्रेष्ठत्व कबूल केलें व तद्वारा स्वमतप्रसाराचें कार्य सुलभ केलें.

(१) लिंगायतः—[illegible] रामानुजाचार्यांचें मत, असें लिंगायत

स्थळ प्रत

लोकांच्या मतापूर्वीचें असलें तरी तें वैदिक धर्मांतर्गत असल्यामुळें त्याचा विचार पुढें येईल. तूर्त याच सुमारास प्रकट झालेले जे लिंगायत व मानभाव पंथ त्यांपैकीं लिंगायत धर्माचा प्रथम विचार करूं. या लिंगायत धर्मानेंच जैन धर्मास दक्षिणेंतून हुसकून दिलें. त्याचे मूळ प्रवर्तक बसव यांचा इतिहास बसवपुराणांत दिला आहे. हे बाराव्या शतकांत होऊन गेले. मदिरजा व मदलंबिका या ब्राह्मण दांपत्याचे हे पुत्र. हे चालुक्यवंशीय विज्ञान राजाच्या पदरीं 'प्रधान असून प्रथमपासूनच धर्मसुधारक होते. यांनीं प्रधानकीवर असतांना जंगमांस मोठमोठाल्या देणग्या दिल्या. त्यामुळें राजा असंतुष्ट झाला व बसव जे पळून गेले ते सोमेश्वराच्या लिंगांत लीन झाले, असा बसवपुराणांत उल्लेख आहे. त्यांस नंदीचा अवतार असें समजतात. लिंगायत हा वीरशैवी पंथ आहे. परंतु हा शैव आहे म्हणून याचा आणि *काश्मीर देशांतील ज्ञानदेवांस मान्य असलेल्या शैवपंथाचा कांहीं संबंध आहे असें अनुमान केल्यास तें चुकीचें होईल. लिंगायत पंथ हा द्वैती आहे आणि त्या पंथाचीं तत्त्वें व आचार पुढीलप्रमाणें आहेतः—( १ ) लिंगायतांस वेद प्रमाण नाहींत. ( २ ) ब्राह्मणांचें श्रेष्ठत्व अमान्य. ( ३ ) वर्णाश्रमधर्म अमान्य. पूर्वी या पंथांत जातिभेद नव्हता; मात्र पुढें तो रूढ झाला. ( ४ ) लिंगायत लोक प्रेतास अग्नि देत नाहींत, शव तसेंच पुरतात. तसेंच अंत्यश्राद्धादिक संस्कारहि यांच्यांत नाहींत. ( ५ ) अहिंसा विहित आहे. ( ६ ) संन्यास व तप यांची अनवश्यकता. ( ७ ) स्त्री-पुरुष या सर्वांनीं गळ्यांत चांदीचें जानवें घालून त्यांत लिंग ठेवून शिवपूजा करावी. ( ८ ) विटाळाची भानगड कमी. भस्मलेपनानें शुद्धि होते.

---

* चैतन्यमात्मा ॥ १ ॥—शिवसूत्र ( काश्मीर सीरिज )

आणि ज्ञान बंधु ऐसें । शिवसूत्राचेनि मिसे ।
म्हणितले असे । सदाशिवें ॥—अमृतानुभव, प्र. ३।१६

स्थळ प्रत ता.

या पंथाच्या प्रचारासंबंधीं एक गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे. याचे प्रवर्तक बसव यांनीं जैन पंडितांप्रमाणें अन्यधर्मीय पंडितांशीं संस्कृतांत पूर्वपक्ष-उत्तरपक्ष करून वादविवाद केला नाहीं. धर्मप्रसाराच्या कामीं अशा वादाचें निष्फलत्व त्यांनीं जाणिलें; व आबालवृद्धांस समजेल अशा देशी भाषेंत—कानडींत—आपल्या धर्माचीं तत्त्वें सांगण्यास प्रारंभ केला. यामुळेंच दक्षिणेंत जैनधर्माची पिछेहाट होऊन लिंगायतधर्माचा प्रसार झाला.

( ३ ) **महानुभाव** अथवा **मानभावः**—हा पंथ वैष्णव आहे. मानभावांच्या आराध्यदेवता कृष्ण व दत्त ह्या होत. या पंथाचे उत्पादक श्रीचक्रधरस्वामी हे होत. यांचा जन्म बाराव्या शतकांत झाला. हे पूर्वाश्रमीं भरवस ( भडोच ) येथील प्रधान, सामवेदी नागर ब्राह्मण विशालदेव, यांचे पुत्र हरिपालदेव होत. वडील प्रधान असतांना यांनीं लढायांत वगैरे बराच भाग घेतला होता. संसारसुखाचा उपभोग घेतल्यावर आपली माता माल्हणदेवी हिच्या अनुज्ञेनें हरिपालदेवांनीं रामयात्रेस जाण्याची सिद्धता केली. मार्गांत ऋद्धिपुरीं त्यांस श्रीगोविंदप्रभूंचें दर्शन झालें व यांनीं संन्यासाश्रम स्वीकारला आणि ऋद्धिपूर येथें महानुभावपंथाची स्थापना केली.

रामदेवराय यादवाच्या कारकिर्दींत मानभाव बरेच प्रबळ झाले. मानभाव पंथाची उत्पत्ति कशीहि असो, एवढी गोष्ट निर्विवाद आहे कीं, मानभावांचें पाखंडी मताशीं आचारांत पुष्कळसें साम्य आहे. या पंथांतील तत्त्वें व आचार येणेंप्रमाणें आहेतः—( १ ) यांस वेद प्रमाण नाहींत. त्याऐवजीं ते गीता व श्रीचक्रधरस्वामींच्या मुखांतून निघालेले सूत्ररूप पाठ आद्य धर्मग्रंथ मानतात. ( २ ) हे द्वैती आहेत. ( ३ ) वर्णाश्रमव्यवस्थेस यांच्यांत थारा नाहीं. (४) हे स्त्री-पुरुष या सर्वांस सरसकट संन्यास हाच मोक्षमार्ग विहित मानतात व तोहि श्रीमद्भगवद्गीतेच्या आधारें. ( ७ ) हे नील वस्त्र परिधान करितात.

या पंथासंबंधीं एक गोष्ट विशेष लक्षांत ठेवण्यासारखी आहे. यांनीं आपले ग्रंथ आपल्या पंथाबाहेरच्या लोकांस कळूं नयेत म्हणून ते सांकेतिक

लिपींत लिहिण्याचा प्रघात पाडला. याचा परिणाम असा झाला कीं, जवळ जवळ सहासातशें वर्षें हे ग्रंथ असून नसल्यासारखेच झाले. अलीकडेच कै. वि. का. राजवाडे, कै. वि. ल. भावे व श्री. य. खु. देशपांडे यांच्या प्रयत्नानें महाराष्ट्रभाषामंदिराचें हे नवीन दालन महाराष्ट्रियांकरितां खुलें होण्याचा सुयोग आला आहे.

## वैदिक पंथ

( १ ) **रामानुजीय भागवतधर्मः**—या पंथाचे आद्यप्रवर्तक रामानुजाचार्य हे अकराव्या शतकांत होऊन गेले. यांनीं प्रथम अद्वैतसंप्रदायाचें अध्ययन केलें. परंतु पुढें त्यांस अद्वैत न पटून त्यांनीं पंचरात्रादि आगमाचा अभ्यास केला व ते कट्टे वैष्णव बनले. यांचीं प्रस्थानत्रयीवर भाष्यें आहेत. यांच्या आगमप्रधान भागवतपंथाचीं तत्त्वें पुढीलप्रमाणें आहेतः—( १ ) वेदाचें अपौरुषेयत्व अर्थात् प्रामाण्य मान्य. ( २ ) वर्णाश्रमव्यवस्था मान्य. ( ३ ) अद्वैत अमान्य. ( ४ ) विशिष्टाद्वैत मान्य. ( ५ ) मोक्षाचा मार्ग ज्ञानकर्मसमुच्चय. (६) ‘ चतुर्व्यूह ’ व ‘ प्रपत्ति ’ या कल्पना प्रमुख. ( ७ ) आचार–सोवळेंओवळें वगैरे–फारच कडक. ( ८ ) कट्टे वैष्णव. या पंथाचा प्रसार कर्नाटकांत व त्याच्याखालीं दक्षिणेंत विशेष होता.

आतांपर्यंत ज्ञानदेवकालीं भरभराटींत असणाऱ्या तीन अवैदिक व एक वैदिक अशा चार मतांचा इतिहास थोडक्यांत सांगितला. आतां ज्ञानदेवांची त्यांच्याकडे पाहण्याची दृष्टि काय होती तें पाहूं. कारण त्यावरून ज्ञानदेवांनीं ज्या तत्त्वज्ञानाचा प्रसार केला तो कां केला, व त्या तत्त्वज्ञानाच्या प्रसारार्थ पुढें वर्णिल्या जाणाऱ्या दोन पंथांचा अंगीकार केला तो कां केला हें कळून येणार आहे.

यांतील शेवटचे जे रामानुजीय त्यांच्याकडे ज्ञानदेव पहिल्या तिघांपेक्षांहि आपलुकीनेंच पाहणार हें उघड आहे. तथापि ज्ञानदेवांच्या कार्याच्या व तत्त्वज्ञानाच्या दृष्टीनें रामानुजीय भागवतधर्माचा परिणामदेखील पूर्वोक्त

नास्तिक-त्रयीच्या परिणामांहून फारसा वेगळा झाला नाहीं. वेदप्रामाण्य मान्य करून रामानुजाचार्यांनीं द्वैत व वैष्णवी दीक्षा यांचें इतकें स्तोम माजविलें कीं, ती एक वैदिक धर्मास मोठीच तड गेली असें म्हटलें पाहिजे. वीरवैष्णव व वीरशैव यांजमधील तीव्र द्वैत अद्यापि मिटूं शकत नाहीं!

ज्ञानदेवांच्या मताच्या व कार्याच्या अगदीं विरुद्ध असा जर कोणता पंथ असेल तर तो जैनांचा. जैनमताचा ज्ञानदेव अवैदिकाग्रणी म्हणून पुढीलप्रमाणें उल्लेख करतातः—

"नास्तिका द्यावया तोंड। वेदांचें गाढें बंड। तें देखोनि पाखांड। आनचि वाजे॥ म्हणती तुम्ही निर्मूळ। लटिकें हें वाग्जाळ। ना म्हणसी तरी पोफळ। घातलें आहे॥ पाखांडाचे कडे। नागवीं लुंचिती मुंडें। नियोजिलीं वितंडें। तळासि येतीं॥" —ज्ञा. अ. १३।१९-२१

त्यांच्या मतें याच्या खालोखाल लिंगायत व मानभाव पंथांची गणना होत असावी. कारण हे दोन पंथ ज्ञानदेवांस प्रिय असलेल्या शिव व कृष्ण या देवता तरी मानतात; त्यांस केवळ नरकांतच लोटून देत नाहींत! परंतु अवैदिक असल्यामुळें ज्ञानदेवांस हेहि पंथ अमान्यच. ब्राह्मणांविषयीं 'वैराचा बोधु' ठेवणाऱ्यांस ते तामस ज्ञान्यांत घालतात (ज्ञा. अ. १७।१९३). वैदिक धर्मसागरास ओहटी लावणारे हे धर्मपंथ आपल्या भोंवतीं बळावत आहेत आणि दिवसानुदिवस वेदाविषयीं आदर व प्रेम कमी होत आहे हें पाहून, तसेंच जीवांच्या कल्याणाकरितां वैदिक औपनिषदीय अध्यात्मज्ञानाची तर गरज आहे हें लक्षांत घेऊन, ज्ञानदेवांनीं आपल्या ग्रंथांत वेदांची थोरवी गाइली; आणि वैदिक तत्त्वज्ञान व आचार यांविषयीं आदर व्यक्त करून लोकांसहि वैदिक आज्ञा शिरसावंद्य करण्यास शिकविलें.

"याकारणें पैं बापा। जया आथी आपली कृपा।
तेणें वेदांचिया निरोपा। आन न कीजे* ॥" अ. १६।४५५

* वेदांवरील प्रेम व आदर व्यक्त करणाऱ्या अशा अन्य ओव्या:— अ. १६।४४६, ४५६–६०, ४६२

वरीलसारख्या ओव्या ब्राह्मणांनीं ज्यांच्या मातापितरांस देहान्तप्रायश्चित्त सांगितलें व संन्याशाचीं मुलें म्हणून ज्यांचा अतिशय छळ केला त्यांच्या मुखांतून येतात, ही गोष्ट लक्षांत ठेवल्यास ज्ञानदेवांचें वेदावर केवढें प्रेम होतें व वैदिक मार्गाविषयीं त्यांना केवढा आदर होता हें दिसून येतें. एऱ्हवीं त्यांसहि वैदिक धर्मांतून फुटून वेगळें होण्याची तत्कालीन स्वतंत्रता अथवा वैदिक ग्रंथ जाळून भस्मसात् करण्याची आधुनिक स्वतंत्रता होतीच. परंतु तो मार्ग न स्वीकारतां त्यांनीं वैदिक परंपरेंतील त्याज्य भाग सुधारून वेदमार्गाची प्रतिष्ठा वाढविण्याचा उपक्रम केला यांतच त्यांचें श्रेष्ठत्व आहे.

ज्ञानदेवांनीं वेदाचें श्रेष्ठत्व मान्य केलें. परंतु त्याचप्रमाणें वैदिक मार्गांत काळेंकरून वाढत जाणारा कर्मठपणा व दृष्टीचा संकुचितपणा हे दोष दूर करण्याचा प्रयत्न करण्यांतहि कसूर केली नाहीं. त्यांनीं गीतेवरच टीका केली यांतदेखील एक रहस्य आहे. गीता ही सर्व वर्णांस व सर्व स्त्री–पुरुषांस सारखीच सुसेव्य आहे; आणि वैदिक मार्गांत तिला प्रस्थानत्रयींत बसण्याइतकें महत्त्व प्राप्त झालें आहे. ते स्वतःच गीतेचें असें वर्णन करतात:—

"हा औदार्यें आगळा वेदु । मूर्तु जाण ॥ वेद संपन्नु होय ठाईं । परी कृपणु ऐसा आनु नाहीं । जे कानीं लागला तिहीं । वर्णांच्याची ॥ येरां भवव्यथा ठेलियां । स्त्रीशूद्रादिकां प्राणियां । अनवसरू मांडूनियां । राहिला आहे ॥ तरी मज पाहतां तें मागील उणें । फेडावया गीतापणें । वेदु वेटला भलतेणें । सेव्य होआवया ॥" —ज्ञा. अ. १८, ओ. १४५६–५९

या ओव्यांमध्ये ज्ञानदेवांनीं मोठ्या कुशलतेनें वेदाचें वैगुण्य दर्शवून तें गीतेनें कसें भरून काढलें हेंहि दाखविलें आहे. तसेंच स्वतः वैदिकांना स्वधर्मांतील उणीव भासून ती त्यांनींच कशी दूर केली, यास्तव धर्मत्यागाचें कारणच कसें राहत नाहीं हेंहि त्यांनीं फार मार्मिकतेनें व्यक्त केलें आहे.

वैदिक धर्माचें संग्राहक स्वरूप प्रतिपादण्याचा ज्ञानदेवांचा कसा प्रयत्न होता याचा निदर्शक ज्ञानेश्वरींत दुसरा एक असाच प्रसंग आहे. गीतेच्या अठराव्या अध्यायांतील 'ब्राह्मणक्षत्रियविशाम्' या ४१ व्या श्लोकावर

टीका करतांना, शूद्राकरितां गीतेनें कर्माचें विधान केलें आहे याचा फायदा घेऊन ज्ञानदेवांनीं पुढील ओव्या लिहिल्या आहेत*:—

"चौथा शूद्र जो धनंजया। वेदीं लागु कीर नाहीं तया। तऱ्ही वृत्ति वर्णत्रया-। अधीन तयाची॥ तिये वृत्तीचिया जवळिका। वर्णा ब्राह्मणादिकां। शूद्रही कीं देखा। चौथा जाला॥ जैसा फुलाचेनि सांगातें। तांतु तुरंबिजे श्रीमंतें। तैसें द्विजसंगें शूद्रातें। स्वीकारी श्रुती॥"

वेदानें शूद्रासहि कर्म सांगितलें आहे, अर्थात् तो अवैदिक नाहीं ही गोष्ट बहुजनसमाजाच्या डोळ्यांसमोर ज्ञानदेवांनीं मुद्दाम आणिली. कारण उभयपक्षीं विचार करतां या वर्गावरच नजर ठेवणें अवश्य होतें. अदूरदृष्टि पंडित त्यांस दूर लोटावयाच्या बेतांत, तर हावरे नवमतस्थापक त्यांस आपल्या समाजांत ओढण्यास उत्सुक होते. अशा स्थितींत ब्राह्मण आणि शूद्र या सर्वांनाच ज्ञानदेव इशारा देतात कीं, ब्राह्मणापासून शूद्रापर्यंत सर्वजण वेदमातेचींच लेकरें आहेत व तिनें सर्वांच्याच कल्याणाची सोय केलेली आहे.

तात्पर्य, जैनप्रमुख वेदबाह्य लोकांच्या मतप्रसारास आळा बसावा म्हणून ज्ञानदेवांनीं वेदाचें श्रेष्ठत्व व त्याचें संग्राहक स्वरूप तत्कालीन लोकांना समजेल अशा भाषेंत पटवून दिलें; आणि यामुळेंच वैदिक धर्मास लागलेली गळती थांबून वैदिक अध्यात्मरहस्य जगापुढें मांडणारे साधु महाराष्ट्रामध्यें शूद्रांत व अतिशूद्रांतहि निर्माण झाले.

या अवैदिक पंथांच्या प्रसारानें दुसरा एक अनिष्ट परिणाम होत असलेला ज्ञानदेवांना दिसून आला. तो म्हणजे अहिंसेची अतिरिक्त व कृत्रिम वाढ हा होय. अकराव्या शतकापासून तेराव्या शतकापर्यंत जे जे पंथ निघाले त्या त्या सर्वांनीं अहिंसेस डोक्यावर घेतलें हें मागें सांगितलेंच. यामुळें अहिंसातत्त्वास भलतेंच महत्त्व प्राप्त होऊन त्याच्या मर्यादाहि लोक विसरूं लागले. ही तत्कालीन परिस्थिति लक्षांत घेतली म्हणजेच आपली

---

* ज्ञा. अ. १८।८२०–२२

नेहमीची सरळ भावार्थ प्रकट करण्याची पद्धति सोडून देऊन ज्ञानदेवांनीं तेराव्या अध्यायाच्या सातव्या श्लोकामधील 'अहिंसा' पदाचें व्याख्यान करतांना पूर्वपक्ष-उत्तरपक्ष करून व्याख्यान कां केलें व त्या एका तीनअक्षरी पदाकरितां जवळजवळ १२० ओव्या कां खर्ची घातल्या हें ध्यानांत येतें.

ज्ञानदेवांना या लोकांची अहिंसातत्त्व आचरणांत आणण्याची रीत पाहून हसावें कीं रडावें असें होऊन गेले; व म्हणूनच त्यांनीं असल्या अहिंसेस "जैशा खांडुनियां शाखा । मग तयाचिया बुडुखा । कुंप कीजे ॥ कां बाहु तोडोनि विकिजे । मग भुकेची पीडा राखिजे ।"[१] असले दृष्टान्त दिले. अहिंसेच्या खंडनांत ज्ञानदेवांनीं पूर्वमीमांसा, आयुर्वेद व जैन इतक्या मतांचा उल्लेख केला आहे. हीं सर्व मतें एकाचा जीव वांचविण्याचा प्रयत्न करतात तर दुसऱ्याचा जीव घेतात व आपण अहिंसा आचरतों असें समजतात. परंतु एखाद्या मनुष्याच्या तोंडांत एकीकडे पेढा घालावयाचा व दुसरीकडे त्याचा केस उपटावयाचा, अशांतलाच हा प्रकार होय.[२]

अहिंसा हें कर्म नाहीं. ही मुळांत एक अंतःकरणवृत्ति आहे; आणि अहिंसा व्यक्त होणें अवश्यच असेल तर ती दोन्ही ठिकाणीं, म्हणजे सर्व इंद्रियांच्या ठिकाणीं व अखिल प्राणिमात्राविषयीं उत्पन्न होणें अवश्य आहे. याचेंच एक कल्पनाचित्र ज्ञानदेवांनीं मोठ्या काव्यमय शब्दांत रेखाटलें आहे. त्यांस पसंत असलेली अहिंसेची सुटसुटीत व्याख्या त्यांनीं सोळाव्या अध्यायांत दिली आहे ती अशी[३]:—

> " आणि जगाचिया सुखोद्देशें । शरीरें वाचा मानसें ।
> राहाटणें तें अहिंसे । रूप जाण ॥"

---

(१) अ. १३।२१८-१९ (२) ज्ञा. अ. १३ ओ. २१८-३६ पाहा. (३) ज्ञा. १६-१६४

तसेंच ज्ञानदेवांच्या दृष्टीनें 'दया', 'अहिंसा' या तत्त्वांच्या मर्यादा काय होत्या हें पाहणें असल्यास दुसऱ्या अध्यायांतील 'स्वधर्ममपि' या ३१व्या श्लोकावरील ओव्या अवश्य वाचाव्या. त्यांपैकीं विशेष महत्त्वाच्या अशा अडीचच ओव्या येथें उद्धृत करतों*:-

" अर्जुना तुझें चित्त । जऱ्ही जाहलें द्रवीभूत ।
तऱ्ही हें अनुचित । संग्रामसमयीं ॥
अगा गोक्षीर जऱ्ही जाहलें । तरी पथ्यासि नाहीं म्हणितलें ।
ऐसेनिहि विष होय सुदलें । नवज्वरीं देतां ॥
तैसें आनी आन करितां । नाशु होईल हिता ॥"

तात्पर्य, अहिंसेच्या कर्मकांडात्मक अतिरिक्त वाढीस आळा घालून अहिंसेची यथार्थ कल्पना लोकांपुढें मांडणें हें ज्ञानदेवांच्या कार्यांपैकींच एक कार्य होतें, ही गोष्ट वर दिलेल्या त्यांच्याच ओव्यांवरून निर्विवाद सिद्ध होत आहे.

लिंगायत व मानभाव यांनीं अनुक्रमें पूज्य मानलेल्या शिव व विष्णु या देवता ज्ञानदेवांसहि पूज्य होत्याच. ते स्वतःच म्हणतातः—

" तरी शंभू का श्रीहरी । पढियंता होय । " ज्ञा. अ. १७।२०१

ज्यास ज्ञानदेवांच्या श्रीकृष्णविषयक प्रेमाची कल्पना ठसवून घेणें असेल त्यानें ज्ञानेश्वरींत ठिकठिकाणीं वैकुंठींच्या श्रीकृष्णजीचें जें भक्तिप्रेमानें ओथंबलेलें वर्णन केलें आहे तें नीट वाचून पाहावें. ज्ञानदेव हे कृष्णोपासक होते व शिवोपासकहि होते; परंतु वीरवैष्णव अथवा वीरशैव केव्हांच नव्हते. ते पूर्ण अद्वैती, म्हणजे 'देवोदेवीं' एक परमात्माच पाहणारे होते. ज्ञानदेवांच्या नाथपरंपरेंत तर अशी आख्यायिका आहे कीं, शिव-विष्णु हेच गुरु व शिष्य असे आळीपाळीनें अवतरून ज्ञानदेवांपर्यंत ही मालिका चालत आली होती. ज्ञानदेवांच्या अवतारकार्यांपैकीं एकांतिक भक्तीचीं बंडें मोडून

* ज्ञा. अ. २।१८३-१८५

अद्वैत ज्ञानावरून भक्तीची योग्य मर्यादा दाखविणें, हें एक प्रमुख कार्य होतें. ज्ञानी भक्ति त्यांस त्यांच्या वडिलांनीं उपासिलेल्या श्रीविठ्ठलाच्या भक्तिसंप्रदायांत सांपडली म्हणून त्यांनींहि खांद्यावर गुढी घेऊन पंढरीची वारी केली व इतरांस पंढरीस जाण्याचा उपदेश केला.

जातां जातां येथें एका गोष्टीचा थोडासा उल्लेख करणें अवश्य आहे. पुण्यांत निघणाऱ्या ' ज्ञानसिंहु ' नामक मानभावी मासिकानें ज्ञानदेव हे मानभावी संप्रदायांतीलच होते असें एका श्लोकाच्या आधारें सिद्ध करण्याचा प्रयत्न केला आहे. त्याचा समाचार पुढील प्रकरणीं घेण्यांत येईल. तूर्त नमूद करावयाचें तें एवढेंच कीं, ज्ञानदेवांस अवैदिक, कर्मभ्रष्ट, संन्यासी मानभावपंथ मान्य होणें कधींहि शक्य नव्हतें; आणि ज्या गुरुपरंपरेच्या पायावर हा सर्व डोलारा उभा केला आहे तो पायाच मुळांत चुकीचा आहे.

आतांपर्यंत वर उल्लेखिलेल्या चार पंथांचें व ज्ञानदेवांचें कोठें पटत नव्हतें हें सांगितलें. तथापि ज्ञानदेवांनीं आपल्या कार्यार्थ त्यांतला जो चांगला भाग उचलला तोहि सांगणें अवश्य आहे. बसव व चक्रधर यांनीं स्वमतप्रसारार्थ देशी भाषेचा जो अंगीकार केला तो त्यांचा गुण ज्ञानदेवांनीं घेतला; व स्वतःस संस्कृत भाषा उत्तम अवगत असतांहि आबालसुबोध अशा मराठी भाषेंत आपले ग्रंथ लिहिले. त्यांस दिसून आलें कीं, लोकांत आत्मकल्याणाची भूक आहे; परंतु ती शांत होण्याकरितां सर्वांच्या गळीं उतरेल व पचेल असा पाकच नाहीं. वास्तविक भारतवर्षाच्या सुदैवानें ब्रह्मरसाचा पाक उपनिषद्द्रष्ट्या ऋषींनीं हजारों वर्षांपूर्वीच इतका सुंदर व इतका अपरिमित तयार करून ठेविला आहे कीं, तो या देशांतील लोकांचेंच नव्हे तर सर्व जगाचें पोट भरूनहि उरेल. परंतु कालाच्या ओघाबरोबर संस्कृतीचा ऱ्हास होत असल्यामुळें ज्या गीर्वाण भाषेंत हे उपनिषद्ग्रंथ रचिले गेले, त्या भाषेस बहुजनसमाज पारखा होत चालला; व या पाकाची वाढ सरांस सर्वांच्या पानांत सारखी होईना

बरें, ज्यांस तो मिळे त्यांसहि तो शुद्ध व स्वच्छ मिळण्याच्याऐवजीं प्राकृत मनुष्यबुद्धींतून आल्यामुळें गदळलेलाच मिळूं लागला. कित्येकांना तर तो आहे याचीहि वार्ता नव्हती. यामुळें घरच्या दूधभाकरीस आंचवलेला मुलगा जसा पोट भरण्याकरितां मोलानें रस विकणाऱ्याच्या दुकानांत जाऊन अर्धकच्च्या मिसळीवर आपली तहान भागवितो, तद्वत् वैदिकधर्म-रसास पारखा झालेला समाज धर्मबाह्य, परंतु सुबोध अशा प्राकृत भाषेंत जे कांहीं ऐकावयास व वाचावयास मिळेल तिकडेच ओढ घेऊं लागला यांत कांहींच आश्चर्य नाहीं. अर्थात् धर्मऱ्हासाची ही मीमांसा करून ज्ञानदेवांनीं 'आबालसुबोध' अशा ओवी छंदांत मराठींत ग्रंथनिष्पत्ति केली:—

"तीरें संस्कृताचीं गहनें। तोडोनि मऱ्हाठिया शब्दसोपानें।
रचिलीं धर्मनिधानें। श्रीनिवृत्तिदेवें॥"–ज्ञा. अ. ११।९

"ये मऱ्हाठियेचिया नगरीं। ब्रह्मविद्येचा सुकाळु करीं।
घेणें देणें सुखाचिवरी। हों देईं या जगा॥"–ज्ञा. अ. १२।१६

"फिटो विवेकाची वाणी। हो काना मनाची जिणी।
देखों आवडे तो खाणी। ब्रह्मविद्येची॥"–ज्ञा. अ. १३।११६०

जसें गीतेचें औदार्य तसेंच ज्ञानदेवांचें. त्यांच्याच शब्दांत सांगावयाचें म्हणजे, 'जैसा समर्थ दाता कोण्हातें नास्ति न म्हणे।' अथवा 'समर्थाचिये पंक्तिभोजनें। तळिल्या वरिल्या एकचि पक्वान्नें॥' तसेंच ज्ञानदेवांच्या घरीं सर्वांस मुक्तद्वार होतें. तुकोबांच्या भाषेंत बोलावयाचें म्हणजे ज्ञानदेवांनीं मुक्तीची गवादीच घातली आणि सर्वांस तृप्त होऊन जाण्याबद्दल पाचारण केलें. या साधुहृदय कृतीचा तात्काल असा परिणाम झाला कीं, खुद्द महाराष्ट्रांतून अवैदिक पंथांस चंबूगबाळें हलविण्याचा प्रसंग आला. शिवाय या गोष्टीचा चिरंतन असाहि परिणाम झाला. तो म्हणजे महाराष्ट्र हा थोडक्याच दिवसांत आपल्या दुर्दैवानें भौतिक स्वराज्यसुखास जरी आंचवला, तरी स्वधर्मास मात्र परकीय अमलाच्या वरवंट्याखालीं देखील तो पारखा झाला नाहीं. सारांश, वर उल्लेखिलेल्या पंथांनीं नवीन मतांचे

फाटे फोडून कांहींनीं वैदिक समाजांत फूट पाडली, तर कांहींनीं त्याचीं शकलें केलीं; आणि समाजधारणेऐवजीं वैदिक समाजाच्या विध्वंसनाचें कार्य केलें. ज्ञानदेवांचें कार्य औपनिषदीय अद्वैत तत्त्वज्ञानाकडे पुनः बहुजनसमाजाचें लक्ष वेधून वैदिकधर्मीयांची पुनः एकदा 'मांदी' मिळविणें हें होतें; आणि हें कार्य त्यांनीं आपणांस श्रीनिवृत्तिनाथद्वारा प्राप्त झालेलें शांभव ( नाथपंथीय ) अद्वयानंदवैभव ज्ञानेश्वरीद्वारा प्रकट करून व आपले वडील विठ्ठलपंथ यांच्या द्वारा प्राप्त झालेल्या पंढरपूर येथील अद्वैतभाक्तिप्रतिपादक भागवतसंप्रदायाचा नामदेवांच्या बरोबर प्रसार करून केलें. यास्तव या दोन पंथांचीं त्यावेळची स्थिति काय होती व ज्ञानदेवांस ते कां आवडले हें थोडक्यांत सांगून हें प्रकरण आटपूं.

या दोन संप्रदायांस वेगळे कां काढलें हें आतां निराळें सांगण्याचें कारण नाहीं. ज्ञानदेवांस हे दोन्ही वडिलार्जित–एक ब्रह्मदात्या आणि दुसरा जन्मदात्या पित्याकडून–प्राप्त झालेले होते. शिवाय त्यांस जें इष्ट तेंहि त्यांत अंतर्भूत होतें. पुढें ज्ञानदेवांच्या तत्त्वज्ञानाचें स्वतंत्र विवेचन करतांना याहि दोन संप्रदायांच्या तत्त्वज्ञानाची चर्चा करावयाची असल्यामुळें, सध्या या प्रकरणांत त्या उभयतांचा ज्ञानदेवपूर्वकालीन व ज्ञानदेवकालीन इतिहास तेवढा अगदीं थोडक्यांत देऊं.

( १ ) नाथपंथः—यास कानफाटा पंथहि म्हणतात. नाथपंथाचे मूळ पुरुष आदिनाथ हे होत; आणि ज्ञानदेवांच्याच ग्रंथावरून ही परंपरा थेट त्यांच्यापर्यंत चालत आली आहे ती अशीः—आदिनाथ, मत्स्येंद्रनाथ, गोरक्षनाथ, गहिनीनाथ, निवृत्तिनाथ व ज्ञानदेव. यांपैकीं पहिल्या चौघांसंबंधीं निश्चित अशी माहिती फारच थोडी आहे. गोरक्षनाथांच्या व मत्स्येंद्रनाथांच्या नांवांवर बरेच ग्रंथ मोडतात; परंतु त्यांपैकीं निःसंशय त्यांचेच म्हणून उपलब्धि फार थोड्यांची आहे. उत्तरहिंदुस्थानांतील लोक आदिनाथ, मत्स्येंद्रनाथ व गोरक्षनाथ हे आपल्याकडेच होऊन गेले असें समजतात. गोरक्षनाथ हे नेपाळांत, निदान हिमालयांत होते असें एक अनुमान आहे.

उलट महाराष्ट्रांत आदिनाथादि चारहि नाथांचीं ठिकाणें आपणांस दाखविण्यांत येतात. तेव्हां ते कोठें होऊन गेले हें जरी निश्चित सांगतां येत नाहीं, तरी महाराष्ट्रांत त्यांचा प्रसार होता ही गोष्ट निर्विवाद आहे. ज्ञानेश्वरींत ज्ञानदेवांनीं मत्स्येंद्रनाथांची व भग्नावयव चौरंगीनाथांची सप्तशृंगीवर गांठ पडली आणि मत्स्येंद्रनाथांनीं त्यांस पूर्ण सर्वावयव केलें असें स्पष्ट म्हटलें आहे[1]. गहिनीनाथांची व निवृत्तिनाथांचीदेखील सप्तशृंगीच्या डोंगरावरच गांठ पडली हें प्रसिद्ध आहे. ब्रह्मगिरि पर्वतावरहि गोरक्षगुंफा दाखवितात. ज्ञानदेवांचे आजोबा व आजीबाई, म्हणजे आपेगांवकर गोविंदपंत व नीराबाई यांना गहिनीनाथांचा अनुग्रह होता ही गोष्ट नामदेवांनीं ज्ञानेश्वरीच्या ‘ आदीं ’त सांगितली आहे[2].

नाथपंथाचा भर आत्मसाक्षात्कार अथवा आत्मानुभव या धर्माच्या अंतरंगावरच अधिक होता. यांत शिव–विष्णु यांचे ऐक्य प्रतिपादीत; अध्यात्मज्ञानास सर्वांस सारखाच अधिकार आहे असें हे नाथपंथी समजत असल्यामुळें जात, लिंग वगैरे बाह्य गोष्टींकडे ते दुर्लक्ष करीत; व अंतःकरणाची भूमिका तयार झाली आहे असें दिसल्यास स्त्री–पुरुष, आश्रमी–अनाश्रमी, ब्राह्मण–अब्राह्मण या सर्वांस आपल्या मार्गाची दीक्षा देत. यामुळें निवृत्ति–ज्ञानदेवांचा यांत सहज प्रवेश झाला व त्यांनींहि पंथाचें उदारत्व व संग्राहकत्व पाहून कलिकळित भूतांकरितां आपल्या संप्रदायपरंपरेंतून आलेला गूढ ठेवा आपल्या ग्रंथद्वारा जगास प्रकट करून दाखविला.

( २ ) **पंढरपुरचा वारकरी ऊर्फ भागवत-संप्रदायः**—ज्ञानदेवांच्या कालीं त्यांच्या कार्यास अनुकूल असा दुसरा पंथ म्हणजे पंढरपूर येथील श्रीविठ्ठलाचा भागवतसंप्रदाय हा होय. गोपाल कृष्ण हे पुंडलिकाकरितां पंढरपुरास आले व त्यानें टाकलेल्या विटेवर उभे राहिले इत्यादि कथा सर्वश्रुतच आहे. त्यांतील फक्त एकदोन मुद्द्याच्या गोष्टी येथें सांगूं.

( १ ) ज्ञा. अ. १८।१७५३. ( २ ) नामदेवमहाराजांचे अभंग ८८४–८५

पहिली गोष्ट ही कीं, पुंडलिकाचा काळ निश्चितपणें विदित नाहीं. तथापि ज्ञानदेवांच्या पूर्वींच पंढरीची यात्रा मोठी व तीहि आषाढ शु॥ ११ स व कार्तिक शु॥ ११ स अशी वर्षांतून दोन वेळां भरत होती, हें निर्विवाद होय. तेव्हां ज्ञानदेवांनीं भागवतधर्माचा पाया घातला याचा अर्थ इतकाच कीं, या पंथांतील तत्त्वज्ञानाच्या स्वरूपाचा निदर्शक असा ज्ञानेश्वरी ग्रंथ त्यांनीं रचिला व तत्कालीन वैष्णव समाजाची संघटना केली. तसेंच पंढरपूर येथील मंदिरांतील चौऱ्यायशींचा लेख, आळंदी येथील ज्ञानदेवपूर्वकालीन संन्याशांच्या समाधींवरील श्रीविठ्ठलरुक्मीणीच्या मूर्ति इत्यादि पुराव्यावरून विठ्ठल हें दैवत ज्ञानदेवांपूर्वीं बरींच वर्षें प्रसिद्ध असून भक्तजनांस उभाउभीं पालवत होतें ही गोष्ट निर्विवाद आहे. यासंबंधींची संपूर्ण चर्चा प्रस्तुत लेखकानें ' **वारकरी पंथाचा इतिहास** ' म्हणून महाराष्ट्रीय ज्ञानकोशांत लिहिलेल्या निबंधांत केली आहे. यास्तव येथें खुद्द ज्ञानदेवांची आजा–आजी हीं पंढरीच्या यात्रेस गेलीं होतीं व त्यांचे वडीलहि वाऱ्या करीत असत एवढ्याबद्दलचा पुरावा दिल्यास पुरें होईल.

" पंढरिये क्षेत्रा मिळालीसे यात्रा। आले पंढरपुरा भक्तराज ॥
गरुडटके पताका मृदंग वाजती। वैष्णव गर्जती जयजयकारें ॥
राउळाभितरीं प्रवेशलीं दोघें।[1] ............
पंढरीची वारी आषाढी कार्तिकी। विठ्ठल एकाएकी सुखरूप ॥[2]
कार्तिक शुद्ध एकादशी। पंढरीयात्रा होईल सरिशी।
दुसरी कृष्णपक्षीं निर्धारेंसी। तुज दिधली असे ॥[3] "

वरील उताऱ्यावरून पंढरपुरक्षेत्रीं दोन्ही वाऱ्या मोठ्या प्रमाणावर भरत होत्या व विशेष महत्त्वाची गोष्ट म्हणजे ज्ञानदेवांचे वडिल ही यात्रा प्रतिवर्षीं करीत असत, ही गोष्ट निर्विवाद सिद्ध होत आहे. ज्ञानदेवांपेक्षां वयानें वडील अशा गोरा कुंभार, सांवता माळी, नामदेव प्रभृति संतमंडळींनीं नामदेवाच्या पूर्वींच नामघोषणानें पंढरपूर दुमदुमून टाकलें होतें. कित्येकांनीं

(१) नामदेवमहाराजांचे अभंग, ८८९.(२) कित्ता ८९५.(३) कित्ता ९७६

ज्ञानेश्वरींत पंढरपूर अथवा विठोबा यांचा स्पष्ट उल्लेख नाहीं म्हणून ज्ञानेश्वरीकर्ते ज्ञानदेव वेगळे व पंढरपुरचे माळकरी अभंगकर्ते ज्ञानदेव वेगळे असा एक भेद काढला होता. तथापि या विषयाचीहि भवति न भवति बरीच होऊन गेलेली आहे. या बाबतींत तूर्त एवढेंच नमूद करावयाचें कीं, असा भेद मानण्यास अंतर्गत पुराव्यावरून विशेष जागा नाहीं. अभंगकर्ते ज्ञानदेव व ज्ञानेश्वरीकर्ते ज्ञानदेव एकच होत. ज्ञानेश्वरींत पंढरपूर किंवा विठोबा हीं नांवें नसलीं तरी पंढरपुरच्या संप्रदायाचा उल्लेख ठिकठिकाणीं कसा आलेला आहे हें प्रो. रा. द. रानडे, एम्. ए., यांनीं आपल्या अध्यात्मग्रंथमालेंतील ‘ ज्ञानेश्वरवचनामृत ’ या ग्रंथास लिहिलेल्या विद्वत्तापूर्ण प्रस्तावनेंत ( पृ. ९–११ ) स्पष्ट केलें आहे तें जिज्ञासूंनीं अवश्य पाहावें.

वडिलांकडून चालत आलेल्या पंथांत ज्ञानदेवांना इष्ट त्या बहुतेक गोष्टी सहजच दिसल्या. ज्ञानदेव नाथपंथी खरे; परंतु त्यांचे मंत्र श्रीकृष्णोपासनेचे. यामुळें श्रीकृष्ण हें त्यांचें प्रिय दैवत आणि पांडुरंगमूर्ति म्हणजे श्रीकृष्णाची, त्यांच्याच भाषेंत बोलावयाचें म्हणजे डोळस रूपाची, सुंदर गोपवेष धारण केलेली उघडी मूर्तिच. शिवाय त्यांना प्रिय असलेलें हरिहरैक्य या मूर्तींतच सांठवलेलें होतें. श्रीपांडुरंगांनीं मस्तकावर शिवलिंग धारण करून दोघांचें ऐक्य दर्शविलें याचा ते स्वतःच पुढीलप्रमाणें उल्लेख करितात:—

“ रूप पहातां तरी डोळसु । सुंदर पहातां गोपवेषु ।
महिमा वर्णितां महेशु । जेणें मस्तकीं वंदिला ॥*”

हा पंथ सर्वप्रकारें अद्वैत तत्त्वज्ञानावर उभारलेला आहे. पंढरपुरचा भागवतसंप्रदाय व रामानुजीय भागवतसंप्रदाय एक नाहींत. दुसरा द्वैती

* ज्ञानदेवमहाराजांचे अभंग ८९

आहे तर पहिला पूर्ण अद्वैती आहे. वेदप्रामाण्य मानून वर्णाश्रमव्यवस्था मान्य करणारा असा हा पंथ होता. परंतु वेदप्रामाण्याबरोबर यांत कर्मठता न शिरतां सर्वांस सुलभ असा भक्तिमार्गच या पंथानें प्रामुख्यानें स्वीकारला आणि बाह्यांगापेक्षां अंतरंगावर अधिक भर दिला. या व आणखी अशाच कारणांमुळें ज्ञानदेवांनीं आपल्या कार्यप्रसारास याच पंथाचा उपयोग करून घेतला. संत बहिणाबाईच्या भार्षेत सांगावयाचें म्हणजे त्यांनींच भागवतसंप्रदायमंदिराचा पाया रचण्याचें काम केलें आणि त्यावर हें आध्यात्मिक मंदिर उभारलेंः–

" ज्ञानदेवें रचिला पाया । उभारिलें देवालया ॥ "

## वाङ्मयाची स्थिति

आतां ज्ञानदेवकालीन मराठी वाङ्मयाची स्थिति काय होती हें थोडक्यांत पाहूं व हें प्रकरण आटपूं. दीर्घकालपर्यंत असाच समज होता कीं, मराठी भार्षेतील आद्य कृति म्हणजे साधुवर्य मुकुंदराज यांचे 'विवेकसिंधु' व 'परमामृत' हे ग्रंथ होत.परंतु हे दोन्ही ग्रंथ लहान असून त्यांची भाषाहि किंचित् अर्वाचीन वाटते. यामुळें मराठींतील पहिला मोठा ग्रंथ म्हणजे ज्ञानेश्वरी असा बरींच वर्षें समज होता. परंतु अलीकडे प्रकाशित झालेल्या महानुभावीय मराठी वाङ्मयावरून मराठी भार्षेत ज्ञानेश्वरीच्या कालापूर्वी चांगलें वाङ्मय होतें हें निर्विवाद सिद्ध झालें आहे. इतर वाङ्मय तर होतेंच; पण गीतेवरहि ज्ञानेश्वरीच्या पूर्वी निदान ७ टीका असाव्यात असें संशोधनान्तीं आपणांस आढळून आल्याचें श्री. य. खु. देशपांडे यांनीं आपल्या 'महानुभावीय मराठी वाङ्मय' या पुस्तकांत म्हटलें आहे व त्या टीकांची यादीहि दिली आहे.

बडोद्याचे प्रो. चिं. वि. जोशी, एम्. ए. यांनीं विविधज्ञानविस्ताराच्या १९२८ च्या सप्टेंबरच्या अंकांत 'देशी भाषांचें प्राचीनत्व' म्हणून एक स्फुट लेख दिला आहे; त्यावरून शालिवाहनाच्या ७ व्या शतकांत मराठी भाषा बनत चालली असून स्वतंत्र नांव प्राप्त होण्याइतकें वैशिष्ट्य त्या कालींच

तिला प्राप्त झालें होतें. बहुजनसमाजांतून संस्कृत जसजसें कमी होऊं लागलें तसतसें ग्रंथकारहि ग्रंथ-निर्मिति देशी भाषांतूनच करूं लागले. यादव-वंशांत मराठी राज्यच असल्यामुळें स्वाभाविकपणें मराठी भाषेच्या वाढीस बरेंच उत्तेजन मिळालें. मराठीबरोबर संस्कृत भाषेचे अपभ्रंशहि प्रचारांत होते. नामदेव ज्ञानेश्वरीचें वर्णन करतांना "छप्पन्न भाषेचा केलासे गौरव। भवार्णवीं नाव उभारिली ॥" (ना. अ. ११२) असें म्हणतात. ज्ञानेश्वरींत कानडी शब्द आहेत एवढेंच नव्हे, तर ज्ञानदेवांचे दोनतीन कानडी अभंगहि प्रसिद्ध आहेत.

ज्ञानदेवपूर्वकालीं गीतेवर टीका होत्या असें वर म्हटलें आहे; परंतु बाराव्या अध्यायाच्या नमनांत ज्ञानदेव आपल्या गुरूजवळ "ये मऱ्हाठियेचिया नगरीं। ब्रह्मविद्येचा सुकाळु करीं"* इत्यादि जें मागणें मागतात, आणि ठिकठिकाणीं देशी भाषेंत ही गीतेची प्रतिकृति म्हणजे एक नवलावाची कृति आहे असें म्हणतात, त्यावरून ह्या टीका त्यावेळींसुद्धा विशेष प्रसिद्ध असाव्यात असें वाटत नाहीं. ज्ञानदेवकालीन बहुतेक मराठी वाङ्मय हें गीर्वाणभाषेंतील ग्रंथसंपत्ति मराठीच्या नगरांत आणून भरण्याच्या स्वरूपाचें असे. क्वचित् विवेकसिंधु, अनुभवामृत, गोरक्षगीता, अमरसंवाद, अथवा चक्रधरसूत्रपाठ इत्यादि लहानसहान अध्यात्मप्रकरणें स्वतंत्र अशीं लिहिलीं जात. गद्यवाङ्मयकृति अशी फारच थोडी दिसून येते. पद्यग्रंथांतून 'आबालसुबोध' ओवी छंदच वापरला जाई. नामदेवांनीं या ओवी-छंदांतूनच अभंगवृत्त काढून त्याचा प्रसार केला. तात्पर्य, ज्ञानेश्वरीपूर्वी उत्तम विचार सुवेषांत मराठींत मांडतां येतील अशी तिची वाढ झाली होती; व या कामीं महानुभावियांनीं वाङ्मयाची बरीच सेवा करून तिच्या अभिवृद्धीस मदत केली होती ही गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे.

---

* ज्ञा. अ. १२, ओ. १३-१६ व अ. ६, ओ. १३२-३४

# प्रकरण दुसरें

## गुरुसंप्रदाय व कुलपरंपरा

उपजालिया बाळकासी तत्त्वतां । पंचविध जाण पिता ।
जनिता आणि उपनेता । तिजा प्रतिपाळिता अन्नदानें ॥
जो भयापासोनि सोडविता । जो बंधविमोचन करविता...
यांवेगळा पांचवा पिता । जो झाडणी करी पंचभूतां ॥
मृत्यूपासून सोडविता । जो गर्भव्यथा निवारी ॥

**एकनाथी भागवत** अ. १२, ओ. ८१-८३

मागील प्रकरणांत ज्ञानदेव यांस त्यांचे वडील बंधु निवृत्तिनाथ यांजकडून नाथसंप्रदाय प्राप्त झाला व प्रत्यक्ष वडील विठ्ठलपंत यांजकडून वारकरीसंप्रदायाचा मार्ग परिचित झाला असें सांगितलें. आतां प्रस्तुत प्रकरणीं निवृत्तिनाथ व विठ्ठलपंत या दोन पित्यांच्या द्वारा–कारण ज्ञानेश्वरीच्या शेवटीं ज्ञानदेव स्वतःस ‘ निवृत्तिनाथसुत ’ असें म्हणवितात व विठ्ठलपंत हें यांच्या वडिलांचें नांव होतें ही गोष्टहि तितकीच प्रसिद्ध आहे–ज्ञानदेवांस जीं दोन कुलें प्राप्त झालीं त्यांचा वृत्तांत थोडक्यांत निवेदन करूं.

तथापि त्यापूर्वी एका शंकेचें निवारण होणें अवश्य आहे. निवृत्तिनाथकुल व विठ्ठलपंतकुल हे दोन मातृपितृवंश असते तर कांहीं पंचाईत नव्हती. परंतु वर तर निवृत्तिनाथ व विठ्ठलपंत या दोघांसहि पितेच म्हटलें आहे. अर्थात् अशी ही अलौकिक रीत पत्करण्यापेक्षां कोणी म्हणेल कीं, ज्ञानदेव हे दोन होते असेंच कां समजूं नये ! एक निवृत्तिनाथांचे चिरंजीव ज्ञानेश्वरीकर्ते व दुसरे विठ्ठलपंतांचे चिरंजीव अभंगकर्ते. एका धोंड्यानें जसे दोन पक्षी मरावे तसे या युक्तीनें दोन्ही अडचणी दूर होतात. ज्ञानदेवांस दोन पिते होते असें म्हणण्याचा लोकविलक्षण प्रसंग येत नाहीं; आणि ज्ञानेश्वरी व अभंग यांच्या भाषेंत व प्रमेयांत दिसून येणाऱ्या अंतराचाहि उलगडा होतो.

पैकीं दुसऱ्या अडचणीचें निराकरण पुढें ज्ञानदेवांच्या ग्रंथकर्तृत्वाचा विचार करतांना करण्यांत येईल. सांप्रत पहिल्या अडचणीपुरताच येथें विचार करूं. या शंकेचें उत्तर प्रस्तुत प्रकरणाच्या आरंभींच ज्या नाथ-भागवतांतील ओव्या उद्धृत केल्या आहेत त्यांत आलें आहे. शिवाय ज्ञानेश्वरीच्या शेवटीं ज्ञानदेवांनीं आपला 'निवृत्तिनाथसुत' म्हणून जो उल्लेख केला तो आपल्या मांसवंशाला उद्देशून केलेला नव्हे, ही गोष्ट त्याच ओवींतील त्या उल्लेखाच्या मागचे शब्द व ती ओवी ज्या प्रकरणांत आली आहे तें प्रकरण यांचा विचार केला म्हणजे कळून येणार आहे. ती संपूर्ण ओवी[1] अशीः—

"तेथ महेशान्वयसंभूतें । श्रीनिवृत्तिनाथसुतें ॥
केलें ज्ञानदेवें गीते । देशीकार लेणें ॥

या ओवीच्या मागें कांहीं ओव्या सोडून ज्ञानदेवांनीं आपली आदि-नाथापासून चालत आलेली गुरुपरंपरा दिली आहे; आणि तेंच शांकर-संप्रदायगत धन या ग्रंथरूपानें माझे गुरु जे निवृत्तिनाथ त्यांनीं मला दिलें असें स्पष्ट म्हटलें आहे[2]:—

"ना आदिगुरु शंकरा—। लागोनि शिष्यपरंपरा । बोधाचा हा संसारा । जाला जो आमुतें ॥ तो हा तूं घेऊनि आघवा ।.................. एवं गुरुक्रमें लाधलें । समाधिधन जें आपुलें । तें ग्रंथें बांधोनि दिधलें । गोसावी मज ॥"

या सर्व ओव्यांवरून १८०५ व्या ओवींतील 'महेशान्वयसंभूतें' याचा अर्थ 'नाथसंप्रदायांतील' व 'निवृत्तिनाथसुत' म्हणजे 'निवृत्तिनाथशिष्य' असाच कसा केला पाहिजे हें स्पष्ट दिसून येईल. जातां जातां या ओवींतील 'महेशान्वयसंभूतें' या शब्दावरून कै. वि. ल. भावे यांनीं मागें एकदा

(१) ज्ञा. अ. १८।१८०५ (२) ज्ञा. अ. १८।१७५८–६२

काढलेल्या क्लृप्तीचें[1] वैयर्थ्य दाखविणें अप्रस्तुत होणार नाहीं. 'महेशान्वय-संभूतें' या शब्दसमुच्चयावरून त्यांनीं असें सुचविलें होतें कीं, ज्ञानदेवांचें आडनांव 'महिषे' अथवा 'म्हैसे' असें असण्याचा संभव आहे. वास्तविक 'महेश' हा शब्द ज्ञानदेव 'शंकर' या अर्थीं नेहमीं वापरतात; व हें दाखविणाऱ्या ज्ञानेश्वरींत किती तरी ओव्या आढळतील. शिवाय ही ओवी संप्रदाय–प्रकरणांतील आहे ही गोष्ट लक्षांत घेतां कै. भावे यांनीं सुचविलेली कल्पना किती अस्थानीं आहे हें उघड होत आहे. तसेंच हेंहि लक्षांत घेतलें पाहिजे कीं, जर 'महेश' पदाचा अर्थ 'म्हैसे' करावयाचा तर 'निवृत्तिनाथसुत' याचा अर्थ 'निवृत्तिनाथांचा मुलगा' असाच करावा लागेल; आणि मग ज्ञानदेवांचें संपूर्ण नांव 'ज्ञानदेव निवृत्तिनाथ म्हैसे' असें होईल. परंतु ही गोष्ट श्री. भावे यांच्या लिखाणावरून त्यांसहि कबूल झाली नसती. तात्पर्य, 'महेशान्वयसंभूतें' या शब्दसमुच्चयानें 'नाथसंप्रदायांतील' हाच अर्थ ज्ञानदेवांस अभिप्रेत आहे ही गोष्ट निर्विवाद होय.

येणेंप्रमाणें निवृत्तिनाथ हे ज्ञानदेवांचे गुरु होत ही गोष्ट सिद्ध झाली. परंतु ज्ञानेश्वरींत "जे तान्हेनि मियां अपत्यें । आणि माझे गुरु एकलौते[2]" असा स्वतः ज्ञानदेवांनीं आपण निवृत्तिनाथांचे पुत्र आहों असा उल्लेख केला आहे! याचा अर्थ एवढाच कीं, संप्रदायविद् हे गुरूपासून दीक्षाग्रहण हा आपला नवा जन्म समजतात आणि गुरूला वडील मानून तसा त्यांचा उल्लेख करितात. खुद्द मनुस्मृतीमध्येंहि 'उत्पादकब्रह्मदात्रोर्गरीयान् ब्रह्मदः पिता ।' असें म्हटलें आहे. तेव्हां 'निवृत्तिनाथसुतें'

(१) वि. ल. भावेकृत '**महाराष्ट्र सारस्वत**', आवृत्ति दुसरी, पृ. ४१. पुढील आवृत्तींत श्री. भावे यांनींच ही क्लृप्ति गाळली आहे; परंतु तसें करतांना त्यांनीं कारण दिलेलें नाहीं. यास्तव पुनः यासंबंधीं शंका राहूं नये म्हणून येथें तिची चर्चा केली आहे.

(२) ज्ञा. अ. १५-१९

या शब्दसमुच्चयानें गोंधळून जाऊन दोन ज्ञानदेव कल्पिण्याचें कारण नाहीं. उलटपक्षीं, प्रकरणारंभीं उद्धृत केलेल्या नाथांच्या ओव्यांतून सांगितलेला पांचवा पिता अनायासें घरच्याघरीं ज्ञानदेवांना लाभलल्यामुळें त्यांचा पुढील आयुष्यक्रम इतका लोकोत्तर कसा झाला हें आपल्या ध्यानीं येतें. असो. आतां त्यांच्या या दोन कुळांचा म्हणजे गुरुपरंपरेचा व कुलपरंपरेचा विचार करूं.

## गुरुसंप्रदाय

ज्ञानदेवांनीं आपली गुरुपरंपरा ज्ञानेश्वरीच्या शेवटीं दिली आहे. त्या ओव्या महत्त्वाच्या असल्यानें येथें उद्धृत करणें इष्ट आहेः—.

“ क्षीरसिंधुपरिसरीं । शक्तीच्या कर्णकुहरीं । नेणों कैं श्रीत्रिपुरारीं । सांगितलें जें ॥ तें क्षीरकल्लोळा आंतु । मकरोदरीं गुप्तु । होता तयाचा हातु । पैठें जालें ॥ तो मत्स्येंद्र सप्तशृंगीं । भग्नावयवा चौरंगी । भेटला कीं तो सर्वांगीं । संपूर्ण जाला ॥ मग समाधि अव्यत्यया । भोगावी वासना यया । ते मुद्रा श्रीगोरक्षराया । दिधली मीनीं ॥ तेणें योगाब्जिनीसरोवरु । विषयविध्वंसैकवीरु । तिये पदीं का सर्वेश्वरु । अभिषेकिले ॥ मग तिहीं तें शांभव । अद्वयानंदवैभव । संपादिलें सप्रभव । श्रीगहिनीनाथा ॥ तेणें काळि कळितु भूतां । आला देखोनि निरुता । ते आज्ञा श्रीनिवृत्तिनाथा । दिधली ऐसी ॥......तेथ पुढां मी बापिया । मांडला आर्ती आपुलिया । कीं यासाठीं येवढिया । आणिलों यश ॥ ”

या ओव्यांवरून आदिनाथ हे या संप्रदायाचे प्रवर्तक होत. तथापि ज्ञानदेवांच्या मतेंहि आदिनाथांनीं क्षीरसमुद्राच्या सन्निध भागांत पार्वतीस

---

( १ ) अशीच परंपरा दाखविणारे ‘ आदिनाथ उमा बीज प्रगटलें ’ व ‘ आदिनाथ गुरु सकळ सिद्धांचा ’ असे आरंभ असलेले अनुक्रमें निवृत्तिनाथांचे व ज्ञानदेवांचे अभंग आहेत.

( २ ) ज्ञा. अ. १८।१७५१-६२

नेऊन तिला नाथसंप्रदायाचा केव्हां उपदेश केला याचा काळ सांगतां येत नाहीं. यासंबंधीं सांप्रदायिक वृत्तान्त उपलब्ध आहे तो असा. पार्वतीस सांगितलें गेलेलें ज्ञान माशाच्या पोटांत शिरून भगवान् विष्णूनें ग्रहण केलें. पार्वतीस समाधि लागल्यामुळें तिचें हुंकार देणें थांबल्यावर मकरोदरस्थ विष्णुच हुंकार देत होते. पुढें पार्वती समाधिस्थ आहे व ती हुंकार देत नाहीं असें आदिनाथांस कळून आल्यावर त्यांनीं हुंकार कोण देतो म्हणून पाहिलें तों माशाच्या बाजूनें त्यांस कानोसा लागला व त्यांनीं आपला त्रिशूळ मारला. त्यासरशीं विष्णु बाहेर आले. ते माशाच्या पोटांत होते म्हणून त्यांस 'मत्स्येंद्र' म्हणूं लागले. हे मत्स्येंद्रनाथ गुरुपरंपरेंतील दुसरे पुरुष होत.* शंकराच्या त्रिशूळानें मत्स्येंद्राचा कान फाटला व तेव्हांपासून या पंथांतील लोक आजमितीस कान फाडून त्यांत कुंडलें घालतात, म्हणून या पंथांतील लोकांस 'कानफाटे' म्हणण्याचा प्रघात आहे. मत्स्येंद्रांनीं आपल्या योगबलानें सप्तशृंगीच्या डोंगरावर चौरंगीनाथ लोळागोळा होऊन पडले होते त्यांस ' सर्वांगीं संपूर्ण ' केलें. पुढें मत्स्येंद्रांनीं गोरक्षनाथांस उपदेश दिला. मत्स्येंद्र व गोरक्षनाथ हे या परंपरेंतील मोठे तेजस्वी पुरुष होऊन गेले. यांचे संस्कृत व प्राकृत ग्रंथ प्रसिद्ध असून यांच्यासंबंधीं निरनिराळ्या कथाहि प्रसिद्ध आहेत. मागील प्रकरणांत म्हटल्याप्रमाणें यांचीं स्थानें उत्तरहिंदुस्थानांत दाखवितात, तर पंढरपुरास प्रतिवर्षीं यांच्या पालख्या अनुक्रमें मत्स्येंद्रगड व औढ्या नागनाथ येथून येतात. गोरक्षनाथांनीं आपलें ' शांभव अद्वयानंदवैभव ' गहिनीनाथांच्या (यांचें नांव ' गैनीनाथ ' असेंहि लिहिलेलें आढळतें. ) हवालीं केलें. यांचीहि पालखी मोंगलाईतून प्रतिवर्षीं पंढरपुरास येत असते. नाथसंप्रदायाचा व ज्ञानदेवांच्या घरण्याचा पूर्वींपासूनच फार निकट संबंध होता, या गोष्टीचा मागील प्रकरणांत उल्लेख आलाच आहे. गहिनीनाथांची व निवृत्तिनाथांची निवृत्तिनाथ हे त्र्यंबकक्षेत्रीं ब्रह्मगिरि

---

* आदिनाथापासूनच जालंदरनाथ, कानीफनाथ व मैनावती अशी दुसरी एक शिष्यपरंपरा आहे.

पर्वताला प्रदक्षिणा घालतांना वाट चुकले असतां अंजनीपर्वतावरील गुहेंत गांठ पडली. तेथें गहिनीनाथांनीं निवृत्तिनाथ यांस सात दिवस ठेऊन घेऊन आपणांस आदिगुरु शंकरापासून प्राप्त झालेला बोध त्यांच्या हवालीं केला; व त्यांस अशी आज्ञा केली कीं, हा बोध तूं घेऊन कलीकडून गिळिल्या जाणाऱ्या सर्व जीवांना सर्वप्रकारें संकटांत सत्वर मदत कर. ज्ञानदेव म्हणतात कीं, मेघांना वर्षाकाळाची जोड मिळाली म्हणजे ते जशी जोराची वृष्टि करतात, त्याप्रमाणें स्वभावतःच कृपाळु असलेल्या निवृत्ति-नाथांना ही गुरु-आज्ञा मिळाली व ही गीतार्थग्रथनरूप ( ज्ञानेश्वरीरूप ) शांतरसाची वृष्टि झाली. ज्ञानदेव हे मोठ्या नम्रतेनें म्हणतात कीं, ती वृष्टि झाली तेव्हां मी चातकपक्षी आपल्या उत्कट इच्छेनें पुढें येऊन उभा राहिलों; व या कारणामुळेंच मी एवढ्या यशाला आणिला गेलों. [1]तात्पर्य, निवृत्तिनाथांनीं ज्ञानदेवांस उपदेश केला आणि ज्ञानदेवांनीं आपले धाकटे बंधु सोपानदेव व बहीण मुक्ताबाई यांना उपदेश दिला, अशी थोडक्यांत या नाथसंप्रदायाची ज्ञानदेवादि चार भावंडांपर्यंत परंपरा आहे.

मागील प्रकरणांत ज्ञानदेव व मानभावपंथ यांची चर्चा करतांना एका गोष्टीसंबंधानें पुढील प्रकरणावर हवाला दिला होता, तिचा येथें विचार करून हें गुरुपरंपरेचें प्रकरण आटपूं. पुण्यांत प्रसिद्ध होणाऱ्या ' ज्ञानसिंहे '[2] नांवाच्या मानभावी मासिकांत ज्ञानदेव हे मानभावी आहेत होते असें ठरविणारा एक लेख आला होता. त्याचा मतितार्थ हा कीं, ज्ञानेश्वर हे नाथसंप्रदायी नसून मानभावी पंथांतील होते. त्यांचें मूळचें नांव विद्याधर होतें व त्यांनीं विद्या विवेकसिंधुकार मुकुंदराजांपासून संपादिली. परंतु हें विधान व तें सिद्ध करण्याकरितां लेखकानें पुढें आणिलेले पुरावे इतके निःसत्त्व आहेत कीं, त्या प्रत्येकाचा विचार करण्याचें कारण नाहीं.

---

( १ ) ज्ञा. अ. १८, ओ. १७५१-६३ ( २ ) नोव्हेंबर १९२६

शिवाय तसें करण्यास येथें स्थलावकाशहि नाहीं. तेव्हां त्यांतील एका मूलभूत मुद्दयाचें प्रस्तुत स्थळीं परीक्षण केल्यास पुरें होईल. कै. वि. का. राजवाडे यांनीं छापलेल्या ज्ञानेश्वरीच्या प्रस्तावनेंत एक श्लोक दिला आहे, त्यावरून ज्ञानेश्वरांचें पूर्वीचें नांव विद्याधर असलेंच पाहिजे असें सदरहू लेखकानें ठाम ठरविलें आहे. तो श्लोक असाः—

" श्रीसद्गुरुमुकुंदेन दत्ता ज्ञानेश्वरी शुभा ।
विद्याधराय शिष्याय स्वीए स्वत्वं न शोभते ॥"

परंतु या श्लोकांत मुकुंद सद्गुरूनें विद्याधर नामक शिष्यास ज्ञानेश्वरी दिली एवढेंच सांगितलें आहे. मुकुंदराज हे ज्ञानेश्वरांचे गुरु होते याबद्दल यत्किंचित् तर्क करण्यास त्यांत आधार नाहीं. शिवाय त्या लेखकानें मुकुंदराजांची परंपरा आदिनाथ (श्रीदत्तात्रय) यांच्यापासून आरंभ करून श्रीचक्रधर ( हरिनाथ ), रामचंद्र ( रघुनाथ ) द्वारा मुकुंदराजांपर्यंत पोंचविली आहे; सरतेशेवटीं ज्ञानेश्वर हे मुकुंदराजांचे शिष्य आहेतच असें गृहीत धरून "श्रीज्ञानेश्वरांची गुरु परंपराहि वरील लेखाच्या आश्रयानें मुकुंदराजाशींच बहुतकरून जुळते" असें म्हटलें आहे. परंतु ज्ञानेश्वरीच्या शेवटीं स्वतः ज्ञानदेवांनीं जी आपली गुरुपरंपरा दिली आहे ती वर दिलीच आहे. ती व मुकुंदराजांची गुरुपरंपरा पाहिली असतां वाचकांना 'आदिनाथा' खेरीज एकाचेंहि नांव या दोन्ही परंपरांत आढळणार नाहीं. तसेंच महानुभावीयानें दिलेल्या परंपरेंतील एकाहि योग्याचें नांव नवनाथलीलामृत या ग्रंथांत, मत्स्येंद्रसंहितेंत, अथवा निवृत्तिनाथ, ज्ञानदेव, सोपानदेव, मुक्ताबाई, विसोबा खेचर इत्यादिकांच्या गुरुपरंपरेचे म्हणून दिलेल्या अभंगांत सांपडत नाहीं. इतका सर्वांशीं भिन्न परंपरा दाखविणारा भरभक्कम पुरावा असतां त्या दोन्ही परंपरा 'बहुतकरून' एकच आहेत असें विधान करणें म्हणजे विलक्षण साहस होय, यापेक्षां अधिक आपण काय म्हणूं शकूं ! तात्पर्य, ज्ञानदेवांस मानभावी पंथांत ओढण्याचा प्रयत्न व्यर्थ आहे. नाथपरंपरा हीच त्यांची खरी गुरुपरंपरा होय.

## कुलपरंपरा

चरित्राच्या प्रारंभीं चरित्रनायकाचा कुलवृत्तांत देण्याची नेहमीची रीत सोडून ज्ञानदेवांच्या गुरुसंप्रदायाची माहिती आम्हीं या प्रकरणाच्या आरंभीं दिली आणि नंतर त्यांच्या कुलपरंपराकथनाकडे वळत आहों हें पाहून कित्येकांस आश्चर्य वाटेल; परंतु तसें आश्चर्य वाटण्याचें कारण नाहीं. कां कीं, प्रस्तुत चरित्रकथनांत आम्ही चरित्रनायकाच्याच धोरणानें चालत आहों. ज्ञानदेव आपल्या जनक मातापित्यांचा स्पष्ट असा उल्लेख आपल्या कोणत्याहि ग्रंथांत करीत नाहींत. 'ज्ञानदेव' असा आपला सरळ उल्लेख जेथें ते करीत नाहींत तेथें बहुतेक आपल्या उपास्यदेवतेचा अथवा गुरूचा उल्लेख करून 'बापरखुमादेविवरु' किंवा 'निवृत्तिनाथसुत' या शब्दसमुच्चायानें ते आपला निर्देश करितात. 'बापरखुमादेविवरु' असा उल्लेख ज्ञानदेवांच्या कित्येक अभंगांच्या शेवटीं आढळतो; त्या सामासिक शब्दाचा विग्रह 'रुक्मिणीचे पति विठ्ठलपंत आहेत ज्यांचे वडील' असा करणें असंभवनीय नाहीं. परंतु बहुतेक सर्वच ठिकाणीं प्रस्तुत शब्दसमुच्चयानें आपलें उपास्य दैवत जें 'श्रीरुक्मिणीपांडुरंग' त्याचाच ते उल्लेख करीत असतात, असें वाचकांस आढळून येईल. आतां त्यांच्या जनक मातापित्यांचीं नांवेंहि विठ्ठल व रुक्मिणी होतीं हा एक केवळ काकतालीयन्यायानें घडून येणारा योगायोग होय. आपल्या ओवीग्रंथांत पुष्कळ ठिकाणीं 'निवृत्तिनाथसुत' असा आपला उल्लेख ते करतात याचा अर्थच असा कीं, त्यांनींच ज्ञानेश्वरींत वर्णिलेल्या गुरुभक्ताप्रमाणें ते आपणांस 'गुरुकुळें सुकुलीनु' व 'गुरुबंधुसौजन्यें सुजनु' समजत असत; आणि गुरूसच 'माता व पिता' मानीत. अर्थात् आम्हींहि त्यांच्या पूर्वजांचें वर्णन करण्याचा प्रसंग प्राप्त झाला असतां प्रथम त्यांच्या गुरुसंप्रदायाचा वृत्तान्त सांगितला व आतां त्यांच्या लौकिक कुलपरंपरेकडे वळत आहों. असो.

महाराष्ट्रांतील नावाणलेल्या साधूंच्या वाडवडिलांचा विचार करतां बहुतेक साधूंचे आईबाप 'शुद्धबीजापोटीं। फळें रसाळ गोमटीं॥' या तुकोक्तीस सार्थत्व आणणारे शुचि व धर्मपरायण असे दिसतात इतकेंच नव्हे, तर त्यांच्या कुलांत त्यांच्याहि पूर्वी कित्येक पिढ्या 'चिंता ही ईश्वराची पति-

व्रता ' होऊन बसलेली दिसते. तुकारामबोवांची पंढरीची वारी ही त्यांच्या वाडवडिलांनीं जीव देऊन मिळविलेली व उपासपारणेंद्वारा दारवंटा रक्षण करून त्यांस भोगवट्यास दिलेली 'मिरास' होती. तुकारामबोवांच्या घराण्यांत त्यांच्या पूर्वीं सात पिढ्या पंढरीची वारी होती. एकनाथांचे पणजे भानुदास हे तर तत्कलीन साधूंत चमकणारे तेजस्वी असे भक्तभानुच होते. ज्ञानदेवांच्या पूर्वजांचेंहि असेंच आहे. ज्ञानदेवांचे पणजोबा त्र्यंबकपंत आणि आजा व आजी गोविंदपंत व नीराबाई ही मंडळी नाथानुगृहीत भगवद्भक्त होती हें प्रसिद्धच आहे./

श्री. ल. रा. पांगारकर यांनीं आपल्या ' श्रीज्ञानेश्वरमहाज ' चरित्रांत ( पृष्ट २९ ) ज्ञानदेवांची वंशावळ खालील प्रमाणें दिली आहे:—

**वंशावळ**

हरिहरपंत ( आपेगांवचे कुळकर्णी )

- रामचंद्रपंत
  - गोपाळपंत
    - त्र्यंबकपंत ( हयात शके ११२९ )
      - गोविंदपंत × नीराबाई ( पैठणच्या कृष्णाजीपंत देवकुळ्यांची बहीण )
        - विठ्ठलपंत × रुक्मिणीबाई ( आळंदीचे कुळकर्णी सिधोपंत यांची कन्या )
          - निवृत्तिनाथ (जन्म श. ११९५)
          - ज्ञानेश्वरमहाराज (श. ११९७)
          - सोपानदेव (श. ११९७)
          - मुक्ताबाई (श. १२०१)
      - हरिपंत ( मृत्यु शके ११३५ )
- केशवपंत
- मोहनाबाई ( × नरहरपंत माचवे देवगडकर )

ज्ञानदेवांचे पूर्वज प्रतिष्ठाना ( पैठण ) पासून चार कोसांवर गोदावरीच्या उत्तरकाठीं वसलेल्या आपेगांवचे राहणारे. तेथील कुळकर्णपण त्यांच्या घराण्यांत बऱ्याच पिढ्या चालत आलेलें होतें. हे माध्यंदिन शाखेचे देशस्थ यजुर्वेदी* ब्राह्मण असून यांचें गोत्र पंचप्रवरान्वित वत्स हें होतें.

ज्ञानदेवांच्या पूर्वजांची, माहिती त्यांच्या पणजांचे पणजे हरिहरपंत कुळकर्णी यांचेपासून पुढची मिळते. हे शके १०६०च्या सुमारास आपेगांवचें कुळकर्ण पाहत असत. यांस तीन अपत्यें झालीं. रामचंद्रपंत व केशवपंत नांवाचे दोन मुलगे व मोहनाबाई नांवाची एक मुलगी. मोहनाबाई ही देवगडकर नरहरपंत माचवे यांस दिली होती. केशवपंत हे मुंज झाल्यावर एक वर्षानेंच वारले. थोरले रामचंद्रपंत यांनीं वडील निवर्तल्यावर बरींच वर्षें कुळकर्णपण उत्तम चालविलें आणि ते कालवश झाले. तदनंतर त्यांचे चिरंजीव गोपाळपंत हे कुळकर्णपण पाहत असत; आणि यांचेच चिरंजीव त्र्यंबकपंत होत. हे प्रथम तत्कालीन यादव राजांच्या पदरीं नोकरीस होते. त्यांनीं पांच वर्षें बीड देशाच्या देशाधिकाऱ्याचें कामहि केलें. त्यांस गोविंदपंत व हरिपंत असे दोन पुत्र होते. धाकटे हरिपंत हे सिंघण राजाकरितां लढत असतां धारातीर्थीं पडल्यामुळें यांस वैराग्य उत्पन्न झालें. पुढें यांची व गोरक्षनाथांची गांठ पडून गोरक्षनाथांनीं यांस उपदेश देऊन अनुगृहीत केलें. ज्ञानदेवांच्या पूर्वीं त्यांच्या कुलांत भगवद्भक्त असे प्रथम हेच झाले. त्यांची समाधि आपेगांवीं आहे; व त्यांचाच उल्लेख नामदेवांनीं

---

* ज्ञानदेव यजुःशाखीय होते यास त्यांच्या ग्रंथांतहि एक गमक आहे. यजुःशाखीय ब्राह्मणांचा वेदघोष ज्यांच्या कानांवर पडला असेल त्यांना माहीत आहेच कीं, तच्छाखीय ब्राह्मण हे आजमितीसहि उच्चार करतांना ' ष ' च्या ऐवजीं ' ख ' असा उच्चार करतात. ज्ञानेश्वरींत किती तरी ठिकाणीं ओवीच्या चरणान्तींचें यमक ' ष ' च्या ऐवजीं सहजच ' ख ' घातला गेल्यामुळें साधलें गेलें आहे.

मुक्ताबाईच्या समाधिवर्णनाच्या अभंगांत कुळाचा 'आदिपुरुष' म्हणून केला आहेः—

" भक्त त्र्यंबकपंत मूळ पुरुष आदि । तयाची समाधि आपेगांवीं "

**ज्ञानदेवमहाराजांचे अभंग**, अ. ११७४

त्र्यंबकपंतांमागून त्यांचे ज्येष्ठ चिरंजीव गोविंदपंत हे कुळकर्णपण पाहूं लागले. यांच्या कुटुंबाचें नांव नीराई अथवा नीराबाई. ह्या पैठण येथील कृष्णाजीपंत देवकुळयांच्या भगिनी. दोघांनाहि गहिनीनाथांनीं उपदेश दिलेला होता. दोघेंहि सात्त्विक असून स्वकर्मनिरत अशीं होतीं. निरंजन-माधवांनीं खालील श्लोकांत या दांपत्याचा कार्यक्रम सुरेख वर्णिला आहेः—

" सारी षट्कर्मयोगा विधिसहित सुखें आश्रमीं योगनिष्ठा ।
नीराई नाम भार्येसह भजत गुरुनाथ गैनी वरिष्ठा ॥
भक्तिप्रेमानुबंधें विरति अतिशयें वर्ततां काळ कर्मे ।
झाली गर्भासि धर्ती द्विजवर वनिता वर्ततां नित्य धर्मे ॥

**ज्ञानेश्वरविजय**, अ. १, श्लो. १९

गोविंदपंतांस वयाच्या ५५ व्या वर्षी नीराबाईपासून एक पुत्र झाला, त्याचें नांव विठ्ठल. हेच विठ्ठलपंत ज्ञानदेवादि चार भावंडांचे जनक होत.

विठ्ठलपंत हे लहानपणापासूनच विरक्त होते. नामदेवांनीं तर " भक्ति नवमास भरले पूर्ण दिवस । आलें वैराग्य डोळस मूर्तिमंत " असें त्यांच्या जन्माचें वर्णन केलें आहे; तें सार्थ नाहीं असें कोण म्हणेल ! ज्ञानाचे जनक होण्याचा अधिकार अथवा पात्रता 'डोळस' म्हणजे सविवेक वैराग्यासच आहे. कारण ज्ञानदेवच म्हणतात, 'तरी विरक्तीवांचूनि कंहीं । ज्ञानासि तगणेंचि नाहीं ॥ '* तेव्हां पुढें ज्ञानदेवांच्या रूपानें ज्ञानच जर जन्मास येणार आहे तर आगाऊ विठ्ठलपंतांच्या रूपानें त्रिवर्गाची सांडणी करणारें वैराग्य अवतरित व्हावें हें योग्यच होय. प्राप्तकालीं त्यांचा व्रतबंध होऊन शास्त्राध्ययनास आरंभ

* ज्ञानेश्वरी अ. १५, ओ. ३६

झाला. वेद, व्याकरण, व काव्य यांचें पठण करून विठ्ठलपंत अल्प वयांतच निपुण शास्त्रवक्ते तयार झाले. पूर्वी आपल्याकडे गुरुसमीप शास्त्राध्ययन झाल्यावर त्यास देशपर्यटनद्वारा प्रत्यक्ष अनुभवाची जोड देण्याची चांगली वहिवाट होती. एकनाथांच्या कालापर्यंतसुद्धा ती चालू होती, हें नाथांना जनार्दनस्वामींनीं यात्रा करून मग घरीं जाण्यास सांगितलें यावरून स्पष्ट आहे. विठ्ठलपंतांच्या बाबतींत तर यात्रागमनास आणखी एक कारण होतें. तें म्हणजे मुळांत त्यांच्या ठिकाणीं वास्तव्य करणारें वैराग्य हें होय. अर्थात् अध्ययन संपल्याबरोबर वडिलांना वंदन करून व त्यांची आज्ञा घेऊन विठ्ठलपंत सुमुहूर्तावर तीर्थाटनास निघाले.

ते निघाले ते प्रथम मुमुक्षूंची 'मोक्षविश्रांति' जी 'द्वारका' तेथें गेले. तेथें त्यांनीं कृष्णमूर्तीचें दर्शन घेतलें. तेथून ते पिंडारक, सुदामपुरी (पोरबंदर), मूळमाधव, भालुकातीर्थ, प्रभास, मुचुकुंदगुंफा इत्यादि तीर्थे करीत करीत नाशिक जिल्ह्यांतील सप्तशृंगी पर्वतावर आले. तेथील देवाचें दर्शन व कपाळेश्वराची पूजा करून त्र्यंबकास आले. कुशावर्तांत स्नान करून ज्योतिर्लिंगाचें दर्शन घेऊन भीमाशंकर येथें येऊन पोंचले. भीमा पाहून त्यास पंढरीचा आठव झाला व मन तिकडेच ओढूं लागलें. पंढरीच्या रस्त्यावर वाटेंत हा तरुण प्रवासी इंद्रायणीच्या तीरावर असलेल्या अलंकापुरीस (आळंदीस) प्राप्त झाला, अथवा महाराष्ट्राच्या भाग्यानेंच त्याला तेथें ओढून आणिला असें म्हणावयास हरकत नाहीं. ज्ञानदेवांच्या पूर्वीहि श्रीसिद्धेश्वर दैवतामुळें अलंकापुरी ही जुनाट शिवपीठ म्हणून प्रसिद्ध होती. यामुळें यात्रेकरूंची तेथें नेहमी येजा चालूच असे. इंद्रायणीचें स्नान करून सिद्धेश्वरासमोरील सुवर्ण-अश्वत्थाखालीं विठ्ठलपंत हे नित्यनेम करीत बसले असतां आळंदीचे कुळकर्णी * सिधोपंत हे सिद्धेश्वरदर्शनास आले; व त्यांना हा तेजःपुंज तरुण नित्यकर्म करतांना दिसला. त्यांनीं पांथस्थ

* सिधोपंतांकडे खेड, चाकण, आळंदी वगैरे चोवीस गांवांची कुळकर्णपणाची वृत्ति होती.

म्हणून त्यांस आपल्या घरीं भोजनास येण्याचा आग्रह केला व ते त्यांस घरीं घेऊन गेले. अजूनहि खेडेगांवांत बाहेरून येणाऱ्या पांथस्थाची विचारपूस केल्याशिवाय नैवेद्यभक्षण करीत नाहींत असे सद्गृहस्थ आढळून येतात. मग सिधोपंत तर गांवचे कुळकर्णी. त्यांना विचारपूस करणें प्राप्तच होतें. असो. घरीं गेल्यावर भोजनोत्तर गप्पागोष्टी होत असतां सिधोपंतांनीं विठ्ठलपंतांस घरीं कोण कोण माणसें आहेत, घरीं वृत्ति कसली आहे, तीर्थयात्रा प्रसंग कोण्या निमित्तें प्राप्त झाला वगैरे सर्व गोष्टी विचारून घेतल्या. कारण सिधोपंत हे विठ्ठलपंतांची चर्या, अध्ययन व मुखावरील तेज पाहून संतुष्ट झाले होते; व आपली कन्या रुक्मिणी हिच्याकरितां हा वर म्हणून त्यांनीं मनानें लगेच योजूनहि ठेविला होता. याच दृष्टीनें पुढें त्यांनीं विठ्ठलपंतांस आपल्याच घरीं राहण्याचा आग्रह केला; आणि योगायोग असा कीं, त्याच दिवशीं रात्रीं "स्वप्नावस्थेमाजि पंढरीनाथें येउनि कन्या सालंकृत यासी द्यावी" असें सिधोपंतांस सांगितलें. अर्थात् प्रातःकाळीं उठतांच सिधोपंतांनीं आपली इच्छा विठ्ठलपंतांसमोर प्रकट केली व आपणांस पडलेलें स्वप्न सांगितलें. निरंजनमाधव हीच गोष्ट खालील शब्दांत गोड रीतीनें वर्णन करतातः—

" ज्ञानी रूपस सत्कुलीन तरणा साधू तपस्वी असा ।
विद्यावंत विचारशील शुचिता सौजन्यसिंधू तसा ॥
गांभीर्यादि गुणें सदां विलससी सत्पात्र भाग्यें अम्हां ।
जामाता हरिनें दिल्हा न करितां सायास ये आश्रमा ॥ "

**ज्ञानेश्वरविजय** अ. १, श्लो. ४३

यावर विठ्ठलपंतांनीं "मला रामेश्वरास जाणें आहे, मातापिता दूर आहेत व शिवाय मला तशी देवाची आज्ञाहि झाली नाहीं. अर्थात् मला आपल्या कन्येचा अंगीकार करतां येत नाहीं" असें उत्तर दिलें. त्यावर सिधोपंतांनीं सांगितलें कीं, "आपण जाण्याची आजच घाई करूं नका, एक रात्र तरी राहा, व आमच्या सुदैवानें आपणांस रात्रीं आज्ञा झाली तर आम्हांला

स्थळ प्रत

पदरांत घ्या, नाहींतर आपण जाण्यास मोकळेंच आहां." या सौम्य शब्दांनीं विठ्ठलपंतांचें मन वळून त्यांनीं एक मास राहण्यास मान्यता दिली; आणि आश्चर्य हें कीं, अंगणांत तुळशीवृंदावनाजवळील ओट्यावर निजलेले असतांना विठ्ठलपंतांसहि दुसऱ्या रात्रीं स्वप्न पडलें. विश्वंभर स्वप्नांत येऊन म्हणाले:—

" भक्ति आणि ज्ञान वैराग्य आवडी । वसती उघडी तुझ्या अंगीं ॥
मूर्तिमंत चारी जन्म इच्या उदरीं । म्हणोनि स्विकारी आज्ञा माझी ॥ "

**नामदेवमहाराजांचे अभंग**, अ. ८८९।१६-१७

प्रातःकाळीं उठल्यावर विठ्ठलपंतांनीं आपलें स्वप्न सिधोपंतांस सांगितलें; व होणार तें टळणार नाहीं, असें म्हणून त्यांची कन्या अंगीकारण्याची तयारी दर्शविली. विठ्ठलपंतांची ही तत्परता पाहून सिधोपंतांस साहजिकच परम हर्ष झाला; आणि जोशास बोलावून दोघांचें घटित पाहतां छत्तीस गुण उतरतात असें त्यांस आढळून आलें. * लागलीच ज्येष्ठमासीं सुमुहूर्त पाहून सिधोपंतांनीं आपली कन्या विठ्ठलपंतांस सालंकृत अशी विधियुक्त अर्पण केली.

विवाह ज्येष्ठांतच झाला यामुळें थोडक्याच दिवसांत पंढरपुरास दिंड्या, पताका घेऊन जाणारे वैष्णवांचे भार विठ्ठलपंतांच्या दृष्टीस पडूं लागले. त्यामुळें त्यांची पुनश्च तीर्थाटनाची, विशेषतः पंढरीची यात्रा पाहण्याची इच्छा बळावली; व त्यांनीं श्वशुराजवळ ती गोष्ट काढली. सिधोपंतांनीं मोठ्या आनंदानें संमति दिली; एवढेंच नव्हे तर तेहि आपल्या मुलांमाणसांसह यात्रेस निघाले. वाटेंत जामाताची हरिरंगीं रंगलेली वृत्ति पाहून सिधोपंतांस आपल्या कन्येला असा उत्तम वर मिळाला म्हणून वारंवार आनंद व्हावा. होतां होतां सर्व मंडळी पंढरपुरास पोंचली व सर्वांनीं ' विटेवरी

* सिधोपंतांचें गोत्र त्रिप्रवरान्वित वाशिष्ठ होतें व मुलीचें जन्मनाम मीनाक्षीदेवी होतें, असें वे. शा. श्री. र. भिंगारकर हे ' श्रीज्ञानदेवचरित्र, ' पृष्ठ १२ वरील टीपेंत लिहितात.

उभा कटेवरी हात ' अशा श्यामसुंदर पंढरिनाथाचें दर्शन घेऊन त्याच्या चरणांवर लोटांगणें घातलीं. यात्रेचा अनुपम सोहळा पाहून झाल्यावर विठ्ठलपंतांनीं सासऱ्यास आपला रामेश्वरास जाण्याचा हेतु कळविला. तो जाणून सिधोपंतांनींहि त्यास अनुमति दिली व यात्रा संपवून लवकरच घरीं यावें असें सांगितलें.

आज्ञा मिळतांच विठ्ठलपंत दक्षिणयात्रेस निघाले. श्रीशैल्य, व्यंकटाद्रि या क्षेत्रांस भेट देऊन विठ्ठलपंत रामेश्वरास येऊन पोंचले. अशा रीतीनें आपला संकल्प पुरा करून कांहीं दिवसांनीं ते आळंदीस परत आले. अलंकापुरास आल्यावर स्वाभाविकच विठ्ठलपंतांस आपल्या वृद्ध आई-बापांस भेटण्याबद्दल हुरहुर लागली आणि त्यांनीं सिधोपंतांजवळ आपेगांवीं जाण्याची आज्ञा मागितली. सिधोपंतांनीं ती अर्थात् दिली व निघण्याची तयारी करून सर्वच मंडळीं थोड्या दिवसांत आपेगांवास जाऊन पोंचली.

इकडे गोविंदपंत व नीराबाई हीं आपल्या एकुलत्याएक मुलाची सारखी वाट पाहत होतीं. अशा स्थितींत अकस्मात् मुलगा सुखरूप येऊन भेटला एवढेंच नव्हे, तर तो स्नुषेस घेऊन आला व त्याला बोळवण्यास व्याहीविहीणहि आलीं, हें पाहून त्या वृद्ध दांपत्याचा हर्ष गगनांत मावेनासा झाला. सिधोपंतांनींहि आपल्या कन्येच्या सासूसासऱ्यांस वस्त्रें, अलंकार देऊन त्यांचा योग्य मान केला व ते आपल्या घरीं परतले.

विठ्ठलपंत घरीं राहूं लागल्यावर कांहीं दिवस त्या कुटुंबास मोठे सुखाचे गेले. परंतु पुढें थोड्याच दिवसांनीं विठ्ठलपंतांचे वडील व आई दोघेंहि वृद्धापकाळ फार झाल्यामुळें वैकुंठवासी झालीं; आणि प्रपंचाचा सर्व भार विठ्ठलपंतांवर येऊन पडला. पण विठ्ठलपंत तर मुळापासूनच विरक्त. यामुळें संसाराची चिंता अशी ते करीतच नसत. देवावर सर्व भार ठेऊन अखंड समाधानवृत्तीनें राहत. ह्या त्यांच्या उदासीन वृत्तीची वार्ता सिधोपंतांच्या कानीं गेली तेव्हां ते समाचाराकरितां आपेगांवीं आले. आल्यावर ते विठ्ठल-पंतांस म्हणाले कीं, " संसार वित्तावांचून होत नाहीं; आणि तुम्ही तर असे

उदास. तेव्हां येथें राहण्यापेक्षां आमच्याकडे चला. मग एकदोन मुलें झालीं म्हणजे वाटल्यास इकडे परत या. " देवानें आयतेंच गाऱ्हाणें ऐकलें, असें मानून विठ्ठलपंत कुटुंबाला घेऊन आळंदीस आले. अलंकापुर क्षेत्रास आल्यावर त्यांचा नित्यक्रम खालीलप्रमाणें होताः—

" नित्य हरीकथा नामसंकीर्तन । संतांचें दरुशन सर्वकाळ ॥
पंढरीची वारी आषाढी कार्तिकी । विठ्ठल एकाएकी सुखरूप ॥ "

**नामदेवमहाराजांचे अभंग,** अ. ८५९।२-३

याप्रमाणें दिवसामागून दिवस जाऊं लागले. परंतु त्यायोगें विठ्ठलपंतांची वृत्ति संसारांत वसण्याऐवजीं संसारांतून अधिकाधिक उठूंच लागली. शिवाय लग्न होऊन बरेच दिवस झाले तरी रखुमाबाईस अपत्य होण्याचा संभव दिसेना. तेव्हां विठ्ठलपंतांनीं मधूनमधून 'संन्यास घ्यावासा वाटतो; वाराणसीस जावयाची परवानगी दे.' असें आपल्या पत्नीस म्हणावें. तिनें ही गोष्ट आपल्या वडिलांस सांगितली. तेव्हां वडिलांनीं तिला शिकविलें कीं, पुनः विचारतील तेव्हां 'संततीवांचूनि न घ्यावा हा संन्यास' असें सांग. विठ्ठलपंतांनीं तर तो घोषच घेतल्यामुळें ते रखुमाबाईला सारखे विचारीत व केव्हां पत्नीच्या तोंडांतून 'जा' असे उद्गार येतात याची वाटच पाहत. एकदा 'दुश्चित' असतां, रखुमाबाईनें त्यांच्या नित्याच्या प्रश्नास 'जा' म्हणून उत्तर दिलें. ही पडल्या फळाची आज्ञा समजून विठ्ठलपंत त्याच दिवशीं रात्रीं रखुमाबाई निद्रित असतां तिला टाकून एका वस्त्रानिशीं काशीच्या रस्त्यास लागले ! सकाळीं जाग्या होऊन रखुमाबाई पाहतात तो पति घरांत नाहीं. लगेच ही वार्ता त्यांनीं आपल्या वडिलांस कळविली. त्यांनीं पुष्कळ शोध केला; पण पतीचा पत्ता लागला नाहीं. मग रखुमाबाईनाच विचार करतां असें आढळून आलें कीं, आपलीच वाचा आपणास भोंवली ! आपणच पतीस दुश्चित असतां परवानगी दिली. अर्थात् ते काशीसच गेले असले पाहिजेत. तेव्हां आतां पति परत येण्याची आशा नाहीं असें पाहून आपल्या

जन्माचें सार्थक करण्याकरितां सुवर्ण—अश्वत्थाची सेवा करण्यास त्यांनीं आरंभ केला.

इकडे विठ्ठलपंत निघाले ते थेट काशीस पोंचले; आणि कोणा एका 'श्रीपादां'कडून* ते संन्यासग्रहण करते झाले. चैतन्याश्रम ( विठ्ठलपंतांचें चतुर्थाश्रमींचें नांव ) हे गुरूजवळ शास्त्राध्ययन व वेदान्तचिंतन करीत असतां एकदा त्यांच्या गुरूस रामेश्वराच्या यात्रेस जाण्याची इच्छा झाली. आश्रमाची व्यवस्था चैतन्याश्रमावर टाकून स्वामी जे निघाले ते क्षेत्रांस भेट देत देत थेट आळंदीस आले; किंबहुना रखुमाईच्या दैवानेंच त्यांना तेथें आणिलें, असें म्हणण्यास हरकत नाहीं. सुवर्ण-अश्वत्थास प्रदक्षिणा घालीत असतां सत्पात्र स्वामी पाहून रखुमाईनें त्यांना नमस्कार केला. यावर स्वामींनीं तिला 'पुत्रवती होईं' असा आशीर्वाद दिला. हा आशीर्वाद ऐकून साहजिकच रखुमाबाईस सखेद हसूं आलें. तें पाहून स्वामींनीं हसण्याचें कारण विचारलें. तेव्हां तिनें आपली सर्व परिस्थिति सांगितली. अधिक शोध करतां आपण ज्यास आश्रम दिला तोच चैतन्याश्रम हिचा पति असला पाहिजे, असा स्वामींस संशय येऊं लागला; आणि त्यांनीं रखुमाईस तिच्या वडिलांकडे आपणांस घेऊन जाण्यास सांगितलें. घरीं गेल्यावर तर त्यांचा हा संशय दृढ झाला व चैतन्याश्रम तोच हिचा पति असा त्यांच्या मनानें ठाम निश्चय केला. तेव्हां स्वामी पंतांस म्हणाले कीं, "हिच्या दोषास्तव माझें सर्व पुण्य लयाला जातें. तेव्हां तुम्ही दोघें

---

* के. रा. गोडबोले आपल्या 'भारतीय अर्वाचीन कोशां'त ह्या श्रीपादांचें नांव रामानंद होतें व हेच कबिराचे गुरु होत, अशी माहिती देतात. बहुतेक अर्वाचीन चरित्रकारहि तसेंच समजतात. परंतु निळोबा मात्र चांगदेव-चरित्रांत त्यांचें नांव 'नृसिंहाश्रम' म्हणून देतात. [ सकलसंतगाथा, निळोबा, अ. १५५४ ]. हें नांव विठ्ठलपंतांचें 'चैतन्याश्रम' म्हणून जें नांव ठेविलेलें आढळून येतें त्याच्याशीं जुळतें.

मजबरोबर काशीस चला. मी तुमची व विठ्ठलपंताची गांठ घालून देतों व त्याला पुनः रखुमाबाईचा स्वीकार करण्यास लावतों."

लगेच रुक्मिणीबाई, सिधोपंत इत्यादि सर्व मंडळीस घेऊन श्रीपादस्वामी काशीस परत गेले. तेथें आळंदीच्या मंडळीस दुसरीकडे ठेवून आपण एकटेच आश्रमांत आले. गुरुजी अचानक परत आलेले पाहून चैतन्याश्रमास आश्चर्य वाटलें व त्यानें मध्येंच परतण्याचें कारण विचारलें. त्यावर स्वामींनीं त्यास कारण तूंच आहेस असें बजाविलें व तुझ्या घरीं कोण-कोण आहेत तें खरें सांग, असा दरडावून प्रश्न केला. चैतन्याश्रमाच्या लक्षांत सर्व प्रकार येऊन त्यानेंहि खरी हकीकत निवेदन केली; आणि आपण पत्नीची अनुज्ञा घेऊन निघालों असें सांगून स्वामींच्या चरणांवर मस्तक ठेविलें. त्यावर स्वामींनीं चैतन्याश्रमास उठवून त्याची व रखुमाबाईची गांठ घालून त्यास खालील उपदेश केलाः--

" ... ... ... ... ... । म्हणती करीं ग्रहण इचें आतां ॥
अविधी कर्माचें न धरावें भय । यासी आहे साह्य जगदीश ॥
स्वदेशा जाउनी करावा आश्रम । सुखरूप स्वधर्म चालवावा ॥"

**नामदेवमहाराजांचे अभंग**, अ. ८९९।७-८

ज्ञानदेवांनींच ज्ञानेश्वरीच्या तेराव्या अध्यायांत* वर्णन केल्याप्रमाणें, " गुरुसंप्रदायधर्म । तेचि जयाचे वर्णाश्रम । गुरुपरिचर्या नित्यकर्म । जयाचें गा ॥ गुरु क्षेत्र गुरु देवता । गुरु माता गुरु पिता । जो गुरुपूजेपरौता । मार्गु नेणें ॥ जयाचें वक्त्र । वाहे गुरुनामाचे मंत्र । गुरुवाक्यावांचूनि शास्त्र । हातीं न शिवे ॥ " त्यांच्या वडिलांची गुरुभक्ति होती. यामुळेंच स्वामींची आज्ञा शिरसावंद्य करून चैतन्याश्रम संन्यासी पुनः गृहस्थाश्रमी झाले; आणि दक्षिणेंत येऊन पहिल्या कुटुंबाबरोबर संसार करूं लागले.

या ठिकाणीं आम्ही एक गोष्ट वाचकांच्या निदर्शनास मुद्दाम आणून ठेवतों. पूर्वोक्त ' श्रीपाद 'गुरु हे अधीत व वैराग्यसंपन्न जे विठ्ठलपंत त्यांनीं

* ओव्या ४४४-४५, ४७

पसंत केलेले, अर्थात् शास्त्रनिष्णातच स्वामी असले पाहिजेत. शिवाय सर्व क्षेत्रांत श्रेष्ठ ठरलेलें व विद्येचें माहेरघर म्हणून प्रसिद्ध असलेलें जें काशी क्षेत्र, तेथील ते रहिवासी व शिष्य पढवणारे गुरुजी होते. इतक्या सर्व गोष्टी लक्षांत घेतां ते चतुर्थाश्रम स्वीकारलेल्या विठ्ठलपंतांस पुनः गृहस्थाश्रमाची अनुज्ञाच देतात असें नव्हे, तर आपण होऊन पुनः द्वितीयाश्रम स्वीकारण्याचा आग्रह करतात—नव्हे बलात्कार करतात, यावरून स्वतः श्रीपादस्वामींना तरी आपण जी गोष्ट करतों ती शास्त्रदृष्ट्या अतिनिषिद्ध व घोर पापरूप ( कीं जिला देहान्ताशिवाय प्रायश्चित्तच नाहीं ) आहे असें खचित वाटत नसावें, हें त्यांच्या प्रत्यक्ष कृतीवरूनच ठरत आहे; किंबहुना काशींतील पंडितवर्गासहि तें तितकें निषिद्ध वाटत नव्हतें असें दिसतें. कारण, संस्कृत ग्रंथाचें मराठींत रूपांतर केल्याबद्दल रागावणारे संन्यासी व पंडित चतुर्थाश्रम्यास आग्रहपूर्वक द्वितीयाश्रमांत ढकलून पत्नीचा अंगीकार करावयास लावणाऱ्या संन्यासी महाराजांस दंड केल्याशिवाय राहतील हें संभवतच नाहीं. परंतु ज्ञानदेवांच्या कोणत्याहि चरित्रांत या श्रीपादांचा काशीच्या संन्याशांकडून अथवा पंडितांकडून छळ झाला, असा उल्लेख नाहीं. ही गोष्ट प्रामुख्यानें वाचकांसमोर मांडण्यांत आमचा काय हेतु आहे हें पुढें उघड होईलच. म्हणून तूर्त त्याची येथें अधिक परिस्फुटता करीत नाहीं.

# प्रकरण तिसरें

## जन्म, कर्म व समाधि

ज्ञानदेवांचीं मातापितरें–विठ्ठलपंत व रुक्मिणी–ज्या काळांत होऊन गेलीं त्या काळच्या आणि आजकालच्या धार्मिक व सामाजिक परिस्थितींत जमीन-अस्मानाचें अंतर आहे. त्या काळीं धर्म हा समाजाचा प्राण समजला गेल्यामुळें सामाजिक व ज्ञातिविषयक निर्बंध अतिशय कडक रीतीनें पाळिले जात. अशा स्थितींत एकदा चतुर्थाश्रम स्वीकारल्यानंतर विठ्ठलपंत पुनः गृहस्थाश्रमी होऊन संसार करूं लागले, हा असाधारण व जनरूढिविरुद्ध प्रकार पाहून सर्व लोक या दांपत्याचा " वाः छान संन्यास बोवा ! " म्हणून उपहास करूं लागले असल्यास त्यांत आश्चर्य कसलें ! अर्थात् शिष्ट ब्रह्मवृंदानें त्यांस वाळींत टाकिलें आणि आप्तवर्ग त्यांची उपेक्षा करूं लागला. विठ्ठलपंत मात्र गुरुवचनावर अढळ विश्वास ठेवून समाधानवृत्तीनें शास्त्राभ्यास व ईशचिंतन करीत काळ घालवूं लागले. विठ्ठलपंतांस त्या काळीं किती त्रास भोगावा लागला असला पाहिजे याची कांहीं कल्पना निरंजन माधवांनीं त्या वेळचें जें वर्णन केलें आहे त्यावरून येईल. ते म्हणतातः—

"चैतन्याश्रम हा गृहाश्रम करी हें ऐकिलें ब्राह्मणीं ।
केला त्याग यया कुळासि सकळीं त्या सौहृदाच्या गणीं ॥
कोणी दर्शनही कदापि न करी वंदील तैं कोणता ।
याच्या पाहुनि लोकनिंदित पथा मानी कसा जाणता ॥
झाला कीं उपहास फारचि जनीं भिक्षा मिळेना तदा ।
पाला भक्षुनि वृक्षसंभव कधीं तोयाशनें एकदा ॥
भक्षी वायु कधीं कधीं करतळीं भिक्षान्न मागोनिया ।
ऐसा द्वादश वर्ष काळ क्रमिला माया न चित्तीं तया ॥ "

**ज्ञानदेवविजय, अ. २, श्लो. ५६–५७**

येणेंप्रमाणें विठ्ठलपंतांनीं ज्ञातिबहिष्कृतता, स्वजनपरित्याग व जननिंदा इत्यादि दुःखें सहन करीत गांवाबाहेरील झोंपडींत ज्ञानदेवादींच्या जन्मापूर्वीं बारा वर्षें ईशचिंतनांत, पण अतिशय आपत्तींत काढलीं. लौकिकदृष्ट्या त्यांच्या आयुष्याचा हा भाग अत्यंत हीन परिस्थितींत गेलेला दिसतो. परंतु पुढें जें घडून आलें त्यावरून मागचा विचार करूं लागल्यास असें वाटतें कीं, पुढें जीं चार दिव्य रत्नें यांच्या उदरीं येणार होतीं त्यांना जन्म देण्यास योग्य अशी पवित्र, सात्त्विक व समर्थ भूमिका निर्वाळण्याची ही त्यांची तपश्चर्याच चालली होती. ज्ञानदेव हे ज्ञानेश्वरीच्या सहाव्या अध्यायाच्या * शेवटीं योगभ्रष्ट कोठें जन्म घेतात याचें वर्णन करतात, तेव्हां ते आपल्या कुलपरंपरेचेंच शब्दचित्र रेखाटीत आहेत असें म्हटल्यास हरकत नाहीं.

अशा हालअपेष्टा सोशीत सुमारें बारा वर्षें गेल्यावर शके ११९० सालीं रुक्मिणीबाई गर्भवती होऊन त्यांस पुत्ररत्न झालें. त्याचें नांव या जोडप्यानें 'निवृत्ति' असें ठेविलें. त्यानंतर शके ११९३, ११९६ व ११९९ मध्यें अनुक्रमें दोन मुलगे व एक मुलगी जन्मलीं. त्यांचीं नांवें ज्ञानदेव,†

* "पाठीं जन्मे संसारीं । परी सकळ धर्मांचिया माहेरीं । लांबा उगवे आगरीं । विभवश्रियेचा ॥ जयातें नीतिपंथें चालिजे । सत्यधूत बोलिजे । देखावें तें देखिजे । शास्त्रदृष्टी ॥ वेद तो जागेश्वरु । जया व्यवसाय निजाचारु । सारासारविचारु । मंत्री जयातें ॥ जयाच्या कुळीं चिंता । जाली ईश्वराची पतिव्रता । जयातें गृहदेवता । आदिऋद्धि ॥ ऐसी निजपुण्याचिया जोडी । वाढिन्नली सर्वसुखाची कुळवाडी । तिये जन्मे तो सुरवाडी । योगच्युतु ॥"—ज्ञा. अ ६ ओ. ४४४–४८

† कै. गो. का. चांदोरकर, धुळें, यांनीं 'केसरी'च्या ता. १८–११–१९१३ च्या अंकांत 'ज्ञानेश्वरांचें मूळचें नांव कोणतें ?' याबद्दल चर्चा केली होती. त्यांच्या मतें ज्ञानेश्वरांचें पाळण्यांतील नांव 'विद्याधर' असून 'ज्ञानदेव' हें त्यांचें सांप्रदायिक नांव होय. परंतु पाळण्यांतील नांव व सांप्रदायिक नांव असा ज्ञानेश्वरांच्या बाबतींत श्री. चांदोरकर जो भेद करितात, त्यास त्यांच्या कल्पनेपलीकडे आधार नाहीं असें म्हणणें भाग आहे, हें प्रस्तुत लेखकानें **'केसरी-प्रबोध'** मधील 'ज्ञानेश्वर व ज्ञानेश्वरी' या लेखांत स्पष्टपणें दाखविलें आहे.

सोपानदेव व मुक्ताबाई अशीं त्यांनीं ठेविलीं. पैकीं दुसरे ज्ञानदेव हेच या चरित्रग्रंथाचे विषय होत, हें निराळें सांगण्याचें कारण नाहीं. नामदेवांच्या अभंगावरून या चारहि भावंडांचा जन्म आपेगांवीं[1] झाला हें उघड आहे. मुक्ताबाईच्या समाधिवर्णनांत नामदेव म्हणतातः—

"नामा म्हणे आम्हां दाविलें नारायणें । झालीं चौघीजणें याचि क्षेत्रीं ॥"

नामदेव, अ. ११७४।५

वर निवृत्तिनाथादि चार भावंडांचे आम्हीं जे जन्मशक दिले आहेत त्यांस आधार जनाबाईचा खालील अभंग आहे:—

"शालिवाहन शके अकराशें नव्वद । निवृत्ति आनंद प्रगटले ॥
त्र्याण्णवाच्या सालीं ज्ञानेश्वर प्रगटले । सोपान देखिले शाण्णवांत ॥
नव्याण्णवाच्या सालीं मुक्ताई देखिली । जनी म्हणे केली मात त्यांनीं ॥"

जनाबाई, अ. २७७

या भावंडांचे जन्मशक* व तिथि पुढीलप्रमाणेंहि दिलेलीं आढळतात:—

श्री. चांदोरकर यांच्या म्हणण्याप्रमाणें ज्ञानदेवांचें पाळण्यांतील नांव 'विद्याधर' व सांप्रदायिक नांव 'ज्ञानदेव' असतें, तर या चारहि भावंडांचे आद्य चरित्रकार जे नामदेव त्यांनीं तसा उल्लेख केला असता. परंतु नामदेव तसा उल्लेख करींत नाहींत एवढेंच नव्हे, तर या चारहि भावंडांची जीं प्रसिद्ध नांवें आहेत तीं पाळण्यांतलींच आहेत, असें खालील कडव्यांतून दाखवितातः—

"ऐसीं बारा वर्षें क्रमिलीं निगुती । झालीसे संतती चौघेजण ॥
निवृत्ति ज्ञानेश्वर सोपान मुक्ताबाई । हांसती सकळही ऐकुनि नांवें ॥"

नामदेव, अ. ९००।४-५

हीं सर्व नांवें स्वजनपरित्यक्त एकांतवासी विठ्ठलपंतांच्या अंतःकरणाचीं निदर्शक होत, असें आम्हांस वाटतें.

१ उद्बोधनाथहि एका पदांत या भावंडांचा जन्म आपेगांवींच झाला असें म्हणतात.

* प्रस्तुत जन्मशक व तिथि हीं कै० भिंगारकर, श्री. ल. रा. पांगारकर व

१ निवृत्तिनाथ—शके ११९५ श्रीमुख संवत्सर, माघ वद्य १, सोमवार, प्रातःकाळ.

२ ज्ञानदेव—शके ११९७ युवा संवत्सर, श्रावण वद्य ८, गुरुवार, मध्यरात्र.

३ सोपानदेव—शके ११९९ ईश्वर संवत्सर, कार्तिक शुद्ध १५, रविवार, प्रहर रात्र.

४ मुक्ताबाई—शके १२०१ प्रमाथि संवत्सर, आश्विन शुद्ध १ शुक्रवार, मध्याह्न.

दिवसेंदिवस हीं चार मुलें मोठीं होत चाललीं. परंतु त्याबरोबर असें म्हणण्यास हरकत नाहीं कीं, विठ्ठलपंत व रुक्मिणी यांचे हाल अधिक वाढूं लागले. समाजबंधनें तोडणाऱ्यांना स्वतःला जे हाल सोसावे लागत नाहींत असे विलक्षण हाल या बंधनातीत झालेल्या जोडप्यांच्या प्रजेस सोसावे लागतात. बंधनापलीकडे गेलेलें जोडपें हें समाजावर फारसें अवलंबून नसतें. कारण त्याचे एका अंत्यविधीखेरीज सर्व संस्कार झालेले असतात. परंतु मुलांचें तसें नसतें. त्यांचा सर्व जन्म अद्यापि जावयाचा असून

---

'महाराष्ट्र सारस्वत'कार कै० भावे हे देतात. यांपैकीं भिंगारकर व पांगारकर ( श्रीज्ञानेश्वर महाराज चरित्र, पृ. ४६ ) यांनीं जनाबाई, नामदेव, विसोबा खेचर व 'ज्ञानेश्वरविजय'कर्ते सच्चिदानंदबावा यांचे जन्मशक व तिथि देणारे अभंग दिले आहेत. तथापि त्यांनीं दिलेले नामदेव, जनाबाई व विसोबा खेचर यांचे अभंग हल्लीं प्रसिद्ध असलेल्या इंदिराप्रेस, चित्रशाळा व जगद्धितेच्छु यांनीं छापिलेल्या गाथ्यांत आढळत नाहींत. आजगांवकर यांनी 'महाराष्ट्र कविचरित्र' भाग ६, यांत दोन्ही शक दिले आहेत. ( पृ. ८ ); व या दोहोंतून खरा जन्मकाल कोणता या बाबतींत खालील निकाल दिला आहे. ते म्हणतात, "या दोन कालांची एकवाक्यता करण्याचा प्रयत्न करण्यांत कांहीं अर्थ नाहीं हें सांगावयास नकोच. या दोहोंतील कोणता तरी एक काल कदाचित् खरा असेल किंवा बहुतकरून दोन्ही खोटे असतील."

त्यांचे सर्व संस्कार व्हावयाचे असतात. हे आपल्या लेकरांचे भावी हाल ज्या मातापित्यांच्या मनश्चक्षूंस दिसूं लागतात, त्यांचा अपत्यजन्मानें होणारा आनंद फार काळ टिकणारा नसतो. आतां आपण जसा समाज-विधिवस्त्राचा त्याग केला, तसाच आपल्या अपत्यांनींहि करावा, अशा तामसी वृत्तीचे अथवा त्यांचे पुढें काय व्हावयाचें असेल तें होवो, आपण तर मनसोक्त वागा, अशा स्वार्थी वृत्तीचे जनक असल्यास प्रश्नच नाहीं. परंतु जेथें शास्त्रसंस्कारांविषया श्रद्धा व आदर आहे तेथें मात्र हीं मुलें म्हणजे मनास एक अखंड टोचणीच होय, असें म्हणण्यास हरकत नाहीं.

ज्ञानदेवांचे वडील हे दुसऱ्या वर्गांतले होते; व त्यांच्या डोळ्यांसमोर कठोर समाज त्यांस लहानपणींच कशाप्रकारें त्रास देत होता, हें नित्यशः दिसत होतें. विठ्ठलपंत कांहीं दिवस आपेगांवीं व कांहीं दिवस आपल्या श्वशुरांच्या गांवीं आळंदीस राहत असत. आळंदीस गांवाबाहेर पर्णकुटिकेंत आपल्या लहान अर्भकांसह ते राहत असतां या कुटुंबास अत्यंत हाल-अपेष्टा व अपमान सहन करावा लागे. विठ्ठलपंतांच्या मुलांचें नुसतें मुख-दर्शन झालें तरीहि गांवांतील लोक अपशकुन झाला असें समजत!

ज्ञानदेवादि चार भावंडांना अशा रीतीनें ग्रामस्थांकडून बाहेर जरी फार उपद्रव भोगावा लागत होता, तरी घरांत मात्र त्यांना अतिशय सात्त्विक, वैराग्यसंपन्न व शुद्धाचरणी अशा मातापित्यांच्या सहवासाचा लाभ झालेला होता. त्यांतून विठ्ठलपंत स्वतः चांगले व्युत्पन्न असल्यामुळें या मुलांवर लहानपणींच विद्येचे उत्तम संस्कार झाले असतील यांत शंका नाहीं. अल्प वयांत रचिलेल्या ज्ञानेश्वरींतहि भारत, भागवत, योगवासिष्ठ इत्यादि ग्रंथांचे दाखले सांपडतात याला जीं अनेक कारणें आहेत, त्यांपैकीं ज्ञानदेवांचें बालपण व्युत्पन्न अशा वडिलांच्या सहवासांत गेलें हें एक असणें संभवनीय आहे. शिवाय या सर्व भावंडांची बुद्धि वयाच्या मानानें विलक्षण प्रौढ होती. ज्ञानदेवांनीं, “ तत्र तं बुद्धिसंयोगं लभते पौर्वदेहिकम् ” या गीतेंतील

सहाव्या अध्यायाच्या ४३ व्या * श्लोकावर टीका करतांना जणुं काय आपलेंच वर्णन केलें आहे असें वाटतें.

येणेंप्रमाणें सर्व भावंडांचें लहानपण चाललें असतां पोक्त बुद्धीचे व सर्वांत वडील असे जे निवृत्तिनाथ यांचा व त्यांच्या मातापितरांचा आपल्या सुखदुःखाविषयीं नित्य संवाद चाले. एके दिवशीं अशी कल्पना निघाली कीं, आपण कांहीं तरी उग्र तपश्चर्या केली पाहिजे; कारण त्याशिवाय या उपद्रवापासून सुटका होणें शक्य नाहीं. त्याप्रमाणें सर्व मंडळी त्या काळीं प्रसिद्ध असलेल्या त्र्यंबक क्षेत्रास गेली; आणि शरीरदंड म्हणून तेथून समीपच गोदावरींचें उगमस्थान असा जो ब्रह्मगिरि पर्वत त्यास त्या सर्वांनीं दररोज प्रदक्षिणा घालण्यास सुरुवात केली. ही प्रदक्षिणा घालीत असतांच निवृत्तिनाथ यांस गहिनीनाथांचा उपदेश झाला हें मागें सांगितलेंच आहे. प्रस्तुत अकल्पित घडलेल्या गोष्टीमुळेंच या चारहि भावंडांच्या जीवितास निराळेंच वळण लागलें.

ब्रह्मगिरीस प्रदक्षिणा घालीत असतां वाघाच्या भीतीनें जीव घेऊन पळत पळत गुहेंत शिरणारे निवृत्तिनाथ हे गुहेंतून बाहेर आले ते "घरा येवो पां स्वर्ग। कां वरि पडो वाघ। परी आत्मबुद्धीसी भंग। कदा नोहे॥"‡ अशा अभयगुणानें मंडित असणाऱ्या स्वानंदसाम्राज्याचे सम्राट् बनून बाहेर आले! यामुळें ज्ञानदेवांचें मोठेंच कार्य झालें. कारण, ज्या ब्रह्मनिष्ठ सद्‌गुरूची गांठ पडणें म्हणजे बाहीं सागर तरण्यासारखें कठीण आहे अशी सर्व शास्त्रांतून गर्जना आहे, त्या सद्‌गुरूची भेट या भावंडांस घरबसल्या झाली. यामुळेंच गुरुभेटीकरतां शिष्यांत दिसून येणारी तळमळ व्यक्त करणारे अभंग या भावंडांच्या अभंगांतून फारसे आढळत नाहींत; आणि यांपैकीं

---

* "तैशी दशेची वाट न पाहतां। वयसेचिया गांवा न येतां। बाळपणींच सर्वज्ञता। वरी तयातें॥" ज्ञा. अ. ६।४५३

‡ ज्ञा. अ. १४।३५८

कोणासहि साधकावस्था फारशी भोगावी लागली नाहीं. एकत्र कुटुंबांत मिळविलेल्या संपत्तीचे आपल्या बंधूस वांटेकरी करणें जसें व्यावहारिकदृष्ट्या अवश्य तसेंच या पारमार्थिक धनासंबंधानेंहि होय, असें समजून निवृत्तिनाथांनीं आपले धाकटे बंधु जे ज्ञानदेव त्यांस आपणांस प्राप्त झालेल्या स्वानंदसाम्राज्याचे वांटेकरी केलें. ज्ञानदेवांच्या ठिकाणीं निवृत्तिनाथांविषयीं केवढा प्रेमादर वसत होता हें त्यांचें ज्ञानेश्वरी व अनुभवामृत ग्रंथ वाचणाऱ्यांसच कळून येणारें आहे. निवृत्तिनाथांचे ज्ञानदेव हे एकच शिष्य. ज्ञानदेव एके ठिकाणीं म्हणतातः—

" जे तान्हेनि मियां अपत्यें । आणि माझे गुरु एकलौते ।
म्हणोनि कृपेसि एकहातें । जालें तिये ॥" ज्ञा. अ. १५ । १९

ज्ञानदेवांनीं आपला धाकटा भाऊ सोपान व धाकटी बहीण मुक्ताबाई यांस तो बोध दिला. अशा रीतीनें हीं चारहि भावंडें उणीपुरीं आठ वर्षांचीं होण्याच्या आंतच देशकालवस्तुपरिच्छेदशून्य, सजातीयविजातीयस्वगतभेदशून्य, आनंदघन, आत्मरूप होऊन राहिलीं ! याच गोष्टीमुळें त्यांचें पुढील चरित्र अलौकिक झालें. प्रत्यक्ष ब्रह्मस्वरूप झाल्यामुळें स्वाभाविकच पुढें ब्रह्मगिरीस प्रदक्षिणा घालीत राहण्याचें कारण उरलें नाहीं; व हीं सर्व मंडळी आळंदीस परत आली.

आळंदीस परत आल्यावर ज्या अडचणींतून कसें बाहेर पडावें म्हणून विठ्ठलपंत फार दिवस विचार करीत होते ती अडचण त्यांच्यासमोर प्रत्यक्ष येऊन उभी राहिली. कारण, त्यावेळीं निवृत्तिनाथ हे उपनयन–संस्कार करण्यास योग्य असे झाले होते. विठ्ठलपंतांचें व त्यांच्या मुलांचें दर्शन झाल्यास आळंदी गांवचे लोक तर अपशकून समजत. मग विठ्ठलपंतांस जवळ करून त्यांच्या मुलांचें मौंजीबंधन करण्याची गोष्ट कोण काढणार ! समाजानें जरी त्यांचा इतका त्याग केला होता, तरी श्रद्धाळु विठ्ठलपंतांचा मोठा हेतु हा कीं, आपलें कर्म निदान आपल्या मुलांबाळांच्या अभ्युदयनिःश्रेयसाच्या तरी आड येऊं नये; आणि म्हणून आपल्या देखत एकदा

आपल्या मुलांचीं उपनयनें होऊन जावीं अशी त्यांची फार इच्छा होती. त्यांचे गुरु यावेळीं हयात नसावेसें दिसतें. कदाचित् काशीक्षेत्र दूर म्हणून अथवा या गोष्टीचा एकदा स्वतःच सोक्षमोक्ष लावावा म्हणूनहि विठ्ठलपंतांनीं त्यांच्याकडे धाव घेतली नसल्याचा संभव आहे. एवढी गोष्ट मात्र उघड दिसते कीं, यावेळीं विठ्ठलपंतांस आपल्या गुरूचा आधार नव्हता. यामुळें आपणांस वाळींत टाकणाऱ्या ब्रह्मवृंदास शरण जाण्याखेरीज त्यांस दुसरा मार्गच उरला नाहीं. म्हणून आळंदीकर ब्रह्मवृंदाची सभा भरवून त्यांस सर्वांनीं विनंती केली कीं,

"... ... ... ... ... । क्षमा अपराधा करा दीना ॥ ८ ॥
निर्बंधीं निर्णय पाहती धर्मशास्त्रीं । तुम्ही अति श्रौती परायण ॥ ९ ॥
सांगाल तें मान्य म्हणती साहजिणें । शुची हें करणें पतितांसी ॥१०॥"

**नामदेव**, अ. ९००

तेथें जमलेल्या पुण्यश्लोक, शास्त्रज्ञ, वैदिक महाजनांनीं ग्रंथ पाहिले. पण त्यांना विठ्ठलपंत व त्यांचे कुटुंब यांना पावन करून घेण्यास धर्मग्रंथांत आधार दिसेना ! त्यांनीं विठ्ठलपंतांस आपला कठोर निर्णय सांगितलाः—

" देहांत प्रायश्चित्त असे या बोलिलें । विचारूनि भले हित करा ॥
... ... आणीक नाहीं उपाव । "

**नामदेव**, अ. ९०१।२-३

विठ्ठलपंत हे मूळचेच विरक्त. त्यांस मायापाश पूर्वीपासूनच फार थोडा होता. यामुळें "माझ्या व माझ्या संततीच्या कल्याणाकरितां देहत्याग करणें अवश्य असेल तर मी त्रिवेणींत देह टाकून अथवा करवतीखालीं मान देऊन देहान्त प्रायश्चित्त अवश्य घेईन." असें म्हणून द्विजवरांस नमस्कार घालून विठ्ठलपंत आपली पत्नी व मुलें यांचा त्याग करून निघून गेले ! त्यांनीं पुनः परत म्हणून पाहिलें नाहीं. त्यांच्या मागून रखमाबाईहि निघून गेल्या !*

* मुक्ताबाईच्या समाधिवर्णनांत नामदेवांनीं मुक्ताबाईचें बोलणें दिलेलें

विठ्ठलपंतांची ही कृति पाहून त्यांच्या श्रद्धेविषयीं व आपल्या वडिलांस देहान्त प्रायश्चित्तासारखी कठोर शिक्षा शास्त्रानें भोगावयास लावली असतां सुद्धां त्या शास्त्राविषयीं "शास्त्र म्हणेल जें सांडावें। तें राज्यही तृण मानावें" इत्यादि म्हणणाऱ्या ज्ञानदेवांविषयीं कोणालाहि आदरच वाटेल. पण ज्या शास्त्रांनीं व त्यावेळच्या ज्या ब्राह्मणांनीं असला कठोर न्याय दिला त्यांबद्दल मात्र क्षणभर तरी वेगळीच भावना उत्पन्न होईल यांत शंका नाहीं. आम्हीं मागील प्रकरणाच्या शेवटीं यासंबंधीं किंचित् दिग्दर्शन केलें असून येथें तोच विचार थोडासा अधिक स्पष्ट करूं.

आपल्या धर्मशास्त्राचा जर आपण विचार करूं लागलों तर आपणांस असें दिसून येईल कीं, विठ्ठलपंतांचा प्रश्न इतक्या कठोरपणानें सोडविण्याशिवाय दुसरा मार्ग आपल्या धर्मशास्त्रांत सांगितलेला असूं नये, हें संभवत नाहीं. ज्या धर्मशास्त्रांत परधर्मांत गेलेल्यासहि कांहीं प्रायश्चित्त देऊन स्वधर्मांत परत घेण्यास मुभा आहे, ज्यांत गोळकांच्याहि मौंजीबंधनास अनुज्ञा आहे, त्या धर्मशास्त्रांत स्वपत्नीबरोबर व तेंहि वैषयिकदृष्ट्या प्रेरित होऊन नव्हे, तर गुरुवचनाचा आदर करावयाचा म्हणून गृहस्थाश्रम करून राहणाऱ्या गृहस्थास देहान्ताशिवाय प्रायश्चित्त नसावें, आणि त्याची संतति संस्कारानर्ह समजली जावी हें एक कोडेंच होय. परंतु वस्तुस्थिति तशी नाहीं. आपल्या ग्रंथांतून, विशेषतः याज्ञवल्क्य, अत्र्यादि स्मृतींतून या प्रश्नाचा विचार झालेला आहे; आणि आश्चर्याची गोष्ट ही कीं, त्यांत या आश्रमच्युतीच्या पातकास देहान्ताशिवाय अन्य प्रायश्चित्त सांगितलेलें आहे. मात्र

---

असून त्यांत आपले आईबाप आपेगांवाहून निघून गेले असें मुक्ताबाईनें म्हटलें आहे:—

"तात आणि माता गेलीसे येथून (आपेगांव)। तेव्हां आम्ही लहान पांडुरंगा॥"

**नामदेव**, अ. ११७५।२

परंतु हें म्हणणें त्यांच्याच वरील लिखाणाशीं विरुद्ध दिसतें.

दुर्दैवानें या भागाकडे फारसें कोणाचें लक्ष गेलेलें दिसत नाहीं. हा मुद्दा व तत्संबंधीं आधार हे वेदान्तवागीश श्रीधरशास्त्री पाठक* यांनीं 'ज्ञानेश्वरदर्शन' नामक ग्रंथाकरितां छापूं घातलेल्या आपल्या एतद्विषयक निबंधांत मांडून या प्रश्नाची सांगोपांग चर्चा केली आहे. तथापि हा प्रश्न चर्चेकरितां नवीनच पुढें येत असून त्याला दुसरी एक सबळ बाजू आहे एवढेंच स्थलसंकोचास्तव दर्शवून हा विषय सोडणें भाग आहे.

विठ्ठलपंत व रखुमाई यांनीं आपली इहलोकची यात्राच संपवली यामुळें त्यांच्यापुरता हा प्रश्न मिटला. परंतु मागें मुलें सर्व शिल्लक राहिलींच. त्या सर्वांत निवृत्तिनाथ ज्येष्ठ. त्यांनीं ब्रह्मसभेपुढें पुन: आपला प्रश्न मांडून पृच्छा केली कीं, "महाराज, आम्हांला काय गति?" यावर आळंदीकर ब्राह्मणांनीं सांगितलें कीं, तुम्ही पैठणास जाऊन शुद्धिपत्र घेऊन यावें, म्हणजे आम्ही तुम्हांस आमच्या जातींत घेऊं. पण निवृत्तिनाथ हे नुसते नांवाचे निवृत्ति नव्हते. ज्ञानदेवांनीं अमृतानुभवांत वर्णिल्याप्रमाणें, "प्रवृत्ति जमत नाहीं म्हणून निवृत्त झालेले असें नव्हे, तर निवृत्ति हें ज्यांचें स्वरूपच आहे असे" ते होते. यामुळें त्यांस शुद्धिपत्र आणावयाचें व नसतें कर्मबंधन आपल्या पाठीमागें लावून घ्यावयाचें, हा एक उपद्रवच वाटूं लागला. त्यांनीं ज्ञानदेवांना सांगितलें कीं, आपण जातिकुलातीत, नामरूपातीत, निजबोधरूप आहों; तेव्हां या देहाश्रित वर्णाश्रमकर्मबंधनाच्या भानगडींत पडण्याची आपली इच्छा नाहीं. परंतु ज्ञानदेवांचा तर वर्णाश्रमधर्माची घडी बसवावयाची व तत्प्रीत्यर्थ लोकसंग्रह करावयाचा असा हेतु. तेव्हां त्यांस हें कसें रुचावें? म्हणून निवृत्तिनाथांच्या बोलण्यावर ज्ञानदेव म्हणाले:—

"विधि वेद विरुद्ध संपर्क संबंध। नाहीं भेदाभेद स्वस्वरूपीं ॥१॥

---

* शास्त्रीबुवांनीं आपलें हस्तलिखित प्रस्तुत लेखकास वाचावयास देऊन त्याचा उल्लेख निबंध प्रसिद्ध होण्यापूर्वी करण्याची परवानगी दिली याबद्दल प्रस्तुत लेखक त्यांचा आभारी आहे.

अविधि आचरण परम दूषण । वेदोनारायण बोलियेला ॥२॥
स्वधर्म अधिकार जातीपरत्व भेद । उचित तें शुद्ध ज्याचें तया ॥३॥
म्हणोनियां संतीं अवश्य आचरावें । जना दाखवावें वर्तोनियां ॥४॥
कुळींचा कुळधर्म अवश्य पाळावा । सर्वथा न करावा अनाचार ॥५॥
प्रत्यवाय आहे अशास्त्रीं चालतां । पावन अवस्था जरी झाली ॥६॥
ज्ञानदेव म्हणे ऐकाजी निवृत्ति । बोलीली पद्धती धर्मशास्त्रीं ॥७॥"

नामदेव, अ. १०३

सोपानदेवांनींदेखील आपणांस पैठणला पावन होण्याकरितां जाण्याचें फारसें कारण नाहीं, असेंच सांगितलें. परंतु ज्ञानदेवांच्या आग्रहापुढें सर्वांसच मान वांकवावी लागली; व हीं सर्व मुलें आळंदीकर ब्राह्मणांचें पत्र घेऊन, त्यांस दंडवत घालून, त्यावेळीं दक्षिणकाशी म्हणून प्रसिद्ध असलेलें जें प्रतिष्ठान (पैठण) क्षेत्र तेथें गेलीं.

तेथील ब्रह्मवृंदासमोर आपली विनंती मांडण्याकरितां त्यांनीं तेथेंहि ब्रह्मसभा भरविली. जमलेल्या सभाश्रेष्ठांसमोर निवृत्तिनाथांनीं आळंदीकर ब्राह्मणांनीं दिलेलें पत्र ठेविलें व आपला खराखुरा वृत्तान्त निवेदन केला. तेव्हां हीं संन्याशाचीं पोरें होत, असें त्या ब्राह्मणांच्या लक्षांत आल्यावर त्यांनींहि

"नाहीं प्रायश्चित्त उभयतां कुळभ्रष्ट । बोलियेले श्रेष्ठ पूर्वापार ॥६॥"

नामदेव, अ. १०५

असाच शेरा मारला ! यावर "आमची गति काय !" असा निवृत्तिनाथांनीं प्रश्न केला असतां त्या भावंडांस कांहींच उत्तर न देणें कमीपणाचें आहे, असें वाटून महाजनांनीं यास एकच उपाय सांगितला तो नामदेव पुढीलप्रमाणें वर्णितातः—

"या एक उपाय असे शास्त्रमतें । अनन्य भक्तीतें अनुसरावें ॥७॥
तीव्र अनुतापें करावें भजन । गो खर आणि श्वान वंदूनियां ॥८॥
वंदावें अंत्यज ब्रह्मभावनेसी । ऐसे पद्धतीसी बोलियेले ॥९॥

नामदेव, अ. १०५

पंक्तिपावन करून घेण्याकरितां आलेल्या या कोंवळ्या मुलांना त्या ब्राह्मणांनीं " न वाढवा संसृति-काम-कंद । " असा उपदेश करणें, म्हणजे सर्व सांसारिक सुखाच्या कल्पना सोडून देण्यास सांगणेंच होतें. हा उपदेश एखाद्या सामान्य व्यक्तीस केला गेला असता, तर त्यास तो एकप्रकारचा शाप किंवा संकटच वाटलें असतें. परंतु हीं चारीं भावंडें अलौकिकच होतीं. अर्थात्

"जन्मतेनि प्रसंगें। स्त्रीदेह शिवर्णे आंगें। तेथूनि जन्म आधवें। सोंविळें कीजे॥ "

ज्ञा. अ. १७।२११

या ओवींतील तत्त्वाच्या चालत्याबोलत्या मूर्तिच असणाऱ्या ह्या नित्य-निवृत्त मुलांस हा उपदेश ऐकून दुःख वाटण्याच्या ऐवजीं संतोषच झाला. यामुळें त्या सर्वांनीं " महाराज, आपण सांगाल तें मान्य " असें म्हणून आनंदानें त्या ब्रह्मवृंदाच्या बोलण्याचा स्वीकार केला.

हा प्रकार होत आहे तों कांहीं टवाळ लोकांचे या पोरांच्या नांवांकडे लक्ष गेलें. त्यांचीं निवृत्ति, ज्ञानदेव इत्यादि एकजात नांवें ऐकून ते त्यांची चेष्टा करूं लागले. इतक्यांत एक पखालवाला आपल्या ' ग्यान्या 'नांवाच्या रेड्यावर पखाल ठेवून पाणी वाहण्याकरितां त्याच रस्त्यावरून त्याला जवळच हाकून नेत होता. तें पाहून एका कुटाळ गृहस्थानें म्हटलें कीं, " अहो, नांवांत काय आहे ! हा रेडा चालला आहेना, याचेंहि नांव ' ग्यान्या 'च आहे." यावर ज्ञानदेव म्हणाले कीं, " तुम्ही म्हणतां तें खरें आहे. माझा व त्याचा आत्मा एकच आहे." यावर पुढें काय झालें तें आम्ही नामदेवांच्याच शब्दांत देतोंः—

" मारिती आसुड म्हैशियाचे पाठीं। तोचि वळ उठी ज्ञानदेवा॥ म्हणती द्विजवर अहो ज्ञानदेवा । यापासोनी उच्चारावा वेदध्वनी॥ तरीच तुमची सत्ता आम्हां येईल कळों । नाहीं तरी बोलों नका कांहीं॥ ज्ञानदेव म्हणे बोले रे ऋग्वेद । ओंकार मूळ शब्द प्रणवाचा॥ वेदाचा आरंभ करिता झाला पशू । विधि उपन्यासु सांग पुढें॥ करिती आश्चर्य सकळ द्विजवर । हे तिन्ही अवतार तीन देवांचे॥ आदिमाता मुक्ताई मुक्तपणें अवतरली ।

आम्हांपासुनि झाली थोर चुकी ॥ कर्मठ अभिमानें ठकलों देहबुद्धि । गोवियेलीं विधि निःसंदेह ॥ नेणों भक्ति ज्ञान वैराग्याचा लेश । कुटुंबाचे दास होउनी ठेलों ॥ आणीकांसी सांगो आपण नाचरों । लटिकेंच हुंबरों प्रतिष्ठेसी ॥ धन्य याचा वंश धन्य याचें कुळ । धन्य पुण्यशील अवतार हे ॥ सकळ द्विजवर करिती नमस्कार । आनंदें जयजयकार करिताती ॥ ज्ञानदेव म्हणे तुमच्या चरणांचा महिमा । सामर्थ्य हें आम्हां अंगीं नाहीं॥"

**नामदेव, अ. १०६**

अशा रीतीनें ज्ञानदेवांच्या अलौकिक योगसामर्थ्यानें लोकांचे डोळे दिपून गेले व सभेचें विसर्जन झालें. शुद्धिपत्र देण्याचा प्रश्न पुढें सरसावण्याचें कोणास भानच राहिलें नाहीं !

या प्रकारानंतर कांहीं दिवस या बालभक्तांनीं पैठणांतच वास केला. नामदेवांनीं त्यांचा तेथील कार्यक्रम पुढील कडव्यांत थोडक्यांत दिला आहे:—

"अध्यात्म ग्रंथ* पाहती पैठणीं । गीता संबोधनी जवळी असे ॥८॥
भोगावती स्नान कालिका दरुशन । वेदांत व्याख्यान परिमिती ॥९॥
सांगती पुराण रात्रीं हरिकीर्तन ।...॥११॥" **नामदेव, अ. १०७**

योगसामर्थ्यानें ज्ञानदेवांनीं जो चमत्कार दाखविला त्यामुळें आधींच सर्वांच्या अंतःकरणावर छाप पडलेली, त्यांत पुनः ज्ञानदेवांच्यासारखें रसाळ परतत्त्वस्पर्श करणारें कीर्तन, मग त्यावेळीं पैठणांत श्रोतावक्ता स्वयमेव ब्रह्म बनून जो अलौकिक रंग उडत असेल तो काय वर्णावा !

पैठणांत असतांना ज्ञानदेवांनीं आणखीहि चमत्कार केला असें नामदेव सांगतात:—

"तंव कव्ययज्ञ झाला गृहस्थाचे घरीं । पितर मंत्रोच्चारीं आव्हानिले ॥१२॥
अवघे द्विजवर म्हणती धन्य धन्य । यासारिखे ब्राह्मण नाहीं कोणी॥१३॥

---

* ज्ञानदेवांच्या ग्रंथांवरून त्यांनीं शंकराचार्यांचे ग्रंथ, योगवासिष्ठ, शिवसूत्र, भागवत, व योगशास्त्रावरील ग्रंथ यांचें चांगलेंच अवलोकन केलें असावें, असें स्पष्ट दिसतें.

पशुमुखें वेद दृश्य पितरलोक । थोर हें कवतुक दाखविलें ॥१६॥"
नामदेव, अ. ९०७

यानंतर मात्र पैठणकर समस्त ब्रह्मवृंद एकत्र जमला व त्यानें या चारहि भावंडांस शुद्धिपत्र* दिलें. त्याचा मथितार्थ नामदेवांनीं खालील कडव्यांत फार सुंदर वर्णिला आहे. ब्राह्मण म्हणतातः—

"हे परलोकींचें तारूं देवत्रय यासी । प्रायश्चित्त काय यासी द्यावें कोणीं ॥"
नामदेव, अ. ९०७

निवृत्तिनाथांनीं शुद्धिपत्र हातांत पडल्यावर समस्त ब्राह्मणांस वंदन केलें व या भावंडांनीं पैठण सोडलें. तें सोडतांना ज्या 'ग्यान्या' रेड्याच्या मुखांतून ज्ञानदेवांनीं वेद वदविला, त्याला आपल्याबरोबर घेण्यास ते विसरले नाहींत. कारण कीं, तो त्यांच्या कुटुंबाबाहेरचा पहिला शिष्य होता ! महाराष्ट्रांतील वैदिक धर्माचें तत्कालीन केंद्रस्थान जें पैठण त्यांत ज्ञानदेवांनीं हरिकीर्तनाचा रंग भरून "उत्तमापासौनि अंत्यजवरि" सर्वांनीं मुक्तीची सेल मागण्याचा जो पायंडा पाडला, तो महाराष्ट्रांतील नव्या भक्तियुगाचा प्रारंभच असें म्हणावयास हरकत नाहीं.

ज्ञानदेवांनीं पैठणास केलेल्या चमत्कारांनीं त्यांची कीर्ति सर्व महाराष्ट्रांत पसरली असेल यांत नवल नाहीं. कारण तुकारामबोवा म्हणतात त्याप्रमाणें,

" वाऱ्याहातीं माप चाले सज्जनांचें । कीर्तिमुख त्यांचें नारायण ॥ "

शिवाय ज्ञानदेव हे जसे थोर योगी तसेच महान् आत्मानुभवी व वैष्णव होते. यामुळें त्यांच्या दर्शनास लोकांच्या झुंडीच्या झुंडी येऊन त्यांच्यापासून

* कै. भिंगारकरबुवा यांनीं आपणास एका वाडांत सांपडलेली पैठणकर ब्राह्मणांनीं दिलेल्या शुद्धिपत्राची नकल आपल्या ज्ञानेश्वरचरित्रांत दिली आहे. त्याच्या शेवटीं तें बोपदेवानें ग्रथित केलें व तें शके १२०९ च्या माघ शुद्ध पंचमीस पैठण मुक्कामीं दिलें, असें लिहिलें आहे. विद्वान् मंडळींत या शुद्धिपत्राच्या खरेपणाबद्दल बराच वाद आहे.

आपणांस अध्यात्मश्रवणाचा लाभ व्हावा म्हणून मोठ्या श्रद्धेनें त्यांस आपल्या गांवीं येण्याचा आग्रह करीत असतील यांत शंका नाहीं.

गहिनीनाथांच्या प्रसादानें पूर्ण झालेले निवृत्तिनाथ व निवृत्तिनाथांच्या प्रसादानें निःशंक ब्रह्मस्थिति प्राप्त होऊन अवाप्तकाम झालेलीं त्यांचीं ज्ञानदेवादि भावंडें यांना स्वतःकरितां म्हणून कांहीं साधन करण्याचें आतां उरलें नव्हतें. या सर्वांची स्थिति ज्ञानदेवांनींच म्हटल्याप्रमाणें:—

" आघवांचि आकाशस्थिति। जेवीं वायू न नित्य वसति। तेवीं जगचि विश्रांति–। स्थान जया॥ हें विश्वचि माझें घर। ऐसी मती जयाची स्थिर। किंबहुना चराचर। आपण जाहला॥ " ज्ञा. अ. १२।२१२–१३

अशी झाली होती. यापुढील त्यांचा कार्यक्रम त्यांच्याच शब्दांत खालीलप्रमाणें देतां येईल:—

" जे पुरुषार्थसिद्धि चौथी। घेऊनि आपुलिया हातीं। रिगाला भक्तिपंथीं। जगा देतु॥ कैवल्याचा अधिकारी। मोक्षाची सोडीबांधी करी। कीं जळाचिया परी। तळवटु घे॥ " ज्ञा. अ. १२।२१९–२०

कीर्तनपुराणद्वारा भक्तिमार्गाचा प्रसार करीत करीत ही मंडळी नेहमीं संचार करीत राहावयाची. असा संचार चालला असतां गोदावरीपासून दोन कोसांवर प्रवरेच्या कांठीं असलेल्या म्हाळसापूर अथवा नेवासें मुक्कामीं ती आली. याच गांवीं[1] शके १२१२ त ज्ञानदेवांनीं 'ज्ञानदेवी' किंवा 'ज्ञानेश्वरी' हा श्रीमद्भगवद्गीतेवरील आपला अलौकिक मराठी टीकाग्रंथ पूर्ण केला. ज्ञानेश्वरीच्या शेवटीं खालीलप्रमाणें उल्लेख आहे:—

" त्रिभुवनैकपवित्र। अनादि पंचकोशक्षेत्र। जेथ जगाचें जीवनसूत्र। श्रीमहालया असे॥ तेथ महेशान्वयसंभूतें। श्रीनिवृत्तिनाथसुतें। केलें ज्ञानदेवें गीतें। देशीकार लेणें॥ " ज्ञा. अ. १८।१८०३,०५

ग्रंथ लिहिण्याचें काम सच्चिदानंदबाबा हे मोठ्या आदरानें करीत असाहि

---

१ श्रीकरणेश्वर (करवीरेश्वर) देवालयांत बसून ग्रंथ लिहिला अशी आख्यायिका असून त्याचा एक खांब अद्यापि तेथें दाखवितात.

येथें उल्लेख आहे. याच गांवीं आपले गुरु निवृत्तिनाथ यांच्या सांगण्यावरून ज्ञानदेवांनीं ' अनुभवामृत ' अथवा ' अमृतानुभव ' हाहि आपला स्वतंत्र ग्रंथ रचिला.

इतकें कार्य येथें उरकून आदिशक्ति म्हाळसेस वंदन करून या वैष्णव वीरांनीं पुढें मार्ग आक्रमण्यास आरंभ केला. नामदेव वर्णन करितात कीं, मार्गांत अधिकारिजनांस स्वानुभव देत, हरिनामकीर्ति गात व कवित्वकळा दाखवीत ही मंडळी एका गांवाहून दुसरा गांव असा पंथ आक्रमीत आळ्याच्या* वनांत प्राप्त झाली. येथें ज्ञानोबांनीं आपल्याबरोबर आणिलेला ' ग्यान्या ' रेडा शांत झाला व त्यांनीं त्याची तेथेंच समाधि बांधून थेट आळंदीची वाट धरिली.

ज्ञानदेव हे आळंदीस पोंचेपर्यंत त्यांच्या चमत्कारांची वार्ता तापीतीरावर राहणाऱ्या व योगबलानें चौदाशें वर्षें जगलेल्या चांगदेवांच्या कानीं गेली; आणि हा रेड्यामुखीं वेद बोलविणारा कोण पुरुष आहे हें पाहण्याची त्यांस इच्छा झाली. प्रत्यक्ष दर्शनापूर्वीं पत्र देऊन त्याचा अंदाज घेणें चांगलें म्हणून त्यांनीं पत्र लिहिण्याकरितां कोरा कागद हातांत घेतला. परंतु आरंभीं ' आशीर्वाद ' का ' नमस्कार ' लिहावा याबद्दल निश्चय न झाल्यामुळें सरतेशेवटीं त्यांनीं तो कागद ज्ञानदेवांच्याकडे कोराच धाडला. त्यावर उत्तर म्हणून ज्ञानदेवांनीं जें लिहिलें, तें लिखाण ' चांगदेवपासष्टि ' या नांवानें प्रसिद्ध आहे. तें पाहून तर त्यांची दर्शनाची जिज्ञासा अधिकच वाढली; व ते आपल्या परिवारासह वाघावर बसून हातांत सर्पाचा चाबूक घेऊन ज्ञानदेवांच्या भेटीस निघाले! सिद्ध भेटीस येत आहेत हें जेव्हां ज्ञानदेवांस कळलें, तेव्हां ज्ञानदेवादि भावंडें घराच्या भिंतीवर बसलीं होतीं. चांगदेव वाघावर बसून येत आहेत हें ऐकून ज्ञानदेवांनीं ज्या भिंतीवर ते बसले होते त्या भिंतीस चालण्याची आज्ञा दिली व तिनेंहि ती मानिली!

* हें गांव पुणें जिल्ह्यांत आहे. आजमितीस या गांवीं रेड्याच्या समाधीची यात्रा चैत्र शुद्ध ११ स भरत असते.

जड भिंत चालते हें पाहून चांगदेवांचा गर्व दूर झाला व त्यांचेच शिष्य म्हणून त्यांच्याजवळ ते राहिले. पुढें मुक्ताबाईनीं त्यांच्यावर अनुग्रह केला व त्यांस आत्मस्वरूपाची प्राप्ति करून दिली.

आळंदीस आल्यावर तेथील ग्रामस्थांस पैठणकरांनीं दिलेलें शुद्धिपत्र आतां दाखविण्याची गरजच राहिली नाहीं. कारण, ज्ञानदेव येण्यापूर्वीच त्यांची कीर्ति तेथें येऊन थडकली होती. आतां ते येणार म्हणून त्यांच्या दर्शनार्थ लोकांच्या झुंडी त्यांना सामोऱ्या येऊं लागल्या!

अशा रीतीनें 'बांधिलीं सोडीत, बुडालीं काढीत, आर्तांची सांकडीं फेडीत,' किंबहुना 'जगाचें सुख उन्नतीस आणण्याकरितां' अहोरात्र खटपट करीत या मंडळींचा काल चालला असतां, ज्ञानदेवांच्या मनांत तीर्थयात्रा करण्याचें आलें. वास्तविक ज्ञानदेव "जयाचें नांव तीर्थरावो। दर्शनें प्रशस्तीसि ठावो। जयाचेनि संगें ब्रह्मभावो। भ्रांतासही[1] ॥" असल्या उच्च पदवीला जाऊन पोंचलेले. त्यांना तीर्थयात्रा करून कोणती चित्तशुद्धि मिळवावयाची होती! परंतु त्यांनींच म्हटल्याप्रमाणें "जीवन्मुक्त ज्ञानी जरी झाले पावन। तरी देव तीर्थ भजन न संडिती[2]" कारण त्यांस लोकांना मार्ग दाखवून द्यावयाचा असतो. मग यात्रेच्या प्रसंगीं संतांचा समागम घडल्यास मोठा आनंद लुटावयास मिळेल म्हणून ज्ञानदेव हे नामदेवांस आपल्याबरोबर येण्याविषयीं आग्रह करण्याकरितां पंढरपुरास गेले. त्यांच्यासारखे संत घरीं आल्यानें नामदेवांस मोठाच हर्ष झाला. ज्ञानदेवांनीं त्यांस आपलें मनोगत कळविलें तेव्हां नामदेव म्हणाले कीं, "माझी खरी इच्छा रंक होऊन पंढरीच्या चोहट्यावर पडावें अशी आहे. मी सर्वस्वीं पंढरीनाथास विकलेला आहें. तेव्हां माझ्या बाबतींत त्यांसच पुसावें." त्यावर ज्ञानदेवांनीं आपलें मनोगत पंढरीरायास निवेदिलें व पंढरीरायांनींहि

---

१ ज्ञा. अ. ६, ओ. १०२. २ नामदेव अ. ९१४-१६.

" प्रत्यक्ष परब्रह्म मूर्ति ज्ञानेश्वर । करीतसे आदर संगतीचा ॥
ऐसें भाग्य जेणें सर्वस्वें साधावें । तरीच जन्मा यावें विष्णुदासा ॥
जावें स्वस्तिक्षेम यावें शीघ्रवत । करावें स्वहित कळे तैसें ॥ "

**नामदेव**, अ. ९१७

अशी आज्ञा दिल्यामुळें परम प्रेमळ बालभक्त असे नामदेव मोठ्या कष्टानें पंढरी सोडून ज्ञानदेवांबरोबर यात्रेस निघाले. पंढरीरायाच्या वियोगाचा हा करुणरसपूर्ण प्रसंग नामदेवांनीं अत्यंत प्रेमळपणें वर्णिला असून त्यावरून त्यांच्या उत्कृष्ट कवित्वाची साक्ष पटते.

या समयीं त्यांच्याबरोबर इतर संतमंडळी कोण होती आणि ही ज्ञान व भक्ति यांची जोडी कोणकोणत्या क्षेत्रांत गेली, तिनें मार्गांत कोणकोणते चमत्कार केले व शेवटीं ती आपल्या माहेरास कशी परत आली याविषयीं नामदेवांचे तीर्थावळीचे म्हणून जे प्रसिद्ध अभंग आहेत त्यांत फारच थोडी माहिती आढळते. भक्तिकथासार, भक्तिकथामृत, कथाकल्पवृक्ष इत्यादि ग्रंथांतून नामदेवांच्या तीर्थावळींत नसलेल्या बऱ्याच गोष्टींचा उल्लेख आहे. परंतु त्यांचा आधार येथें घेतलेला नाहीं.

पंढरपूर सोडल्यानंतर ज्ञानदेव व नामदेव हे प्रभासाच्या रस्त्यास लागले. वाटेंत या दोन लोकोत्तर पुरुषांचा जो संवाद चाले तो नामदेवांनीं वर्णिला असून हे मननीय अभंग वाचकांनीं स्वतः वाचावे, अशी आम्ही त्यांस शिफारस करितों. कधीं ज्ञानदेव हे नामदेवांची सगुणभक्ति कसास लावण्याकरितां त्यास अद्वैतवेदान्त सांगून त्यांची परीक्षा पाहतात, तर कधीं योगबलानें लघिमा सिद्धीचा अवलंब करून खोल विहिरींतील पाणी पिणें यासारखे चमत्कार दाखवून त्यांस चकित करून सोडतात. पण नामदेव या सर्व दिव्यांतून पार पडून उत्तम रीतीनें कसोटीस उतरतात व ज्ञानदेवहि 'धन्य तुझा भाव एकविध' असें त्यांचें गौरव करितात. कधीं कधीं ज्ञानदेव स्वतः लघुत्व पत्करून नामदेवांस " कैसा तो साधावा सांग भजनविधी, कैसी नमनबुद्धि सत्वशीळ, कैसा निर्विकार ध्यानाचा प्रकार, श्रवण, मनन, निज-

ध्यासन, भक्ति, धृति व विश्रांति हीं काय आहेत !" (नामदेव; अ. ९२३) असले प्रश्न विचारीत व ह्या प्रश्नांस फार समर्पक उत्तरें दिलीं जात. तीं ऐकून ज्ञानदेव प्रसन्न होत आणि 'तुजवर खरोखर भगवंताची कृपा आहे,' असें म्हणून नामदेवांचें गौरव करीत. अशी आत्मचर्चा करीत व 'कृष्णुविष्णु-हरिगोविंद' गात त्यांनीं पश्चिम प्रभास, द्वारकादि सप्त पुऱ्या पाहिल्या आणि सर्व मंडळी पंढरपुरास सुखरूप परत आली.

यात्रा संपवून पंढरीस सुखरूप परत येतांच नामदेव राउळांत गेले व त्यांनीं पांडुरंगास प्रेमपूर्वक दृढालिंगन देऊन मांवदेंहि मोठ्या थाटाचें केलें. आतां ज्ञानदेवांनाहि आपलें इहलोकचें कार्य संपलें असें वाटून त्यांनीं पांडुरंगचरणीं समाधीची परवानगी मागितली. ही विनंती ऐकून नामदेवांस फार वाईट वाटलें. त्यांनीं हा समाधीचा एकंदर प्रसंग मोठ्या करुणरसपूर्ण वाणीनें वर्णिला आहे. तो वाचतांना सहृदय वाचक गहिंवरल्यावांचून खास राहणार नाहीं.

ज्या ठिकाणीं 'महावल्ली अजानवृक्ष' आहे त्याच्या सन्निध आळंदी मुक्कामीं ज्ञानदेवांच्या समाधीचें स्थान निश्चित करण्यांत आलें. ज्ञानदेवांना पांडुरंगाकडून खालीलप्रमाणें वचन मिळालें, असें नामदेव सांगतातः—

"कृष्णपक्षीं तुज निर्धारा। भेट देत जाईन ॥ ५ ॥
कार्तिक शुद्ध एकादशी। पंढरीयात्रा होईल सरिशी ॥
दुसरी कृष्णपक्षीं निर्धारेंसी। तुज दिधली असे ॥ ६ ॥" अ. ९७६

ह्या वचनानुसार सर्व संतमंडळी दिंड्या, पताका घेऊन ज्ञानदेवांसह आळंदीस आली. ज्ञानदेव आतां ज्ञानांजन समाधि घेणार हें पाहून सर्व लोकांस अतिशय खेद झाला. नित्यनिवृत्त असणारे जे निवृत्तिनाथ त्यांचाहि कंठ दाटून आला. सोपानदेव व मुक्ताबाई यांस तर रडूं कोसळलें! मुक्ताबाई म्हणाल्या, "आमचे वडील गेले त्या वेळेस आम्ही लहान होतों.

आमचा सर्व सांभाळ ज्ञानदेवानेंच केला व आमचें कोडकौतुक त्यानेंच पुरविलें." प्रेमळ नामदेवांच्या शोकास तर पारावारच राहिला नाहीं !

ह्या प्रसंगानुरोधानें नामदेवांनीं आळंदीमाहात्म्य वर्णिलें आहे. आळंदी क्षेत्र हें नामदेवांच्याहिपूर्वी ' शिवपीठ ' म्हणून प्रसिद्ध होतें; व आतां तर "पंढरीहूनि हें सोपें। जनाचीं हरावया पापें। कळिकाळ कोपलिया कोपें। न चले अलंकापुरासी " (ना. अ. ९८७) असें अपूर्व महत्त्व त्यास प्राप्त झालें.

इंद्रायणीकांठच्या श्रीसिद्धेश्वरासमोरील नंदी उचलून तेथून आंत जाऊन ज्ञानदेवांच्या समाधीची जागा तयार करण्यांत आली. नामदेवांच्या दोन मुलांनीं ती झाडून स्वच्छ केली. ह्या प्रसंगीं सर्वांनीं ज्ञानदेवांची षोडशोपचारें पूजा केली, त्यांचे कंठ दाटून आले व सर्वांच्या तोंडून एकच उद्गार निघाले–

"पूर्वी अनंत भक्त जहाले। पुढेंही भविष्य बोलिलें।
परी निवृत्ति-ज्ञानदेवें सोडविले। अपार जीवजंतु ॥" ना. अ. १००८

यानंतर ज्ञानदेवांनीं १०८ ओव्यांनीं भगवंताची ' नमन 'रूप स्तुति केली व ते समाधींत जाऊन बसले; आणि निवृत्तिनाथांनीं समाधीवर चिरा बसविला. ज्ञानदेवांच्या संजीवनसमाधीचा हा प्रसंग शके १२१५ कार्तिक वद्य १३स गुरुवारीं मध्याह्नकालीं घडला.

ज्ञानदेवांनीं समाधि घेतल्यावर आठ महिन्यांच्या आंतच बाकीच्या भावंडांनींहि आपली इहलोकची यात्रा संपविली ! ज्ञानदेवांनंतर बरोबर एक महिन्यानें सोपानदेव यांनीं मार्गशीर्ष वद्य १३स सासवडास जिवंत समाधि घेतली. त्यानंतर चांगदेवांनीं पुणतांब्यास माघ वद्य १३स समाधि घेतली. निवृत्तिनाथ, मुक्ताबाई व इतर संतमंडळी पुढें फिरतफिरत नेवासें, आपेगांव येथें आलीं. तेथें पूर्ववृत्त आठवून त्यांस फारच वाईट वाटलें. पुढें तापीतीरीं मेहूण या गांवाजवळ वैशाख वद्य १२ स वीज कडाडली व मुक्ताबाई एकाएकीं नाहींशा झाल्या ! सर्वांत मागें सर्वांत ज्येष्ठ जे निवृत्तिनाथ ते उरले. त्यांस आतां कांहींच नकोसें झालें; व त्यांनींहि ज्येष्ठ वद्य १२ स त्र्यंबकक्षेत्रीं ब्रह्मगिरीच्या पायथ्याजवळ जिवंत समाधि घेतली.

ज्ञानदेवांच्या समाधिसोहळ्यानंतर अशा रीतीनें फक्त आठ महिन्यांत हीं सर्व दिव्य रत्नें हरपलीं! नामदेवांनीं या भावंडांचें योग्य शब्दांत जें वर्णन केलें आहे तें देऊन हें प्रकरण आटोपतों:—

"गेले दिगंबर ईश्वर विभूति । राहिल्या त्या कीर्ति जगामाजी ॥ १ ॥
वैराग्याच्या गोष्टी ऐकिल्या त्या कानीं । आतां ऐसें कोणी होणें नाहीं ॥२॥
सांगतील ज्ञान म्हणतील खूण । नयेचि साधन निवृत्तिचें ॥ ३ ॥
परब्रह्म डोळां दावूं ऐसें म्हणती । कोणा नये युक्ति ज्ञानोबाची ॥४॥
करतील अर्थ सांगतील परमार्थ । नये पां एकांत सोपानाचा ॥ ५ ॥
नामा म्हणे देवा सांगूनिया कांहीं । नये मुक्ताबाई गुह्य तुझें ॥६॥"

**नामदेव**, अ. १२१४

---

# प्रकरण चौथें

## ज्ञानदेवांची ग्रंथरचना

ज्ञानदेवांची इहलोकची यात्रा सारी बावीस वर्षांची होती. यामुळें जें कांहीं ग्रंथलेखन त्यांच्याकडून झालें तें सर्व अगदीं अल्पवयांत झालें, हें निःसंशय होय. त्यांच्या ग्रंथकर्तृत्वाला आरंभ हीं चारहि भावंडें पैठणास जाऊन शुद्धिपत्रप्रकरणाच्या द्वारें जगापुढें आल्यावरच झालेला आहे. ज्ञानदेवांच्या नांवावर जे अनेक लहानमोठे ग्रंथ मोडतात ते येणेंप्रमाणें:—

(१) ज्ञानदेवी अथवा ज्ञानेश्वरी, ओवी ९०३२;* (२) अनुभवामृत

---

* ओवीसंख्येचा हा आंकडा ह. भ. प. बंकटस्वामी यांनीं छापलेल्या सार्थ ज्ञानेश्वरींतील आहे. हस्तलिखित पोथ्यांतून व छापील प्रतींतून ओव्यांची

अथवा अमृतानुभव, ओ.८०६ व श्लो. ५; (३) चांगदेवपासष्टि, ओ. ६५; ( ४ ) नमन, ओ. १०८; ( ५ ) हरिपाठ, अभंग २७; ( ६ ) अभंग ९७२; ( ७ ) योगवासिष्ठ; ( ८ ) उत्तरगीता; ( ९ ) प्राकृत गीता; ( १० ) पंचीकरण; ( ११ ) गायत्रीटीका; ( १२ ) शुकाष्टक; ( १३ ) स्वात्मानुभव; (१४) समास.

या ग्रंथांसंबंधानें मुख्यतः दोन प्रश्न उपस्थित होण्यासारखे आहेत. पहिला प्रश्न असा कीं, उपरिनिर्दिष्ट ग्रंथांपैकीं ज्यांचें चरित्र सांप्रत लिहिलें जात आहे त्याच ज्ञानदेवांचे असे खास ग्रंथ कोणते ? व दुसरा असा कीं, या ग्रंथांचा पूर्वापर संबंध दाखवून त्यांचा कालानुक्रम निश्चित करणें शक्य आहे काय ?

हे दोन्ही प्रश्न जरा बिकटच आहेत. तथापि प्रस्तुत प्रकरणांत त्यांचा थोडक्यांत विचार करणें अवश्य आहे. यांपैकीं ज्ञानेश्वरी व अमृतानुभव हे ग्रंथ ज्ञानदेवांचेच आहेत ही गोष्ट सर्वमान्य आहे. अर्थात् ही गोष्ट गृहीत धरून इतर ग्रंथांची परीक्षा करूं.

मागें ' इतिहास व ऐतिहासिक ' या मासिकांत ( वर्ष ४, अंक ३ ) श्री. चांदोरकर यांनीं चांगदेवपासष्टींत, "एवं ज्ञानदेव चक्रपाणी ऐसे। दोन्ही डोळस आरिसे " (ओ. ६२) असा उल्लेख आलेला आहे, एवढ्यावरून ' चांगदेवपासष्टि ' ही महानुभावसंप्रदायप्रवर्तक चक्रपाणीची आहे, असें प्रतिपादणारा एक लेख प्रसिद्ध केला होता. या बाबतींत पुनः विशेष

---

संख्या सर्वत्र एकच आढळून येत नाहीं. कै. राजवाडे यांनीं प्रसिद्ध केलेल्या मुकुंदराजी प्रतींत ओ. सं. ८८९२ आहे, तर निळोबा हे ओवी संख्या १०००० आहे असें म्हणतात. अधिक माहितीकरितां प्रस्तुत लेखकाचें ' महाराष्ट्रीय ज्ञानकोशां 'तील ' ज्ञानेश्वरी ' हें स्फुट पाहावें.

ज्ञानदेवांच्या इतर ग्रंथांतील ओव्या अथवा अभंग यांच्या संख्येसंबंधींसुद्धा असेंच आहे. मात्र त्यांतून ज्ञानेश्वरींतील संख्येइतका फरक दिसून येत नाहीं. सरासरी चारपांच ओव्या कमीअधिक आढळतील.

चर्चा करण्याचें प्रयोजन नाहीं. कारण श्री. 'पांडुरंगशर्मा' यांनीं 'चित्रमय जगत्'मध्यें ( फेब्रुवारी १९२३ ) चांगदेवपासष्टि ही अंतर्गत पुराव्यावरून ज्ञानेश्वरी-अमृतानुभव-कर्त्या ज्ञानदेवांचीच कशी हें सप्रमाण सिद्ध केलें आहे.

'नमन' ज्ञानदेवांचेंच आहे ही गोष्टहि निर्विवाद आहे. परंतु आज जें 'नमन' उपलब्ध आहे तें नामदेवांनीं समाधिप्रकरणांत जसें दिलें आहे त्याच स्वरूपांत फक्त उपलब्ध आहे.

यानंतरचा प्रश्न म्हणजे 'हरिपाठ' व 'अभंग' यांचा. या दोहोंचा एकत्र विचार करणें योग्य होईल. कारण या दोन्ही बाबतींत विद्वान् मंडळींमध्यें फार दिवसांपासून दुमत आहे. याच प्रश्नांतून एक महत्त्वाचा मुद्दा निघाला आहे तो म्हणजे, ज्ञानदेव एक होते कीं दोन होते ! डॉ. भांडारकरप्रभृति कांहीं आधुनिक पंडितांच्या मतें अभंग व हरिपाठ ज्ञानेश्वरीकर्त्या ज्ञानदेवांचे नसून त्यांचा कर्ता कोणी दुसरा ज्ञानदेव असावा. ज्ञानदेव दोन होऊन गेले, असा पूर्वपक्ष 'सुधारक' पत्रांतून सन१८९८ मध्यें 'भारद्वाज' हें टोपणनांव धारण करून कै. भारदे यांनीं सविस्तर केला होता. याच विषयावर त्यांनीं पुढें कै. ह. भ. प. भिंगारकर यांच्या उत्तरास प्रत्युत्तर म्हणून प्रथम विविधज्ञानविस्तारांत व पुढें 'इंडियन् इंटरप्रेटर'मध्यें (जुलै १९१४ ) यासंबंधीं आपली बाजू मांडिली. त्यांच्या मतें या दोन ज्ञानदेवांची माहिती थोडक्यांत अशी आहे:—

| तपशील | ज्ञानेश्वर | ज्ञानदेव |
| --- | --- | --- |
| जन्मस्थान | आपेगांव | अज्ञात |
| जन्मशक | १२०० | ” |
| समाधिस्थान | आपेगांव | आळंदी |
| समाधिकाल | तेरावें शतक | चौदावें शतक |
| कुलवृत्त-वडील | निवृत्तिनाथ | विठ्ठलपंत |
| गुरुकुल | नाथपंथ (शैव) | रामानुज (वैष्णव) |
| गुरु | निवृत्तिनाथ, | विठ्ठलपंत, निवृत्ति |
| ग्रंथकर्तृत्व | ज्ञानेश्वरी, अमृतानुभव | अभंग |

वरील दोन ज्ञानदेव ठरविण्याकरितां श्री. भारदे यांनीं मुख्यत्वें पांच मुद्दे पुढें आणिले होते. त्यांस उत्तर म्हणून ह. भ. प. भिंगारकर यांनीं १८८९–१९०० या सालांत 'केसरी'मध्यें जे एकंदर तेरा लेख लिहिले ते सांप्रत 'श्रीमहासाधु ज्ञानेश्वरमहाराज यांचा कालनिर्णय व संक्षिप्त चरित्र' या नांवानें पुस्तकरूपानें प्रसिद्ध आहेत. त्या लेखांना त्या काळीं न्या. रानडे व लो. टिळक यांच्यासारख्या विद्वानांची मान्यताहि मिळाली होती. आम्ही भिंगारकरबोवांनीं दिलेलीं उत्तरें येथें थोडक्यांत सादर करतों.

( १ ) ज्ञानदेव व नामदेव समकालीन होते. कारण नामदेवांचा जन्मशक देणारा अभंग खोटा मानतां येत नाहीं. त्यांत हस्तदोषानें 'प्रमोद' या संवत्सरनामाऐवजीं 'प्रभव' आहे एवढेंच. पण कांहीं प्रतींत 'प्रभव' असा पाठ आढळतो. नामदेव हे ज्ञानदेवांच्या मागें बरींच वर्षें जगल्यामुळें नामदेवांच्या अभंगांतून यवनांनीं मूर्ती फोडल्याचा उल्लेख आहे. ज्ञानदेवकालीं यादवांचें राज्य होतें. अर्थात् ज्ञानदेवांच्या काळीं नामदेव नव्हते, हें म्हणणें तर्कास सोडून आहे.

( २ ) ज्ञानेश्वरीचे कर्ते आळंदीचेच ज्ञानदेव होत. ज्ञानेश्वरी नेवासें येथें नव्हे, तर आपेगांवीं लिहिली, हें ठरविण्याकरितां ज्ञा. अ. १८, ओ. १८०३ चा जो अर्थ केला आहे तो अर्थ नसून अनर्थ आहे! या बाबतींत बाह्य पुरावाहि भरपूर आहे.

( ३ ) ज्ञानदेवांच्या कुलपरंपरा व गुरुपरंपरा दोन नाहींत. ज्ञानेश्वरीकर्त्या ज्ञानदेवांचे वडील निवृत्तिनाथ होते, हें ज्ञा. अ. १८, ओ. १८०५ वरून ठरविणें म्हणजे ज्ञानेश्वरीचें गाढ अज्ञान प्रदर्शित करणें होय. एकच गुरुपरंपरा खरी आहे, दुसरी कल्पित होय.

( ४ ) भाषापद्धति दोन नाहींत. ज्ञानेश्वरींतील शब्द व वाक्यरचना हीं अभंगांतहि आढळतात.

( ५ ) ज्ञानदेवांची समाधि आळंदीसच आहे. आपेगांवास असणाऱ्य समाधि त्यांच्या पूर्वजांच्या आहेत.

स्थळ प्रत सं. नं.

कै. भिंगारकरबोवा यांच्या मताप्रमाणेंच सर्व सांप्रदायिक वारकरी मंडळींचें मत आहे. हा प्रश्न बिकट होऊन बसण्याचीं कारणें मुख्यत्वें तीन आहेत. पहिलें व महत्त्वाचें कारण म्हणजे ज्ञानेश्वरीची भाषा व अभंगांची भाषा यांत दिसून येणारें महदंतर. ज्ञानेश्वरीची भाषा फार जुनाट दिसते, तर अभंगांची तदनंतरची दिसते. दुसरी गोष्ट, ज्ञानदेवांच्या अभंगांत कित्येक ठिकाणीं पंढरपूर, तेथील दैवत रखुमादेवीवर विठोबा व वारकरीसंप्रदाय यांचें प्रेमळ वर्णन आढळतें, तर ज्ञानेश्वरींत त्याचा मागमूसहि नाहीं. तिसरें कारण म्हणजे खरोखरच महाराष्ट्रांत बाराव्या शतकाच्या शेवटीं व तेराव्या शतकाच्या आरंभीं होऊन गेलेल्या ज्ञानेश्वरीकर्त्या ज्ञानदेवांहून वेगळे असे एक अथवा अनेक ज्ञानदेव प्राकृतग्रंथकर्ते झाले आहेत. तसेंच नामदेवहि एकाहून अधिक होऊन गेले आहेत.

परंतु याहि सर्व प्रश्नांची पुनः सविस्तर चर्चा करण्याचें कारण नाहीं. कां कीं, श्री. भिंगारकरबोवानंतर 'पांडुरंगशर्मा' यांनीं ४ डिसेंबर १९२३ च्या 'केसरी' मध्यें पुनः ऊहापोह करून नवीन मुद्देहि सप्रमाण खोडून काढले आहेत.

यांत आम्हीं वर म्हटल्याप्रमाणें मुख्य महत्त्वाचे दोनच मुद्दे आहेत. एक भाषेचा व दुसरा पंढरपुरच्या नामनिर्देशाच्या अभावाचा. यांपैकीं पहिला जो भाषेचा मुद्दा त्यासंबंधीं अधिक सूक्ष्म अभ्यास होणें अवश्य आहे. ज्ञानेश्वरीच्या हस्तलिखित जुन्या प्रती जशा अनेक मिळतात, तशा अभंगांच्या फारशा उपलब्ध नाहींत. यामुळें राजवाडे यांची ज्ञानेश्वरी व कुंटे यांची ज्ञानेश्वरी यांची तुलना करूं लागल्यास जसा भाषेंत फरक दिसतो, तसाच पण त्याहूनहि अधिक फरक अभंगांतून दिसतो. कारण अभंग पुष्कळ वेळां कोणाच्या तरी तोंडून उतरून घेतलेले असतात. या दृष्टीनें अगदीं तंतोतंत शब्दांचीं रूपें जुळतात कीं नाहीं हें न पाहतां मूळ शब्दांकडे पाहूं लागल्यास ज्ञानेश्वरींतील कितीतरी शब्द अभंगांत आढळून येतात. तात्पर्य, ज्ञानदेवांनीं कांहीं अभंग केले आहेत ही गोष्ट निर्विवाद आहे.

दुसरा मुद्दा प्रो. रा. द. रानडे यांनीं आपल्या अध्यात्मग्रंथमालेंतील 'ज्ञानेश्वरवचनामृत' या पुस्तकाच्या प्रस्तावनेंत सप्रमाण खोडला आहे. ज्ञानदेव कालविपर्यासाची चूक करीत नाहींत. यामुळें पंढरपुरच्या संप्रदायाचा स्पष्ट उल्लेख त्यांत नाहीं. ते कृष्णोपासक नाथपंथी होते, हें ज्ञानेश्वरीच्या अभ्यासकास निराळें सांगावयास नको. पण ज्ञानदेवांनीं ज्ञानेश्वरीच्या आरंभीं श्रीशंभूस अथवा श्रीहरीस वंदन केलें नाहीं. वैदिक संप्रदाय म्हणून श्रीपरमात्मरूप गणेशास व ब्रह्मविद्यारूपी सरस्वतीस नमन करून त्यांनीं आपले गुरु निवृत्तिनाथ यांस पहिल्या अध्यायांत नमन केलें. त्यानंतर पुनः गुरु निवृत्तिनाथांशिवाय दुसऱ्या कोणाचाच उल्लेख त्यांच्या नमनांतून आढळत नाहीं. इतक्या स्पष्टतेनें या मुद्द्याचें विवेचन करण्याचा हेतु इतकाच कीं, ज्ञानदेव हे 'स्वतःस प्रिय म्हणून दे घुसडून', अशा वृत्तीचे नव्हते; व या त्यांच्या वृत्तीमुळेंच पंढरपुरच्या श्रीपांडुरंगाचा स्पष्ट नामनिर्देश ज्ञानेश्वरींत नाहीं. तथापि एक गोष्ट या ठिकाणीं लक्षांत ठेविली पाहिजे कीं, तसा उल्लेख हरिपाठांतहि नाहीं; व त्यांच्या म्हणून गणिल्या गेलेल्या कितीतरी अभंगांतून नाहीं. आतां ज्ञानदेवांस पंढरपुरचा संप्रदाय चांगला माहीत होता व त्यांतील कांहीं भागांवर त्यांचें प्रेम होतें असें दर्शविणारे प्रसंग ज्ञानेश्वरींत सहज दाखवितां येतील; आणि प्रो. रानडे यांनीं आपल्या 'ज्ञानेश्वरवचनामृता'च्या प्रस्तावनेंत ते दाखविलेहि आहेत ( पृ. ९–१० ).

आतां ज्ञानदेवांच्या नांवावर मोडतात, परंतु आमच्या मतें जे ज्ञानदेवांचे नाहींत अशा ग्रंथांसंबंधीं थोडक्यांत चर्चा करूं. ही चर्चा करतांना आपण या बाबतींत कोणती कसोटी उपयोगांत आणणार आहों, हें सांगितलें पाहिजे. अमुक ग्रंथ ज्ञानदेवांचेच होत हें ठरविण्यास उत्तम प्रमाण म्हणजे त्यांच्या म्हणून निर्विवाद समजल्या जाणाऱ्या ग्रंथांत एखाद्या पूर्वकृत ग्रंथाचा अथवा करूं घातलेल्या ग्रंथाचा स्पष्ट निर्देश असणें हें होय. तसा स्पष्ट निर्देश नसल्यास तत्समकालीन ज्या ग्रंथकारांनीं त्यांचें चरित्र लिहिलें असेल त्यांनीं त्या ग्रंथाचा आपल्या ग्रंथांत तत्कृत म्हणून उल्लेख करणें हें दुसरें महत्त्वाचें

प्रमाण मानतां येईल. तिसरें प्रमाण म्हणजे त्या ग्रंथकाराचे म्हणून समजले गेलेले ग्रंथ व विवादास्पद ग्रंथ यांच्या विचारांतील, मांडणींतील व ते व्यक्त करण्याच्या भाषेंतील साम्य हें होय. याच्या खालोखाल, परंतु कित्येक वेळां स्वतःस अधिक खात्री करून देणारें प्रमाण म्हणजे त्या ग्रंथकर्त्यांच्या ग्रंथांचें दीर्घकाल परिशीलन करणाऱ्या विद्वानांची अनेक तपांच्या अभ्यासानें सूक्ष्मदर्शी झालेली बुद्धि. हें सर्वस्वीं अंतःप्रमाणच होय; पण याची योग्यता भिन्न परिस्थितींत दुष्यन्तानें उच्चारलेल्या 'सतां हि संदेहपदेषु वस्तुषु प्रमाण-मन्तःकरणप्रवृत्तयः' या वचनावरून स्पष्ट आहे. यासंबंधीं दुसरा एक व्यावहारिक दृष्टान्त द्यावयाचा तर असें म्हणतां येईल कीं, मांजरीच्या पिलांस जसा मांजरीचा शब्द ओळखूं येतो, तसा ग्रंथकाराच्या शब्दाची उपासना करणाऱ्या तज्ज्ञास त्याचा शब्दहि सहज ओळखतां येतो.

असो. हीं कमीअधिक महत्त्वाचीं प्रमाणें आहेत. यांचा उपयोग करूनच खालील ग्रंथ ज्ञानदेवांचे नसावे असें ठरविण्यांत आलें आहे. येथें स्थलसंकोचार्थ प्रत्येक ग्रंथाच्या बाबतींतील सर्वच्या सर्व कारणें नमूद करणें शक्य नाहीं. अर्थात् महत्त्वाच्या कारणांचा तेवढाच निर्देश केला आहे.

(१) योगवासिष्ठ–(अ) या ग्रंथाच्या नमनांत ( ओ. १६-१९ व पुढें ) जी जगदुत्पत्तीची रीत दर्शविली आहे तशी रीत ज्ञानेश्वरींत तीनचार ठिकाणीं जगदुत्पत्ति सांगण्याचा प्रसंग आला असतां सांगितलेली नाहीं. विशेषतः गीताध्याय १४, श्लोक ४ यावरील ज्ञानेश्वरीच्या ओव्या पाहा.

( आ ) रामाला वसिष्ठ उपदेश करीत असतां, तदनंतर झालेल्या व्यासकृत भारतीय युद्धकथेच्या श्रवणानें जनमेजयाचे दोष हरले हें सांगणें, म्हणजे कालानुक्रमाचा कांहींच विचार न करण्यासारखें आहे. ज्ञानदेव असें करतीलसें वाटत नाहीं.

( इ ) योगवासिष्ठांत ( पृ. ४९ ) गृहस्थाश्रमाचें नांव काढल्याबरोबर वसिष्ठांस ( स्वतः गृहस्थाश्रमी असून ) मूर्च्छा आली, असें म्हटलें आहे.

ज्ञानेश्वरीच्या अभ्यासकास ज्ञानदेव गृहस्थाश्रमाची निंदा करतांना इतके वाहवतील, हें संभवनीय वाटत नाहीं. कारण ज्ञानेश्वरींत तिचा गंधहि नाहीं.

( ई ) या योगवासिष्ठांत आढळून येणारे कांहीं शब्द ज्ञानदेवांच्या ज्ञानेश्वरी, अमृतानुभव, चांगदेवपासष्टि इत्यादि ग्रंथांत कोठेंच दिसत नाहींत. उदा० ढेप, आरजा, इ.

ज्ञानदेवांनीं योगवासिष्ठावर टीका केली हें खरें आहे. यास नामदेवांच्या वचनाचा आधार आहे. परंतु आपल्या समोर असलेलें ' योगवासिष्ठ ' तें नव्हे, हें निर्विवाद होय.

( २ ) उत्तरगीता—असाच ज्ञानदेवांच्या नांवावर मोडणारा, पण जो ज्ञानदेवांचा नव्हे असें आम्हांस वाटतें, तो ग्रंथ म्हणजे ' उत्तरगीता ' या ग्रंथावरील टीका. याचीं कारणें अशीं:—

(अ) या उत्तरगीतेवरील टीकेंत येणारे कांहीं शब्द तुलनेस घेतल्यास ते ज्ञानेश्वरी, अमृतानुभव इत्यादि ग्रंथांत आढळून येत नाहींत. उदाहरणार्थ, ( १ ) शलाका, अ. १।३; ( २ ) तारकब्रह्म, अ. १।२; (३) राळ्याचा, अ. १।५१; (४) तास, अ. १।२५३; (५) अर्कुलें, अ. १।२५५; (६) राहिजेसू ( 'राहणें' धातूचें रूप ), अ. १।२५७; (७) कुश्चळ, अ. १।२२.

( आ ) ज्ञानदेवांनीं ज्ञानेश्वरींत केलेलीं नमनें व या ग्रंथांत केलेलें नमन यांतील फरकहि लक्षांत घेण्यासारखा आहे. ज्ञानेश्वरींत त्यांनीं गणपति, सरस्वती या देवतांस नमन करून नंतर आपले गुरु निवृत्तिनाथ यांना वंदन केलें. परंतु यांपैकीं ज्ञानदेवांच्या विनवणीस उत्तर फक्त त्यांचे गुरु निवृत्तिनाथ यांनींच दिलें. उलट उत्तरगीतेच्या टीकाकाराबरोबर गणपति, शारदा, व्यास, वाल्मीकि हे सर्वच बोलतात व त्यास वर देतात ( अ. १। १८-३३ ). ज्ञानेश्वरीकर्ते ज्ञानदेव यांच्या पद्धतीशीं ही गोष्ट अत्यंत विसंगत आहे.

( इ ) ज्ञानदेवांनीं ज्ञानेश्वरीच्या सहाव्या अध्यायांत ' ग्राहीक ' ओंवे आणून जी नाथपंथाची घडी ' उपलवून ' दाखविली तींत आणि या उत्तर-

गीतेंतील योगविवरणांत बराच फरक आहे. श्रीहट, भ्रमरगुंफा, चौदा चक्रें, योगिकमातृका यांचा ज्ञानेश्वरींत मागमूस नाहीं.

( ई ) या ग्रंथांतील विवेचनपद्धति ज्ञानदेवांच्या म्हणून प्रसिद्ध असलेल्या ग्रंथांतून आढळून येत नाहीं. उदा० अ. ३, श्लो. ४२ यावरील ब्रह्महत्या, वीरहत्या यांचे व क्षर, अक्षर ह्या पदांचे अर्थ.

( ३ ) प्राकृतगीता—हा ज्ञानदेवांच्या नांवावर मोडणारा तिसरा ग्रंथ होय. या बाबतींत विशेष लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट ही कीं, कै. राजवाडे यांचीहि या बाबतींत दिशाभूल झाली असून त्यांनीं देखील हा ग्रंथ ज्ञानदेवांचाच असला पाहिजे, असें मत दिलें आहे ( भा. इ. सं. मंडळ-वार्षिक इतिवृत्त, शके १८३६ ). परंतु खालील गोष्टी विचारांत घेतां हा ग्रंथ ज्ञानेश्वरीकर्त्या ज्ञानदेवांचा कसा नाहीं हें स्पष्ट होईलः—

( अ ) आधीं ' तेणें आबालसुबोधें । ओवीयेचेनि प्रबंधें ' म्हणून सर्व लहानथोर जनांकरितां आपण गीतेवर टीका करितों अशा बुद्धीनें एकदा ज्ञानेश्वरी ग्रंथ केल्यावर पुनः त्याच गीतेवर स्वतः ज्ञानदेव दुसरा ग्रंथ लिहितील हें संभवत नाहीं.

( आ ) ज्ञानदेवांनीं ज्ञानेश्वरींत तसा प्रसंग असतां ज्या कित्येक गोष्टी सांगितल्या नाहींत त्या या ग्रंथांत सांगण्यांत आलेल्या आहेत. उदा०

( १ ) रणांगणांत आल्यानंतर कोणाबरोबर युद्ध करावें हें ठरविणें इष्ट आहे, असें अर्जुन बोलल्यावर " मग देवें वायुमंत्र उपदेशिला । अर्जुन वायुरूपें गेला । कौरवभार पाहुनि देवासि बोलिला । धनुष्य भाते ठेवोनिया ॥ " प्रा. गी. अ. १।३७. ज्ञानेश्वरींत या ' वायुमंत्रा'चा मागमूस नाहीं; व ही कथा गीता अ. १, श्लो. २४।२५ वरील ज्ञानदेवांच्या टीकेविरुद्ध आहे.

( २ ) प्राकृतगीतेंत जो गोत्रवध करतो, " त्यासी चांद्रायण प्रायश्चित्त । आणि कुंभीपाक अनंत । हें तूं सांगसी निभ्रान्त। कवण्या हेतु मारविसी ॥" ( अ. २, ओ. ७ ) असें म्हटलें आहे. ज्ञानेश्वरींत याचा गंध नाहीं.

( ३ ) प्रा. गी. अ. ३, ओ. ४–७ यांत जें वर्णन आहे तें ज्ञानदेवांच्या कोणत्याच ग्रंथांत आढळत नाहीं.

( इ ) " सर्वां जीवीं मी असतों । तरी कासया अवतार घेतों । बापुडीं कौरवें कां मारवितों । त्यांचे देहीं असतां ॥" प्रा. गी. अ. ४, ओ. २४. ही विचारसरणि ज्ञानेश्वरीच्या तत्त्वज्ञानाच्या अगदीं विरुद्ध आहे.

( ई ) बहुचंचल मन स्थिर करण्यास पुढील उपाय सांगितला आहेः– "आहार निद्रा मैथुन । यासी करावें दंडण । आहार तुटलिया जाण । प्राणरक्षण गलितपत्रें ॥ संगें एकचि असावा । त्यासी कलहो न करावा । कां संगें पाळावा हुताशन ॥" ( प्रा. गी. अ. ६, ओ. ५–७). याची "गजबजा सांडिलिया । वसवी वनस्थळिया । अंगाचिया मांदिया । एकलेया ॥ " ( ज्ञा. अ. १८।१०५२ ) या ओवीशीं तुलना करण्यासारखी आहे. समग्र ज्ञानेश्वरींत हुताशन बरोबर पाळावा ह्याचा कोठेंहि उल्लेख नाहीं.

(उ) प्रा. गी. अ. ९, ओ. ११ यांत स्त्रियांमधील विभूति सांगतांना " कीर्तिः श्रीर्वाक्‌च नारीणाम् " हें सोडून " स्त्रियांत लक्ष्मी उत्तम " असें सांगितलें आहे. हें ज्ञानेश्वर कधींहि सांगणार नाहींत.

असे आणखी कितीतरी प्रसंग दाखवितां येतील कीं, जेथें प्राकृत गीताकर्ते ज्ञानदेव हे ज्ञानेश्वरीकर्ते ज्ञानदेव यांच्या कधींहि सांगण्यांत न आलेल्या एवढेंच नव्हे, तर त्यांच्या लिखाणावरून ते कधींहि सांगणार नाहींत अशा गोष्टी या गीतेंत सांगतात. सारांश, केवळ प्रत्येक अध्यायाच्या शेवटीं ' म्हणे ज्ञानदेव ' आहे म्हणून ही प्राकृतगीता ज्ञानेश्वरीकर्त्या ज्ञानदेवांनींच केली, असें म्हणतां येणार नाहीं; व अंतर्गत पुराव्यावरूनहि ती ज्ञानेश्वरीकर्त्या ज्ञानदेवांची खास नाहीं, हें निश्चित होत आहे. अर्थात् हे कोणी तरी दुसरे ज्ञानदेव असले पाहिजेत.

**गायत्रीटीका, शुकाष्टक, स्वात्मानुभव** वगैरे छोट्या प्रकरणांविषयीं सुद्धा तीं ज्ञानदेवांचीं नसावीं असें म्हणण्यास पुष्कळच जागा आहे. तात्पर्य,

आमच्या मतें आम्हीं आरंभीं क्रमशः दिलेल्या १४ ग्रंथांपैकीं पहिले सहा तेवढेच ज्ञानदेवांचे ग्रंथ होत, बाकीचे नव्हत.

तथापि ज्ञानदेवांच्याच म्हणून ठरविलेल्या ग्रंथांचा कालानुक्रम निश्चित करणें हें कामसुद्धा कठीण आहे. कारण ' ज्ञानेश्वरी ' व ' नमन ' या दोन ग्रंथांशिवाय ज्ञानदेवांच्या कोणत्याहि ग्रंथाचा काल ठरविण्यास अंतर्गत वा बहिर्गत असा निश्चित पुरावा नाहीं. ज्ञानेश्वरीच्या शेवटीं ग्रंथरचनेचा शक देणारी पूर्वीं उल्लेखिलेली ओवी यासंबंधीं महत्त्वाची असल्यामुळें पुनः येथें उद्धृत करितोंः—

" शके बाराशतें बारोत्तरें । तैं टीका केली ज्ञानेश्वरें ।
सच्चिदानंद बाबा आदरें । लेखकु जाहला ॥ " अ. १८।१८१०

यावरून ज्ञानेश्वरी शके १२१२ त संपूर्ण झाली ही गोष्ट निर्विवाद आहे. तसेंच ज्ञानदेवांचें 'नमन' म्हणून जें प्रसिद्ध आहे व जें नामदेवांच्या गाथ्यांत छापलें जातें, तें ज्ञानदेवांचें महाराष्ट्रीय सरस्वतीच्या चरणीं वाहिलेलें शेवटचें वाक्पुष्प होय. कारण 'नमन' संपवून ज्ञानदेव लगेच समाधींत बसले, असा नामदेवांचाच पुरावा आहे.

'नमन' हें जसें शेवटचें म्हणून निश्चित, तसेंच ज्ञानेश्वरी हा ज्ञानदेवांचा पहिला ग्रंथ असावा, हेंहि अंतर्गत पुराव्यावरून निश्चित ठरवितां येण्यासारखें आहे. ज्ञानेश्वरींत ठिकठिकाणीं खालीलप्रमाणें आढळून येणारे उद्गार कसलेला लेखक केव्हांहि काढणार नाहीं.

(१) "येऱ्हवीं तरी मी मूर्खु। जरी जाहला अविवेकु । तरी संतकृपादीपकु । सोज्वळु असे ॥ " अ. १।७६

(२) ज्ञानदेवांची गुरूंपाशीं वारंवार आपल्या स्फूर्तीस भरती आणून स्वतः-कडून ग्रंथ करवून घेण्याची प्रार्थना. उदा० अ. ९ व १४ यांचीं नमनें.

(३) आपण करीत असलेली गीतेची प्राकृत टीका गीतारहस्य बरोबर प्रकट करणारी आहे हें दाखविण्याकरितां ज्ञानेश्वरीच्या सरतेशेवटीं,

" व्यासाचा मागोवा घेतु । भाष्यकारातें वाट पुसतु । अयोग्यही मी न पवतु । कें जाईन " (अ. १८।१७२२) असें लिहिण्याची वाटलेली आवश्यकता.

(४) एक मोठें काम उरकलें ही जी नवप्रवर्तकांत काम उरकल्यावर ऊर्मि असते तसे उद्गार. उदा० अ. १८।१७८४–८५.

वरील गोष्टी लक्षांत घेतां ज्ञानेश्वरी हा ज्ञानदेवांचा पहिला ग्रंथ असावा असें मानण्यास सबळ पुरावा आहे, असें दिसून येईल. कै. प्रो. वा. ब. पटवर्धन (' वुइल्सन् फिलॉलॉजिकल् लेक्चर्स ', १९१७) यांनीं अनुभवामृत प्रथम व ज्ञानेश्वरी मागाहून रचिली असावी असें ठरविलें आहे; व यास त्यांनीं पांच प्रमाणें दिलीं आहेत. त्यांपैकीं अनुभवामृताच्या पूर्वीं पांच संस्कृत श्लोक रचून ज्ञानदेवांनीं नमन केलें आहे, उलट ज्ञानेश्वरींतील सर्व नमनें प्राकृत आहेत, हें एक आहे. संस्कृत नमन करण्यांत ज्ञानदेवांचा हेतु संस्कृतपरंपरेस थोडें चिकटण्याचा होता, पण पुढें निर्ढावल्यावर त्यांनीं संस्कृता-पुढें मान वांकविण्याचें सोडून देऊन ज्ञानेश्वरींतील नमनें प्राकृतांत लिहिलीं, म्हणून प्रथम अनुभवामृत व मागाहून ज्ञानेश्वरी रचिली असली पाहिजे, असा त्या मुद्द्याचा आशय आहे. त्यांच्या मतें दुसरें महत्त्वाचें प्रमाण म्हणजे अनुभवामृत हा ग्रंथ सगळा शांकरमतानुयायी आहे, तर ज्ञानेश्वरींत रामानुजांच्या भक्तीचें पूर्ण प्रतिबिंब पडलें आहे; अर्थात् अनुभवामृत प्रथम व ज्ञानेश्वरी नंतर असली पाहिजे. त्यांनीं दर्शविलेली इतर तीन प्रमाणें विशेष महत्त्वाचीं नाहींत.

वास्तविक नुसत्या नमनाच्या भाषेवरून या दोन ग्रंथांचा कालानुक्रम ठरविणें धोक्याचें असून ही गोष्ट अंतर्गत पुराव्यावरूनच मुख्यतः ठरविणें योग्य आहे. ज्ञानदेवांची ज्ञानेश्वरींतील बोलण्याची पद्धति व अमृतानुभवां-तील पद्धति यांची तुलना केली, तर अमृतानुभव हा ग्रंथ निखालस ज्ञानेश्वरीनंतरचा आहे, हें सिद्ध होईल. आपण गीतारहस्य जें सांगतों तें बरोबर असण्याचा संभव आहे, कारण मुलगा जसा बापाच्या पावलावर पाऊल टाकीत जावा, तसें आपण व्यास व भाष्यकार यांच्या पावलावर

पाऊल टाकीत चालत आहों, असें ज्ञानेश्वरीच्या शेवटीं उद्गार काढणारे ज्ञानदेव अमृतानुभव प्र. ३, ओ. १८ मध्यें वैकुंठींचे सुजाण श्रीवल्लभ व सदाशिव दोघे असेंच म्हणतात म्हणून मी मानतों, पण त्यांनीं असें म्हटलें नसतें तरीहि मीं मानिलेंच असतें, असें सांगतात. तसेंच ज्ञानेश्वरींत 'येन्हवीं तरी मी मूर्ख' म्हणणारे ज्ञानदेवच 'उपरि दशोपनिषदें । पुढारा न ढाळती पदें' असा आपला अनुभव आहे, असें निर्भयपणानें बोलतात. या दोन प्रमाणांवरून ही गोष्ट उघड आहे कीं, अमृतानुभवांतील निर्धास्तपणा ज्ञानेश्वरींत नाहीं. ज्ञानेश्वरी रचण्याचें व अमृतानुभव कथन करण्याचें कारण वेगळें असल्यामुळें अमृतानुभवाचें नमन संस्कृतांत व ज्ञानेश्वरींतील सर्व नमनें प्राकृतांत आहेत. पण त्यांतहि संस्कृत शब्द जसेच्या तसे ठेविलेले आहेत अशीं दहावा व अठरावा या दोन अध्यायांचीं नमनें आहेतच. प्रो. पटवर्धनांच्या दुसऱ्या प्रमाणाविषयीं थोडें लिहिणें पुरे. त्यांनीं प्रारंभींचे कांहीं श्लोक अथवा प्रकरणें यापलीकडे अमृतानुभव फारसा बारकाईनें पाहिलेला दिसत नाहीं. नमनाच्या श्लोकांतील 'शांकरी विद्या' या शब्द-समुच्चयावरच त्यांनीं आपली सर्व कल्पना उभारलेली दिसते. परंतु अमृतानुभवाची स्थिति त्याच्या अगदीं उलट आहे. संपूर्ण सातवें प्रकरण शांकरीय वेदान्तांतील मानीव अज्ञान अयुक्तिक कसें आहे हें दाखविण्यांत खर्च झालें आहे. सारांश, प्रो. पटवर्धन यांचा दुसरा मुद्दाहि मिथ्या आहे. वर दिलेल्या अंतर्गत पुराव्यावरून, तसेंच नामदेवांच्या अभंगांतहि तसा जो स्पष्ट उल्लेख आहे त्यावरून, अमृतानुभवानंतरची ज्ञानेश्वरी नसून ज्ञानेश्वरी-नंतरचा अमृतानुभव आहे, ही गोष्ट सिद्ध आहे.

तात्पर्य, ज्ञानेश्वरी हा ज्ञानदेवांचा पहिला ग्रंथ असून नमन हा शेवटचा ग्रंथ होय; व या दोहोंमध्यें बाकीचे ग्रंथ झालेले आहेत. चांगदेवपासष्टि अमृतानुभवानंतरची आहे. योगवासिष्ठ त्यापुढचें असावें. अभंग व हरिपाठ केव्हां रचिले असतील हें ठरविणें कठीण आहे. आमच्या मतें बाकीचे ज्ञानदेवांच्या नांवावर मोडणारे ग्रंथ त्यांचे नसल्यामुळें त्यांचा कालानुक्रम ठरविण्याची आवश्यकता नाहीं.

# प्रकरण पांचवें

## ज्ञानदेवांचें कवित्व

" म्हणोनि अक्षरीं सुभेदीं । उपमा श्लेष कोंदाकोंदीं ।
झाडा देईन प्रतिपदीं । ग्रंथार्थासी ॥ " ज्ञानेश्वरी, अ. १३।११६२

" जेथ साहित्य आणि शांति । हे रेखा दिसे बोलती ।
जैसी लावण्यगुणकुलवती । आणि पतिव्रता ॥" कित्ता, अ. ४।२१७

ज्ञानदेव हे जसे मोठे पंडित व थोर आत्मानुभवी होते तसे ते अभिजात कविहि होते. मात्र त्यांनीं आपली सर्व काव्यस्फूर्ति विश्वात्मक देवाचें वर्णन करून धर्मकीर्तन करण्यांत खर्च केली. महाराष्ट्रीय वाङ्‌मयांत ज्ञानदेवांच्या ग्रंथांस अग्रपूजेचा मान असेल तर त्यासहि कारण त्यांच्या ग्रंथांत दिसून येणारा श्रेष्ठ तत्त्वज्ञान व श्रेष्ठ कवित्व यांचा अपूर्व मिलाफ हेंच होय. ग्रंथ-रचना करीत असतां ज्ञानदेवांस 'जगा आनंदाचे आवारू' मांडावयाचें असल्यामुळें सामान्यतः रूक्ष म्हणून गणिला जाणारा वेदान्त त्यांनीं अशा रसाळ काव्यस्वरूपांत मांडिला कीं, त्यांच्याच भाषेत सांगावयाचें म्हणजे, " माझा मराठाचि बोलु कौतुकें । परि अमृतातेंही पैजां जिंकें । ऐसीं अक्षरें रसिकें मेळवीन ॥[1] " आणि " ऐका रसाळपणाचिया लोभा । कीं श्रवणींचि होति जिभा । बोलें इंद्रियां लागे कळंभा एकमेकां ॥[2] " ही प्रतिज्ञा त्यांनीं खरी करून दाखविली. अशीं रसभरित अक्षरें मुखांतून यावीं म्हणून त्यांनीं ठिकठिकाणीं आपल्या गुरूंजवळ, " माझी प्रज्ञावेली वेल्हाळ । काव्यें होय सफळ । तो वसंतु होय स्नेहाळ–। शिरोमणी[3] ॥" व " अगा विश्वैकधामा । तुझा प्रसादचंद्रमा । करू मज पूर्णिमा । स्फूर्तीची जी ॥[4] " अशी विनंती केली असून तदनुसार त्यांजवर गुरुप्रसादहि झाला. अर्थात् प्रस्तुत प्रकरणांत मुख्यत्वें ज्ञानदेवांचा अत्यंत प्रसिद्ध व लोकप्रिय ग्रंथ जो ज्ञानेश्वरी त्याच्याच आधारें त्यांच्या काव्याचें थोडक्यांत निरीक्षण करूं.

---

(१) ज्ञा. अ. ६।१४. (२) अ. ६।१६. (३) अ. १४।११. (४) अ. ६।२२.

मराठी ग्रंथ संग्रहालय स्वतंत्र प्रत सं. ... नं. ...

"वाक्यं रसात्मकं काव्यम्" हो 'साहित्यदर्पण' कारांची काव्याची व्याख्या प्रायः सर्वमान्य आहे. तथापि सुप्रसिद्ध आंग्ल कवि व टीकाकार मॅथ्यू ॲर्नोल्ड यानें महाकवि गटेसंबंधीं जे उद्गार काढले आहेत तेहि मननीय आहेत. तो म्हणतो, "आपली काव्यसृष्टि अजरामर व्हावी असा प्रयत्न कविजनांना करावयाचा असेल तर मानवी जीवन व जगत् यांविषयींचें व्यापक व संपूर्ण ज्ञान त्यांस असणें अवश्य आहे."† ज्ञानदेवहि, "वाचे बरवें कवित्व । कवित्वीं बरवें रसिकत्व । रसिकत्वीं परतत्त्व-। स्पर्शु जैसा ॥" ( ज्ञा. अ. १८।३४७) असेंच म्हणतात. अर्थात् सत्काव्य हें जसें रसात्मक असलें पाहिजे तसें परतत्त्वस्पर्शी करणारें अथवा जीविताचें रहस्य उकलून दाखविणारेंहि असलें पाहिजे, हें उघड आहे.

तसेंच काव्य प्रभावशाली होण्यास त्याच्या अंगीं प्रसादमाधुर्यादि गुण असणें आवश्यक आहे. कारण, त्यांच्या अभावीं काव्य परतत्त्वस्पर्शी असूनसुद्धां त्याकडे कोणी सहज वळणार नाहीं. निर्मल व शांत जलाशयांत पाहण्याचाच अवकाश कीं, पाहणाऱ्यास त्यांत जसें आपलें प्रतिबिंब तात्काळ स्पष्ट उमटलेलें दिसतें, तसें ज्या ग्रंथांत प्रसाद आहे तो हातीं धरण्याचाच अवकाश कीं, त्यांत प्रतिबिंबित झालेला आशय वा प्रमेय वाचकाच्या स्पष्ट अनुभवास येतें. गहन विषयदेखील सहजसुंदर भाषेंत सांगणें हें कार्य कठीण आहे व तें फार थोड्या ग्रंथकारांस साधतें. त्यांतून ह्या प्रसादगुणास नादमाधुर्याची जोड असल्यास पाहावयासच नको. असें उभयगुणयुक्त काव्य म्हणजे ज्ञानदेवांचाच दृष्टान्त द्यावयाचा तर, "सहजें मलयानिलु मंदु सुगंधु । तया अमृताचा होय स्वादु । आणि तेथेंचि जोडे नादु । जरी दैवगत्या ॥ तरी स्पर्शें सर्वांग निववी । स्वादें जिह्वेतें नाचवी । तेवींचि कानाकरवीं ।

† "The poets' necessary subjects are the life, and the world, the comprehensive and thorough knowledge of which they must possess, if they aim at making their creative effort enduring."

म्हणवी बापु माझा ॥" ( ज्ञा. अ. ४।२२०-२१ ). ज्ञानदेवांची हांव असलें प्रसन्नमधुर काव्य निर्माण करण्याची होती हें त्यांच्या उद्गारावरून स्पष्ट होत आहे.

आतां ज्ञानदेवांच्या ग्रंथांत हें सत्काव्याचें स्वरूप कसें उत्कृष्ट रीतीनें दिसून येतें हें प्रथम थोडक्यांत दाखवून त्यांच्या काव्याचे विशेष कोणते आहेत तें शेवटीं सांगूं.

ज्ञानदेवांचें काव्य परतत्त्वस्पर्शी आहे हें उघडच आहे; व हें परतत्त्व पाहण्याची दृष्टि पुढील प्रकरणीं आम्ही वाचकांस देणार आहों. तूर्त येथें रस व अलंकार या दृष्टीनें त्यांच्या काव्याचा आपण थोडासा विचार करूं.

ज्ञानदेवांच्या सर्व वाङ्मयांत शांतरस हा प्रामुख्यानें दिसून येतो. ज्ञानेश्वरी ही श्रीमद्भगवद्गीतेवर टीका असल्यामुळें तींत शांतरसच अर्थात् प्रधान आहे. निर्वेद अथवा शम हा शांतरसाचा स्थायिभाव होय. ह्या शांतरसाचा वर्षाव वक्त्याच्या अधिकारानुरूप इतका प्रभावशाली होऊं शकतो कीं, वर्षाकालांत सागरावर मोकाट सुटलेल्या तुफानाप्रमाणें आपल्या उच्छृंखल मनोवृत्तींसहि तो शांत करूं शकतो. ज्ञानदेवांची तर अशी प्रतिज्ञा आहे कीं, आपल्या व्याख्यानांतील शांतरस शृंगारासहि जिंकील, "खेचराचिया मना" सात्त्विकाचा पान्हा आणील व सुमनावर श्रवणासवें समाधि लावील. ज्ञानदेवांचें "निष्काम अपत्य" जी काव्यकन्या तिनें शब्दालंकार, अर्थालंकारादि भूषणें धारण केली असून आपल्या अप्रतिम सौंदर्यानें जगाचे डोळे दिपवून टाकिले आहेत. पण ही काव्ययुवति त्यांचाच दृष्टान्त द्यावयाचा म्हणजे केवळ असाधारण लावण्यगुणयुक्त नसून "कुलवती आणि पतिव्रता" आहे, आपलें नैसर्गिक लावण्य व शृंगारविलास पार्थिव सेवेंत खर्चीं घालणारी छचोर 'अहेव' नव्हे. त्यांनींच म्हटल्याप्रमाणें लक्ष्मी जशी श्रीविष्णूच्याच ठिकाणीं अनन्य होऊन राहिली, तशी ही ज्ञानदेवांची "लावण्यगुणकुलवती" सालंकृत काव्यकन्या आत्मारामाच्या ठिकाणींच पतिव्रता होऊन राहिलेली आहे. सारांश, ज्ञानदेवांच्या

काव्याचा मुख्य विषय आत्मनिरूपण हाच असल्यामुळें त्यांच्या ग्रंथांतून शांतरस अविच्छिन्न वाहावा यांत नवल नाहीं.

समग्र ज्ञानेश्वरी ग्रंथ हा शांतरसप्रधान तर खराच, परंतु त्यांतल्यात्यांतहि कांहीं स्थळें या दृष्टीनें अप्रतिम म्हणून दाखवितां येतील. उदा० गीता अ. १५, श्लो. ५; अ. १६, श्लो. १-४; व अ. १८, श्लो. १७, ४९-५५, विशेषतः श्लो. ५४-५५ वरील ज्ञानेश्वरीच्या ओव्या. तथापि केवळ शांतरस सेवन करणारा अधिकारी वर्ग थोडा. बहुजनसमाजास नुसत्या गोड पदार्थापेक्षां श्रीखंडासारखा आंबट गोड पदार्थ अधिक रुचकर लागतो. यास्तव शांतरसांत अधूनमधून इतर रसहि मिसळून ज्ञानदेवांनीं स्वादिष्ट असा पाक तयार केला आहे. उदाहरणार्थ, अकराव्या अध्यायांत त्यांच्याच भाषेंत बोलावयाचें म्हणजे, " जेथें शांताचिया घरा । अद्‌भुत आला आहे पाहुणेरा । आणि येरांही रसां पांतिकरां । जाहला मानु ॥" (अ. ११।२). येथें शांत व अद्‌भुत यांजबरोबर वीर, रौद्र, भयानकादि रसांसहि कसा मान मिळाला आहे हें दाखविण्याकरितां ज्ञानदेवांनीं पुढील ओवींतच अगदीं व्यवहारांतला दृष्टान्त दिला आहे. ते म्हणतात, " अहो वधुवरांचिये मिळणीं । जैशीं वऱ्हाडियांही लुगडीं लेणीं । तैसे देशियेच्या सुखासनीं । मिरवले रस ॥" (अ. ११।३). अर्थात् लग्नांत जसा मुख्यत्वें वधूवरांचाच मान, पण त्यांजबरोबर जमलेल्या वरमाई, नणंद, पाणजावई इत्यादि वऱ्हाडी मंडळीसहि ज्याप्रमाणें त्यांच्या त्यांच्या योग्यतेप्रमाणें पागोटीं, लुगडीं, अलंकार देत असतात; त्याप्रमाणें ह्या अध्यायांत शांत व अद्‌भुत रसांचें मीलन झालें आहे म्हणून त्यांचा तर मुख्य मान आहेच, पण इतर रसांचाहि त्यांच्या त्यांच्या योग्यतेप्रमाणें मान केला आहे. तथापि ज्ञानदेवांनीं अकराव्या अध्यायाचें हें जें वर्णन केलें आहे तें कमीअधिक प्रमाणांत समग्र ज्ञानेश्वरी ग्रंथास लागू आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं.

ज्ञानेश्वरींत शांतरसाला प्राधान्य असल्यामुळें शृंगारास फारशी जागाच नाही. परंतु ज्ञानदेवांना शृंगाराचेंहि अगदींच वावडें नाहीं. मात्र हा शृंगार

मुग्ध असून त्यांच्या दृष्टान्तांतच तो मुख्यत्वें आढळून येतो. उदा० ज्ञा. अ. १, । ४२. वीर व भयानक रस पहिल्या व अकराव्या अध्यायांत पाहावयास मिळतात; आणि हास्य हा नवव्या अध्यायांत दृष्टोत्पत्तीस येतो.

येणेंप्रमाणें काव्याचा आत्मा जो रस त्याचा ज्ञानेश्वरींत कसा परिपोष झाला आहे हें थोडक्यांत दर्शविलें. आतां काव्याची शोभा वाढविणारे जे शब्दालंकार व अर्थालंकार त्यांचें किंचित् निरीक्षण करूं.

ज्ञानदेव हे कुशल कारागीर आहेत. कुशल कारागीर हा मूर्ति घडवितांना ज्या दगडाची मूर्ति घडवावयाची त्याची जात पाहण्यापासून अगदीं बारीकसारीक गोष्टींचीहि जशी काळजी घेतो, त्याप्रमाणें आपली वाङ्मय मूर्ति घडविण्याकरितां ज्ञानदेवांनीं ज्या शब्दांची ती घडवावयाची त्यांच्या निवडीपासून तों थेट तिला जें स्वरूप प्राप्त करून द्यावयाचें त्याच्या संपूर्ण आविष्कारापर्यंत एकंदर साहित्यसंस्काराची काळजी घेतली आहे. कारण, काव्य केवळ परतत्त्वस्पर्शी असून उपयोगी नाहीं, तर तें लोकप्रिय होण्यास त्याचें बाह्यांगदेखील रेखीव, प्रमाणबद्ध व आकर्षक असलें पाहिजे, हें ज्ञानदेवांस चांगलें अवगत होतें. म्हणूनच शब्द रेखीव योजणें, त्यांची पदपद्धति अर्थास साजेशी जुळविणें, नादमाधुर्य साधणें इत्यादि गोष्टींकडे त्यांनीं चांगलें लक्ष पुरविलें आहे. आपण मराठींत अशी सुंदर शब्दरचना करूं कीं, त्या शब्दांच्या नादरंगांकडे पाहून लोकांनीं भुलावें, असें तें एके ठिकाणीं म्हणतातः—

"जियें कोंवळिकेचेनि पाडें । दिसती नादींचे रंग थोडे । वेधें परिमळाचें बीक मोडे । जयाचेनि" अ. ६।१५

तसेंच ज्ञानदेव श्रोत्यांच्या मुखांत खालील वाक्यें घालतातः—

"तंव श्रोते म्हणती दैव । कैशी बोलाची हवाव । काय नादातें हन बरव । जिणोनि आली ॥ हां हो नवल नोहे देशी । मऱ्हाटी बोलिजे तरी ऐशी । वाणें उमटताहे आकाशीं । साहित्यरंगाचें ॥" अ. ६।१३२-३३

या दोन उताऱ्यांवरून ज्ञानदेवांचें नादाकडे किती लक्ष होतें हें

व्यक्त होत आहे. यामुळेंच त्यांच्या काव्यांत शब्दसौष्ठव असून अनुप्रासादि शब्दालंकार उत्तम साधलेले आहेत. अनुप्रास तर ठिकठिकाणीं आढळतो. सहज जातां जातां म्हणून खालील दोन ओंव्या देतोः—

"ऐसें निजजनानंदें । तेणें जगदादिकंदें । बोलिलें मुकुंदें । संजयो म्हणे ॥" अ. १२।२३९

"ऐसें कलुषकरिकेसरी । त्रितापतिमिरतमारी । श्रीवीरेश्वरनरहरी । बोलिलें तेणें ॥" अ. १७।४२३

ओंवीवृत्ताचा उपयोग केल्यामुळें प्रत्येक चरणाच्या शेवटीं तेंच अक्षर येऊन यमक होणें अवश्यच आहे. असलें साधें यमक ज्ञानेश्वरींत भरपूर आढळतें. पण ज्ञानदेवांनीं मोठमोठीं मुखयमकें वा समुद्रयमकें साधण्याचा कोठेंच प्रयत्न केलेला नाहीं; कारण, त्यांत एकप्रकारची कृत्रिमता येते. ज्ञानदेवांस सहजमनोहर व आबालसुबोधकाव्य करावयाचें असल्यामुळें ते या खटपटींत पडले नाहींत. नेहमींचें यमक जुळवितांनादेखील शब्द तोडून यमक साधणें इत्यादि प्रकार ज्ञानेश्वरींत थोडे आढळतात. असे शब्द तोडल्याचीं अ. १८।१७ व अ. १८।३५ हीं उदाहरणें देतां येतील. प्रसाद व माधुर्य हे काव्यगुण ज्ञानेश्वरींत ओतप्रोत भरलेले आहेत. ज्ञानदेवांच्या शब्दांत अजब जादू आहे. त्यांची ओंवी इतकी सहज व गोड आहे कीं, 'ओंवी ज्ञानेशाची' ही उक्ति अगदीं यथार्थ असून 'अर्थ न वुझौनि' नुसतें गुणगुणत तिचें गीतसुख घेण्यांतहि मौज वाटते.

ज्ञानदेवांचें काव्य उपमा, दृष्टान्त, रूपक, उत्प्रेक्षा, अपह्नुति, एकावली इत्यादि नाना अर्थालंकारांनीं युक्त असून पहिल्या दोहोंची तर त्यांच्या ग्रंथांत गर्दीच आहे. साध्या शब्दांनीं जेथें काम भागत नाहीं तेथें संपूर्ण अर्थ मनांत बिंबविण्याकरितां मनुष्य अलंकाराचा उपयोग करतो. यापासून दोन गोष्टी साधतात. एक तर शब्द वांचतात व दुसरा लाभ म्हणजे अर्थ स्मृतिपटलावर इतका चांगला उमटतो कीं, सहसा तो नष्ट होत नाहीं. अशा अलंकारांपैकीं उपमा व दृष्टान्त हे अतिशय साधे, पण तितकेच उपयुक्त

असे अर्थालंकार होत. ज्ञानदेवांनीं आपल्या ग्रंथांत यांचा भरपूर उपयोग केला आहे. या प्रकरणाच्या आरंभीं उद्धृत केलेल्या ओवींत "मी मार्मिक शब्दांनीं उपमा, श्लेष यांची गर्दी करीन" अशी ज्ञानदेव प्रतिज्ञा करीत आहेत. खरोखरच कै. विष्णुशास्त्री चिपळूणकर यांनीं म्हटल्याप्रमाणें या ज्ञानेश्वरीरूपी ज्ञानतरंगिणींत दोनतीन हात कोणत्याहि बाजूला मारून पाहा, आपल्या हाताला दृष्टान्तरूप सुंदर कमळें दहापांच लागलीं नाहींत असें होणारच नाहीं. किंबहुना ज्ञानदेवांची दृष्टान्त देण्याची हातोटी इतकी अपूर्व आहे कीं, 'उपमा कालिदासस्य' या उक्तीप्रमाणें 'दृष्टान्तो ज्ञानदेवस्य' असेंहि म्हणण्यास प्रत्यवाय दिसत नाहीं.

उपमालंकार हा दोन वस्तूंमधील कांहीं साम्यावर अधिष्ठित असतो. रूपकाप्रमाणें त्यांत उपमान व उपमेय यांचें ऐक्य कल्पून भाषा वापरलेली नसते. यामुळें उपमा ही उत्तम जरी असली तरी नेहमीच एकांगी असते. उत्तम उपमेच्या स्वरूपासंबंधानें दोनतीन गोष्टी सांगतां येतील. तिचा पहिला महत्त्वाचा गुण म्हणजे तिनें वर्ण्य विषय वाचकाच्या अथवा श्रोत्याच्या मनांत सहज व उत्कृष्ट रीतीनें ठसेल अशाप्रकारचें उपमान व उपमेय यांमधील साधर्म्य दर्शविलें पाहिजे. तसेंच ती शक्यतों साधी व्यवहारांतली असावी. कारण, सामान्य जनांच्या अनुभवाशीं ती जुळती नसेल तर ती फिकी पडेल व तिचें कार्य होणार नाहीं. तिचा आणखी एक गुण म्हणजे ती सूचक व साभिप्राय असावी. ज्ञानदेवांच्या उपमांत हे गुण बहुतांशीं आढळून येतात. उदाहरणार्थ खालील उपमा पाहाः—

(१) "जात्यंधा लागे पिसें। मग तें सैरा धांवे जैसें। तुझें शाहाणपण तैसें। दिसतसें॥" अ. २।९३

(२) "जैसा कर्पूराचा राशि कीजे। मग अग्नि लाऊनि दीजे। कां मिष्टान्नीं संचरविजें। काळकूट॥ दैवें अमृतकुंभ जोडिला। तो पायें हाणोनि उलंडिला। तैसा नासिती धर्मु निपजला। हेतुकपणें॥"

अ. २।२५१–५२

( ३ ) " स्वशिखरांचा भारु । नेणे जैसा मेरु । कीं धरा यज्ञसूकरु । वोझें न म्हणे ॥ नाना चराचरीं भूतीं । दाटणी नव्हे क्षिती । तैसा नाना द्वंद्वीं प्राप्तीं । घामेजेना ॥ " अ. १३।३४७–४८

उपमेंत जसें साधर्म्य असतें, तसें दृष्टान्तांतहि असतें. परंतु उपमेला लागणारें साधर्म्य दोन वस्तूंमधील पाहिजे, तर दृष्टान्ताला लागणारें साधर्म्य दोन स्वतंत्र चित्रांमधील पाहिजे. यालाच साहित्यशास्त्रांत बिंबप्रतिबिंब भाव म्हटलें आहे. उदा० " पैं महोदधीचिया तरंगा । व्यवस्था धरूं नये जेवीं गा । तेवीं माझिया विशेषलिंगां । नाहीं मिती ॥ " अ. १०।३०१. येथें समुद्राचे तरंग आणि माझ्या विभूति या दोन वस्तूंत अमितपणा हा समानधर्म आहे, म्हणून या ओवींत उपमालंकार आहे. पण " तो तूं परब्रह्मचि असकें । मज दैवें दिधलासि हस्तोदकें । तरी आतां भेदु कायसा कें । देखावा कवणें ॥ जी चंद्रबिंबाचा गाभारां । रिगालियावरीही उबारा । परि राणेपणें शार्ङ्गधरा । बोलों हें तुम्ही ॥ " ( अ० १०।३२२–२३ ) या ओव्यांत दृष्टान्त आहे. कारण, श्रीकृष्ण हातांत येणें आणि भेद नाहींसा होणें हें वस्तुस्थितीचें एक चित्र व चंद्रबिंबाच्या गाभाऱ्यांत शिरणें आणि उबारा नष्ट होणें हें दुसरें चित्र यांत साम्य दाखविलें असून श्रीकृष्ण व चंद्राचा गाभा हातांत येणें व आंत शिरणें, भेद नाहींसा होणें हीं बिंबप्रतिबिंबरूपानें सांगितलीं आहेत.पुढील आणखी दोन सुंदर दृष्टान्त पाहा:–

( १ ) " देवा तुवांचि ऐसें बोलावें । तरी आम्हीं नेणतीं काय करावें । संपलें म्हण पां आघवें । विवेकाचें ॥...वैद्यु पथ्य वारूनि जाये । मग जरी आपणचि विष सुये । तरी रोगिया कैसेनि जिये । सांगे मज ॥"अ. ३।६,८

( २ ) " व्यासादिकांचे उन्मेख । राहाटती जेथ साशंक । तेथ मीही रंक एक । वाचाळी करीं ॥...आणि क्षीरसिंधूचिया तटा । पाणिया येती गजघंटा । तेथ काय मुरकुटा । वारिजत असे ॥ पांखफुटें पांखिरूं । नुडे तरी नभींच थिरू । गगन आक्रमी सत्वरू । तो गरुडही तेथ ॥ राजहंसाचें चालणें । भूतळीं जालिया शाहाणें । आणिकें काय कोणें । चालवें-

चिना ॥ जी आपुलेनि अवकाशें । अगाध जळ घेपे कलशें । चुळीं चूळपणा ऐसें । भरूनि न निघे ॥ दिवटीच्या आंगीं थोरी । तरी ते बहु तेज धरी । वाती आपुलिया परी । आणीच कीं ना ॥ " अ. १८।८७०९–१५

ज्ञानदेवांनीं व्यावहारिक दृष्टान्त तर इतके विपुल दिले आहेत कीं, त्यांनीं दृष्टान्तद्वारा व्यवहार शिकविला असें कित्येक वेळां म्हणण्यांत येतें. परंतु त्यांनीं व्यवहार शिकविण्याकरितां दृष्टान्त दिले नसून पारमार्थिक सत्य पटविण्याकरितां ते दिले आहेत, हें लक्षांत ठेविलें पाहिजे. त्यांवरून अनुमानच काढावयाचें असेल तर लहान वयांतसुद्धा ज्ञानदेवांचें निरीक्षण अत्यंत व्यापक व सूक्ष्म होतें एवढेंच म्हणतां येईल.

ज्ञानदेवांचे आवडते व नावीन्यपूर्ण असे कांहीं दृष्टान्त इतके सुंदर आहेत कीं, त्यांच्यानंतर होऊन गेलेल्या बहुतेक संतकवींनीं त्यांचा अंगीकार केला आहे. उदाहरणार्थ,

" जैसी ते शुकाचेनि आंगभारें । नळिका भोविन्नली एरी मोहरें । तरी तेणें उडावें परि न पुरे । मनशंका ॥ वायांचि मान पिळी । अटुवें हियें आवळी । टिटांतु नळी । धरूनि ठाके ॥ म्हणे बांधला मी फुडा । ऐसिया भावनेचिया पडे खोडां । कीं मोकळिया पायांचा चवडा । गोंवी अधिकें ॥ ऐसा काजेंवीण आंतुडला । तो सांग पां काय आणिकें बांधला । मग न सोडीच जऱ्ही नेला । तोडूनि अर्धा ॥ " ज्ञा. अ. ६।७६–७९

हाच शुकाचा दृष्टान्त तुकारामबोवांच्या अभंगांत आपणांस सांपडतो:–

"शुकनळिकेन्यायें गुंतलासी काय । विचारूनि पाईं मोकळिया ॥ "

ज्ञानदेवांच्या दृष्टान्तांचा आणखी एक विशेष असा आहे कीं, त्यांना एखादी महत्त्वपूर्ण गोष्ट पटवावयाची असते तेव्हां ते लागोपाठ सातआठ दृष्टान्तसुद्धा ओळीनें देतात. उदा० ज्ञा. अ. १३।१७९–८३ व अ. १४।३७३–७६ पाहा. कित्येक वेळां हे दृष्टान्त एकापेक्षां एक चढते असतात व तात्त्विकदृष्ट्या त्यांचा फार उपयोग असतो. कारण कित्येकदा या दृष्टान्तश्रेणींत ग्रंथकाराच्या मताचें मंडन व दुसऱ्याच्या मतांचें खंडन

पाहावयास मिळतें. उदाहरणार्थ, संसार हा परमात्म्याचा विस्तार आहे हें विशद करण्याकरितां ज्ञानदेवांनीं पुढील तीन दृष्टान्त घेतले आहेतः—

" माझेया विस्तारलेपणा नांवें । हें जगाचि नोहे आघवें । जैसें दूध मुरालें स्वभावें । तरि तेंचि दहीं ॥ कां बीजचि जाहलें तरु । अथवा भांगाराचि अळंकारु । तैसा मज एकाचा विस्तारु । तें हें जग ॥"

ज्ञा. अ. ९ ।६४–६५

येथें पहिल्या दृष्टान्तांत दुधापासून दहीं जसें होतें, असें म्हणण्यांत सच्चिदानंद ब्रह्मापासून तद्विपरीत जग कसें होतें हें सांगितलें,म्हणजे आरंभ साधला; दुसऱ्यांत आदि व अंत साधला असून तिसऱ्यांत आदि, मध्य व अंत हे तिन्ही साधले आहेत. जगत् हें नांव आहे, बाकी मीच पूर्ण आहें, हें तत्त्व शेवटच्या दृष्टान्तानें पूर्णपणें व्यक्त होत आहे.

अशी दृष्टान्तपरंपरा देण्यास कवीचें सृष्टि व व्यवहार यांचें निरीक्षण अतिशय व्यापक व सूक्ष्म असणें अवश्य आहे. ज्ञानदेवांचें सृष्टिनिरीक्षण किती सूक्ष्म होतें व एकाच उपमानाचा वेगवेगळ्या प्रसंगीं वेगवेगळ्या अंशानें उपयोग करण्यांत त्यांचें बुद्धिवैभव कसें प्रकट झालें आहे तें पाहण्यासारखें आहे. उदाहरणार्थ, आपण 'सूर्य' हें उपमान घेऊं.

( १ ) शब्दाची व्याप्ति सांगतांना, " जैसें बिंब तरी बचकें एवढें । परि प्रकाशा त्रैलोक्य थोकडें । शब्दाची व्याप्ति तेणें पाडें । अनुभवावी ॥" ज्ञा. अ. ४।२१५

( २ ) आपण ब्रह्म झालों कीं सर्व ब्रह्मच यावर, " जैशी पूर्वदिशेच्या राउळीं । उदयाचि सूर्यें दिवाळी । कीं येरीही दिशा तियेचि काळीं । काळिमा नाहीं" ॥ अ. ५।८६

( ३ ) गुणातीत पुरुष देहीं अकर्तृत्व कसें पाहतो यावर, " कां तारागणीं लोपावें । सूर्यकांतीं उद्दीपावें । कमळीं विकासावें । जावें तमें ॥ ये कोणाचीं काजीं कहीं । सविता जैसा नाहीं ।" अ. १४।२९६-९७

( ४ ) आत्म्याच्या व्यापकतेवर, "एऱ्हवीं मी तरी कैसा । मुखाप्रति भानु कां जैसा । कहीं दिसे न दिसे ऐसा । वाणीचा नोहे ॥" अ. ९।६३

( ५ ) आत्म्यांत अज्ञानाचा प्रवेश नाहीं यावर, "तेजीं तिमिर न शिरे।" अ. ८।८९

( ६ ) ज्ञात्यास द्वैतबुद्धीचा दुकाळ यावर, "न जोडे अंधारु रवि जैसा।" अ. १५।२९२

सारांश, ज्ञानदेवांचें दृष्टान्तक्षेत्र इतकें व्यापक आहे कीं, निखिल चराचर सृष्टींतून आपणांस जें जें पाहिजे तें तें त्यांनीं उचलून घेतलें आहे. यामुळेंच ज्ञानदेवांनंतरच्या संतकवींत पुष्कळसे त्यांचेच दृष्टान्त आढळून आल्यास त्यांत नवल नाहीं.

ज्ञानदेवांच्या ग्रंथांत उपमा व दृष्टान्त यांची जशी गर्दी आहे तशींच रूपकेंहि पुष्कळ आहेत. त्यांमध्यें कांहीं लघुरूपकें आहेत तर कांहीं प्रदीर्घ अशीं आहेत. ज्ञानदेव आपल्या काव्यस्फूर्तीला भरती आली कीं, एकामागून एक अशीं दोनचार सुंदर रूपकें सहज करून जातात. त्यांचीं कांहीं रूपकें अत्यंत सुंदर आहेत. अशांपैकीं विस्तृत व सर्वांत मोठें म्हणजे सोळाव्या अध्यायाच्या आरंभीं सूर्याच्या रूपकानें केलेलें चित्सूर्याचें वर्णन हें होय. हें इतकें सुंदर आहे कीं, तें प्रत्येकानें स्वतःच वाचलें पाहिजे. प्लेटो या जगत्-विख्यात ग्रीक तत्त्ववेत्त्यानें आपल्या 'रिपब्लिक्' नामक ग्रंथांत या सूर्य-श्लेषाचा उपयोग केला आहे. त्याच्याशीं या वर्णनाची तुलना केल्यास ज्ञानदेवांचा आध्यात्मिक अनुभव व काव्यस्फूर्ति हीं दोन्ही किती श्रेष्ठ कोटीचीं आहेत हें सहज दिसून येईल; किंबहुना अध्यात्मवाङ्मयांत त्याला जोड नाहीं असें म्हटलें असतां विशेष अतिशयोक्ति होणार नाहीं. ज्ञानदेवांच्या रूपकांची मौज ही आहे कीं, त्यांपैकीं पुष्कळशीं अध्यात्मशास्त्रांतील निर-निराळ्या अनुभवांवर उभारलीं आहेत. अर्थात् अशीं रूपकें सरस वठविणें किती कठीण आहे हें निराळें सांगावयास नको. उदा० लघुरूपकें पाहा:—

(१) "म्हणोनि सहजें सुनीळु। कृपामृतें सजळु। तो बोळलासे श्रीगोपाळु।

महामेघु ।। तेथ सुदर्शनांची द्युति । तेंचि विद्युल्लता झळकती । गंभीर वाचा ते आयती । गर्जनेची ।। आतां तो उदार कैसा वर्षेल । तेणें अर्जुनाचळु निवेल । मग नवी विरूढी फुटेल । उन्मेषाची ।।" ज्ञा. अ. २।७७-७९

( २ ) " आतां श्रीकृष्णवाक्यबीजा निवाडु । आणि संजयसात्त्विकाचा बिवडु । म्हणोनि श्रोतयां होईल सुरवाडु । प्रमेयपिकाचा ।।" अ. ९।५३३

( ३ ) " दुराग्रहें हिरण्याक्षें । माझी बुद्धिवसुंधरा सूदली काखे । मग मोहार्णवगवाक्षें । रिघोनि ठेला ।।" अ. ११।६१

उपमामूलक इतर अलंकारहि ज्ञानेश्वरींत अनेक आढळतात. 'रामरावणयोर्युद्धं रामरावणयोरिव' हें 'अनन्वय' अलंकाराचें परिचित उदाहरण "राम रावण झुंजिन्नले कैसे । राम रावण जैसे । मीनले समरीं ।। " या रूपानें अ. १०।३८ मध्यें आलें आहेच; पण "जैसी अमृताची चवी निवडिजे । तरी अमृताचिसारिखी म्हणिजे ।। " अ. ४।१८२ अशांसारखीं त्याचीं दुसरीं रम्य उदाहरणेंहि तींत सांपडतात. तसेंच ज्ञानेश्वरींत जागोजाग आलेल्या 'उत्प्रेक्षा' अलंकाराच्या उदाहरणांपैकीं गीतेच्या श्लोकांचें खालील ओव्यांतून केलेलें वर्णन नमुन्यादाखल सांगतां येईलः—

" कीं श्लोक नव्हती आन । गमे गीतेचें महिमान । वाखाणिते बंदिजन । उदंड जैसे ।। कीं श्लोकाचिया आवारा । सात शतें करूनि सुंदरा । सर्वागम गीतापुरा । वसों आले ।। कीं निजकांता आत्मया । आवडी गीता मिळावया । श्लोक नव्हती बाह्या-। पसरु का जो ।। कीं गीताकमळींचे भृंग । कीं हे गीतासागरतरंग । कीं हरीचे तुरंग । गीतारथींचे ।।" ज्ञा. अ. १८।१६७१-७४

येथवर केलेल्या चर्चेवरून उपमा व उपमामूलक इतर अलंकार यांच्या योगें ज्ञानदेवांनीं आपलें काव्य अतिशय नटविलें आहे ही गोष्ट स्पष्ट होईल. मागें सांगितल्याप्रमाणें सर्व चराचर विश्व आपल्या कल्पनाशक्तीनें धुंडाळून त्यांनीं त्यांतून जें जें आपल्या उपयोगीं पडेलसें वाटलें तें तें आत्मसात् केलें आहे. नित्यव्यवहारांतील दृष्टान्त तर आहेतच; परंतु त्यांपेक्षांदेखील त्यांचे

निसर्गसंबंधी दृष्टान्त फार आहेत. निसर्गाशीं समरस होण्याचें ज्ञानदेवांचें सामर्थ्य असाधारण आहे. नद्या, पर्वत, मेघ, इंद्रधनुष्य, फुलें, झाडें, ऋतु इत्यादि नैसर्गिक गोष्टींवर त्यांचें नितान्त प्रेम असल्यानें तत्संबंधीं किती तरी दृष्टान्त त्यांच्या ग्रंथांत ठिकठिकाणीं आढळतात. असो.

आतां ज्ञानदेवांच्या काव्याचे विशेष म्हणून जे सांगतां येतील त्यांचा विचार करूं. त्यांच्या काव्याचा पहिला विशेष म्हणजे त्यांत दिसून येणारी ग्रंथकर्त्याची निर्व्यंग व सुदृढ मानसिक स्थिति. या ग्रंथकाराच्या अंतःकरणाला पापी वृत्तीचा विटाळ झालेलाच दिसत नाहीं. साधुसंतांमध्यें सुद्धा दोन वर्ग असतात. कांहीं थोडे जन्मतःच इतके सत्त्वसंपन्न असतात कीं, त्यांना विकार व विचार यांच्यामधील कलहाची जाणीवच नसते. चांगलें वाटलें कीं, त्यांनीं तें आचरणांत आणिलेंच. "जानामि धर्मं न च मे प्रवृत्तिः" असली दुबळी भाषा बोलण्याचें त्यांना कारणच पडत नाहीं. कामक्रोधादि षड्रिपु त्यांस फारशी बाधाच करूं शकत नाहींत. ते प्रायः 'इंद्रियाचे धनी' होऊनच जन्माला येतात. दुसरे इतके भाग्यवान् नसतात. त्यांच्यांत विकार व विचार यांच्यांत तुंबळ युद्ध कितीतरी काळ माजून राहतें. कितीतरी वेळां त्यांचा शरीररूपी रथ इंद्रियरूपी घोड्यांनीं विषयाच्या वाममार्गावर नेऊन आदळलेला असतो! मग ईश्वराची करुणा भाकून त्याजकडून सात्त्विक धैर्याचें बल बुद्धीस प्राप्त करून घेऊन मोठ्या कष्टानें त्यांस इंद्रियदमन करतां येतें. तुकोबाराय म्हणतात, "रात्रंदिवस आम्हां युद्धाचा प्रसंग। अंतर्बाह्य जग आणि मन ॥" सारांश, या वर्गातील लोकांस युद्धांतील घावडाव सहन करावे लागतात; व कालांतरानें आत्मबोधाचा वोगरा सेवून जरी हे त्या नवजीवनानें तृप्त झाले तरी त्या घावडावांचे डाग त्यांच्या अंगावर दिसतातच. अर्थात् या दोन वर्गांची जगाकडे पाहण्याची दृष्टि वेगवेगळीच राहते. ज्यास कधीं कष्ट भोगावे लागले नाहींत व ज्यांची वासना सहजच तृप्त झाली त्यांची जगाकडे पाहण्याची दृष्टि वेगळी; आणि जन्मभर हालअपेष्टा सोसून शेवटीं

एकदा ज्यांची ध्येयसिद्धि झाली त्यांची दृष्टि वेगळी. साधुसंतांत देखील पहिल्या वर्गांत मोडणारे हाताच्या बोटांवर मोजण्याइतकेच; बहुतेक सर्व दुसऱ्या वर्गांतच पडतात. ज्ञानदेव हे पहिल्या कोटींतील संत होत. अनेक जन्मांची फारच मोठी कमाई, बाल्यावस्थेंतच निवृत्तिनाथांसारखे गुरु आणि तेहि घरबसल्या प्राप्त झालेले, यामुळें त्यांस तात्काळ अत्यंत उच्च भूमिका प्राप्त झाली. इतरांस जी गोष्ट कष्टसाध्य ती त्यांस सहजसुलभ कशी वाटते, हें ज्ञानदेव, एकनाथ व तुकाराम यांनीं प्रसंगविशेषीं आपापल्यापरीं केलेल्या ब्रह्मचर्याच्या पुढील व्याख्येवरून निदर्शनास येतेंः—

" जन्मतेनि प्रसंगें । स्त्रीदेह शिवणें आंगें ।
तेथूनि जन्म आघवें । सोंविळें कीजे ॥"—ज्ञानेश्वरी, अ. १७।२११

" ऋतुकाळीं ज्या स्त्रीगमन । ते पुरुष ब्रह्मचारी पूर्ण । "
—नाथभागवत, अ. ५

" विधीनें सेवन । विषय त्यागातें समान ॥ " —तुकारामगाथा

असाच फरक या त्रिवर्गानें साधकदशा व साधूंचीं लक्षणें यांचें जें वर्णन केलें आहे त्यांत आढळून येईल. हे तिघेहि सत्पुरुष आपणांस पूज्य होत व आपापल्या परीनें ते सर्वच थोर आहेत. पण त्यांच्या मूळप्रकृतीचा विचार करूं जातां जे फरक दिसून येतात त्यांत त्या त्या सत्पुरुषाचा इतिहास सांठवलेला असल्यामुळें हा भेद लक्षांत घेणें अवश्य आहे. तात्पर्य, ज्ञानदेवांच्या ग्रंथांत त्यांची निर्व्यंग मनःस्थिति पुरेपूर व्यक्त होते. यामुळेंच त्यांनीं केलेलीं सांसारिक दुःखाचीं वर्णनें यथार्थ असलीं तरी त्यांत संसारानें गांजलेल्या मनुष्याचा त्राशिकपणा अथवा तडफडाट दिसून येत नाहीं; तर त्यांनींच दिलेल्या दृष्टान्ताप्रमाणें, व्याधानें बांधलेल्या नळिकायंत्रावर बसतो न बसतो तोंच उडून वृक्षशाखेवर बसणाऱ्या पोपटाच्या मनःस्थितीप्रमाणें समाधानी वृत्तिच त्यांत दिसून येते. म्हणूनच हीं चित्रें ज्याला संसारांतील कोडीं उलगडलीं असून संसारपाशांतून जो मुक्त झाला आहे अशा आत्मतृप्त प्रकृतीचीं निदर्शक झालीं आहेत.

ज्ञानदेवांच्या काव्याचा दुसरा विशेष म्हणजे त्यांची अलौकिक काव्य-स्फूर्ति हा होय. वस्तूच्या अंतरंगांत शिरून तिचें हुबेहूब वर्णन जशी ती करूं शकते, तशीच ध्येय जितकें उंच असेल तितकी उंच भरारी मारून ती आपल्या कल्पनापंखांत तें ध्येय जसेंच्या तसें घेऊन वाचकासमोर उभें करूं शकते. त्यांच्या काव्यस्फूर्तीचें हें लोकोत्तर सामर्थ्य ज्यांना पाहणें असेल त्यांनीं तेराव्या अध्यायांतील 'अज्ञानं यदतोऽन्यथा' या श्लोकावरील अज्ञानाचीं लक्षणें व ज्ञान्याच्या लक्षणांपैकीं 'अहिंसा' या पदाचें त्यांनीं केलेलें व्याख्यान पाहावें, म्हणजे या म्हणण्याचा त्यांस प्रत्यय येईल.

ज्ञानदेवांच्या काव्यांत आढळणारा तिसरा विशेष म्हणजे स्वसामर्थ्या-विषयीं त्यांचा आत्मप्रत्यय व त्यांची स्वतंत्र लेखनपद्धति हा होय. ज्ञान-देवांना अशी खात्री वाटते कीं, त्यांची भावार्थदीपिका ही मूळ संस्कृत गीतेवरील मराठी टीका असली तरी वाङ्मयांत तिला स्वतंत्र स्थान असून स्वतःच्या तेजानें व सौंदर्यानें ती वाचकांचे डोळे दिपवील. आपल्या असाधारण मराठी भाषाप्रभुत्वाची जाणीव त्यांनीं ज्ञानेश्वरींत ठिकठिकाणीं व्यक्त केली आहे. त्यांच्या स्वभावाची घडणच अशी आहे कीं, त्यांत स्वाभिमान आहे, पण घमेंड नाहीं; लीनता आहे, पण दीनता नाहीं. उदाहरणार्थ त्यांचे खालील उद्गार पाहा:—

( १ ) "माझा मऱ्हाटाचि बोलु कौतुकें । परि अमृतातेंही पैजां जिंके॥"

ज्ञा. अ. ६।१४

( २ ) " देशियेचेनि नागरपणें । शांतु शृंगारातें जिणे । तरी ओंविया होती लेणें । साहित्यासी ॥ मूळ ग्रंथींचिया संस्कृता–। वरि मऱ्हाटी नीट पढतां । अभिप्राय मानलिया उचिता । कवण भूमी हें न चोजवे ॥ जैसें अंगाचेनि सुंदरपणें । लेणियासी आंगचि होय लेणें । तेथ अळंकारिलें कवण कवणें । हें निर्वचेना ॥ तैसी देशी आणि संस्कृत वाणी । एका भावार्थाच्या सुखासनीं । शोभती आयणी । चोखट आइका ॥... तैसें देशियेचें लावण्य । हिरोनि रसां आणिलें तारुण्य । मग रचिलें अगण्य । गीतातत्त्व ॥"

अ. १०।४२–४७

हाच भावार्थ व आपल्या ग्रंथरचनेची थोरवी हीं ज्ञानदेवांनीं आठराव्या अध्यायांतील १७३७ ते १७५० या ओव्यांत वर्णिलीं आहेत.

हा त्यांचा स्वभाव गुरूशीं बोलतांना देखील दिसतो. ते गुरूपुढें नम्र होतील, पण आपण नुसता वरदहस्त ठेविलांत कीं सर्व मीच करीन, असेंहि म्हटल्याशिवाय राहणार नाहींतः—

" ये मर्‍हाटियेचिया नगरीं। ब्रह्मविद्येचा सुकाळु करीं। घेणें देणें सुखाचि-वरी। हों देईं या जगा ॥ तूं आपुलेनि स्नेहपल्लवें। मातें पांघुरविशील सदैवें। तरि आतांचि हें आघवें। निर्मीन माये ॥" ज्ञा.अ.१२।१६–१७

ज्ञानदेवांची लेखनपद्धतीहि स्वतंत्र आहे. ज्ञानेश्वरींत ते पूर्वपक्ष उत्तरपक्ष करून आपलें मत फारसें मांडीत नाहींत. आपला भावार्थ उत्कृष्ट व सहज-सुंदर रीतीनें श्रोत्यांच्या गळीं उतरविण्याकडेच त्यांचा कटाक्ष आहे. तथापि ज्ञानेश्वरींत वेदान्तप्रक्रियायुक्त चर्चा विशेष नसल्यानें तो ग्रंथ प्राकृत जनां-करितांच आहे, असें मानणें चुकीचें होईल. वेदान्ताची भाषा व अर्थ पचवून ते बोल निघालेले आहेत, यांत शंकाच नाहीं. ज्ञानदेवांचा 'अमृतानुभव' हा ग्रंथ वेगळ्या प्रकारचा आहे. कारण, बोलूनचालून मल्ल जसा आखाड्यांत उतरून आह्वानपूर्वक प्रतिपक्ष्याशीं सामना देतो, तद्वत् स्वमतसिध्द्यर्थ म्हणूनच त्यांनीं त्याची रचना केलेली आहे.

असो. सरतेशेवटीं ज्ञानदेवांच्या काव्याचें महत्त्व काय तें सांगूं. कोणत्याहि काव्याची थोरवी जाणण्यास पुढील प्रश्न करून पाहावेः—(१) त्यांत नवीन विचार आहे काय ? (२) त्यांतील विचार मांडण्याची पद्धति नवीन आहे काय ? (३) त्यांत तत्तत्प्रांतीयाचे विशिष्ट गुण उतरले आहेत काय ? (४) भावनांचा परिपोष योग्य रीतीनें झाला आहे काय ? (५) त्याचें वाचन घटकाभर तरी अंतःकरण हलवून सोडतें काय ? आम्हांस वाटतें कीं, या प्रत्येक प्रश्नास ज्ञानदेवांच्या काव्याविषयीं अस्ति-पक्षींच उत्तर द्यावें लागेल. शेवटीं, ज्ञानदेवांनीं गीतेच्या रमणीयकतेचें जें

वर्णन केलें आहे तें त्यांच्या ग्रंथासहि लागू आहे, अशी आमची समजूत असल्यामुळें तें उद्धृत करून हें प्रकरण संपवितों.

" या गीतार्थाची थोरी । स्वयें शंभू विवरी । जेथ भवानी प्रश्न करी । चमत्कारोनी ॥ तेथ हरु म्हणे नेणिजे । देवी जैसें का स्वरूप तुझें । तैसें नित्य नूतन हें देखिजे । गीतातत्त्व ॥ " ज्ञा. अ. १।७०–७१

## प्रकरण सहावें

### ज्ञानदेवांचें तत्त्वज्ञान व अध्यात्म

" तेथ प्रियाची परम सीमा । तो भेटे माउली आत्मा ।
तये खेंवीं आटे डिंडिमा । सांसारिक हे ॥ "

ज्ञा. अ. १६।४४३

ज्ञानदेव हे अभिजात कवि म्हणून प्रसिद्ध आहेतच. परंतु त्याहिपेक्षां महान् आत्मानुभवी संत व पंडित म्हणून त्यांची विशेष ख्याति व महती आहे. मागील प्रकरणाच्या आरंभीं म्हटल्याप्रमाणें त्यांनीं आपल्या काव्यस्फूर्तीचा उपयोग परेपलीकडे म्हटल्या गेलेल्या परतत्त्वाचें प्राकृत जनांना समजेल असें सुलभ व्याख्यान करण्यांत केला. अर्थात् तत्त्वज्ञान व अध्यात्म हा ज्ञानदेवांच्या ग्रंथांचा आत्माच होय, असें म्हणण्यास हरकत नाहीं. यास्तव प्रस्तुत प्रकरणीं त्यांचाच थोडक्यांत विचार करूं.

ज्ञानदेव हे पूर्ण अद्वैती होते. ते स्वतः ज्या नाथपंथाचे अनुगृहीत होते तो नाथपंथ पूर्णाद्वैताचा पुरस्कर्ता आहे. आपली गुरुपरंपरा सांगतांनाच, " मग तिहीं तें शांभव । अद्वयानंदवैभव । संपादिलें सप्रभव । श्रीगहिनीनाथा ॥ " (ज्ञा. अ. १८।५६) असा आपल्या परंपरेंतील तत्त्वज्ञानाचा त्यांनीं स्पष्ट उल्लेख केलेला आहे. योगवासिष्ठ व शंकराचार्यांचे ग्रंथ यांचा

अभ्यासहि ज्ञानदेवांचें अद्वैतमत बनविण्यास अंशतः कारणीभूत झाला. तथापि गुरुपरंपरेंत प्राप्त झालेली ' अद्वयानंदाची ' अनुभूति हेंच त्यांच्या अद्वैतमताचें मुख्य कारण होय यांत शंका नाहीं.

एक आत्माच सर्व रूपांनीं नटलेला आहे, शिवापासून तृणापर्यंत अथवा ब्रह्मदेवापासून मुंगीपर्यंत एक आत्माच स्फुरत आहे, किंबहुना विश्व व त्यांत भरलेला आत्मा एवढें देखील द्वैत संभवत नाहीं, तर अवघा एक आत्माच आहे, असें ज्ञानदेवांच्या पूर्णाद्वैताचें थोडक्यांत स्वरूप सांगतां येईल. उदा०

" तया आत्मयाच्या भाखा । न पडेचि दुसरी रेखा ।
जरी विश्वा अशेखा । भरलें आहे ॥"   अमृ. प्र. ७।१४६

" तेवीं शिवोनि पृथ्वीवरी । भासती पदार्थांचिया परी ।
प्रकाशे तें एकसरी । संवित्ति हे ॥"  चांगदेवपासष्टी, ओं. १२

" तेवीं मी गा सकळ । संबंधु वावो ॥"   ज्ञा. अ. १४।१२२

अशा अर्थाचे आणखी कितीतरी उतारे देतां येतील.

ज्ञानदेवांचा या अद्वैतानुभूतीवर अत्यंत कटाक्ष आहे. एके ठिकाणीं तर त्यांनीं असें स्पष्ट म्हटलें आहे कीं, या विश्वांतील प्राण्यांचे आकार, त्यांचीं नांवें व वेष यांतील वैचित्र्य पाहून जर त्या प्राण्यांतील भेदच खरा आहे असें एखादा मनुष्य धरून बसेल, तर त्यानें कोटि जन्म जरी घेतले तरी त्यास मुक्तीची आशा नको ( ज्ञा. अ. १३।१०५९ ).

जे तत्त्वज्ञानाचे अभ्यासक आहेत त्यांना वरील मांडणीवरून दिसून आलेंच असेल कीं, ज्ञानदेव हे 'एकमेवाद्वितीयं ब्रह्म', 'प्रज्ञानं ब्रह्म' अथवा 'इदं सर्वं यदयमात्मा' या श्रुतिनिर्दिष्ट अद्वैताचे पुरस्कर्ते आहेत. शंकराचार्य हेहि अद्वैताचेच पुरस्कर्ते होत. परंतु ज्ञानदेवांची मांडणी व शंकराचार्यांची मांडणी यांत फरक आहे; आणि तो फरक कांहीं अंशानें या दोघां थोर पंडितांत असणारा जो कालभेद त्यानें घडून आला असावा, असें म्हणण्यास बरीच जागा आहे. शंकराचार्य हे अद्वैतसिद्धीकरितां नेहमी रज्जुसर्प, मृगजल असले दृष्टान्त देतात. संध्याकाळच्या वेळेला, भीतभीत घरांतून निघणाऱ्या

एखाद्या भित्र्या मनुष्यास प्रत्यक्ष दोरी पडली असूनहि जसा साप दिसतो आणि त्यापासून भीति, कंप इत्यादि उत्पन्न होतात, त्याप्रमाणेंच एक ब्रह्मच असतांना, मनुष्यास त्याच्या कल्पनेनें त्या ठिकाणीं जगाचा भास होतो व दुःखभयादिकांची पीडा सहन करावी लागते. भीतिकंपादि जर दूर करावयाचे असतील तर जसा पूर्वोक्त सर्पभ्रम दूर होणें अवश्य आहे, तशी दुःखादिकांची सकारण अर्थात् शाश्वत निवृत्ति होण्याकरितां जगद्भ्रम दूर होणें अवश्य आहे. कारण जगद्भ्रम दूर झाल्याशिवाय ब्रह्मदर्शन नाहीं, व तें जोंपर्यंत नाहीं तोंपर्यंत दुःखनिवृत्ति व आनंदप्राप्तीहि नाहीं. शास्त्रीय पद्धतीनें बोलावयाचें तर जगताचा बाध करून जें खालीं उर्वरित तें ब्रह्म, या पद्धतीचें शंकराचार्यांच्या मांडणींत विशेष अवलंबन केलेलें दिसून येतें.

ज्ञानदेवांनींहि ज्ञानेश्वरींत कित्येक ठिकाणीं या पद्धतीचा अवलंब केला आहे. परंतु वस्तुस्थिति अशी कीं, ब्रह्म व जगत् यांमध्यें अज्ञानासारखें एक सदसद्विलक्षण, अनिर्वचनीय, भावरूप तत्त्व मानून तत्कार्य जगत् आहे असें कल्पावयाचें व त्याची सकारण निवृत्ति झाल्यानंतर ब्रह्मदर्शन होतें असें म्हणावयाचें, ही प्रतिपादनपद्धति त्यांना तितकीशी पसंत नव्हती. ज्ञानदेवांचें खरें मत वर म्हटल्याप्रमाणें विश्वासकट सर्व आत्माच आहे असें आहे. त्यांत मायाकार्य, अतएव त्याज्य भाग कांहीं नाहीं. जगताचा निरास करावयाचा व ब्रह्म पाहावयाचें म्हणजे ज्ञानदेवांचाच दृष्टान्त द्यावयाचा तर चंद्राच्या कला सोलून काढून चंद्रबिंब पाहण्यासारखें आहे, अथवा ज्ञानेश्वरभक्त कै. गु. विष्णुबोवा जोग यांचा दृष्टान्त द्यावयाचा तर पेढा सोलण्यासारखें आहे.

ज्ञानदेव तर एके ठिकाणीं ज्ञानेश्वरींत भगवंताच्या मुखांत खालील ओव्या घालतातः—

" जालेंनि जगें मी झांकें । तरी जगत्वें कोण फांके । किळेवरी माणिकें लोपिजे काई ॥ अळंकारातें आलें । तरी सोनेंपण काइ गेलें । कीं कमळ फांकलें । कमळत्वा मुकें ॥ सांग पां धनंजया ॥ अवयवीं अवयविया ।

आच्छादिजे कीं तया । तेंचि रूप ॥ कीं विरूढलिया जोंधळा । कणिसाचा निवाळा । वेंचला कीं आगळा । दिसतसे ॥ म्हणोनि जग परौतें । सारूनि पाहिजे मातें । तैसा नोहें उखितें । आघवें मीचि ॥" ज्ञा.अ.१४।१२४-२७

प्रस्तुत ओव्यांवरून जगन्निरास करून ब्रह्म पाहणें या एकांगी पद्धती-विषयीं ज्ञानदेवांचें काय मत होतें तें स्पष्ट होत आहे.

ज्ञानेश्वरींत असले विचार कोठें कोठें स्पष्ट दिसत असले, तरी माया-वादाचा अंगीकारहि अनेक ठिकाणीं केलेला आढळून येईल. मात्र ज्ञान-देवांचें एतद्विषयक स्पष्ट मत चांगदेवपासष्टी व अमृतानुभव या त्यांच्या दोन ग्रंथांतून निःसंदिग्ध रीतीनें प्रकट झालें आहे. त्यांत ज्ञानदेवांनीं आपल्या विषयाची मांडणी अगदी अर्वाचीन तत्त्वज्ञान्यांस मान्य असलेल्या अशा त्रिपुटिविवेचनात्मक अथवा दृग्दृश्यविवेचनात्मक (epistemological) पद्धतीनें केली आहे. त्यांतहि दृष्टान्तांची रेलचेल आहेच; परंतु केवळ दृष्टान्तांवर सर्व प्रपंच भागविला नसून त्यांनीं आपलें मत तेथें सप्रमाण मांडिलें आहे. तें सर्वच प्रतिपादन सुरेख आहे. तथापि या लघुग्रंथांत त्याचें तुलनात्मक व सूक्ष्म विवेचन करणें अशक्य असल्यामुळें प्रौढ वाचकांनीं त्याकरितां मूळ ग्रंथच—विशेषतः अमृतानुभव प्रकरण ७—वाचून पाहावा, अशी आम्ही शिफारस करितों.

आतांच वर असें म्हटलें कीं, ज्ञानदेवांना अज्ञान पत्करून अद्वैत सिद्ध करणें ही पद्धति विशेष पसंत नव्हती; व त्यांनीं ज्ञानेश्वरींत या पद्धतीचा कोठेंकोठें अवलंबहि केला आहे. यावरून वाचकांना क्वचित् असें वाटण्याचा संभव आहे कीं, ज्ञानदेव हे कांहींतरी विसंगत लिहितात; अथवा असेंहि मानिलें जाणें शक्य आहे कीं, ज्ञानदेवांच्या मताचा पुढें विकास झालाः पूर्वीं ते अज्ञानवादी होते, नंतर त्यांची वृत्ति साशंक झाली व पुढें त्यांचें मत कायमचें तद्विरुद्ध बनलें. तथापि या दोन्ही निवळ कल्पनाच होत, असें खुद्द ज्ञानेश्वरी ग्रंथ वाचून अभ्यासकास समजून येईल.

ज्ञानदेव हे केवळ शाब्दिक तर्क करणारे पंडित नव्हत. ते अद्वयानंदाचा

अखंडानुभव घेणारे असे ज्ञानी पुरुष होते, हें “ आणि पूर्ण अहंता वेठलों। सैंघ आम्हीच दाटलों। मा लोपलों ना प्रगटलों। कोण्हा होउनी॥” (अमृ. प्र. १०।१५) या त्यांच्या उद्गारावरून स्पष्ट होत आहे. अर्थात् त्यांचा कल श्रोत्यांना पटेल अथवा त्यांच्या गळीं उतरेल त्या रीतीनें अद्वैत प्रतिपादण्याकडे आहे. त्यांचा विचार असा दिसतो कीं, एकच गोष्ट अधिकारपरत्वें वेगवेगळ्या रीतीनें पटविणें शक्य व अवश्यहि आहे. मात्र वेगवेगळ्या रीतीनें मर्म समजून देण्याचें हें कसब सर्वांस सारखेंच साधेल असें नाहीं. ज्ञानदेवांनीं याविषयीं एक गोड दृष्टान्त दिला आहे. ते म्हणतात, प्रौढ मनुष्य एक मोठा घास तोंडांत घालून एकदम खाऊं शकतो, तर पोराला तोच घास वीस ठिकाणीं वांटून द्यावा लागतो. अथवा आपणांस दुसरा एक दृष्टान्त असा देतां येईल कीं, कोणास नफ्यातोट्याचें उदाहरण एखादी अज्ञात रक्कम न पत्करितां सुटेल, तर एखाद्यास तें बीजगणिताचा आश्रय करून क्ष य सारखी अज्ञात रक्कम पत्करून सुटेल. मुद्दा उदाहरण सोडविण्याचा असला म्हणजे रीतीकरितां विशेष भांडण्याचें कारण नाहीं. आतां हें खरें कीं, विद्वत्तेसाठीं जेथें चढाओढ असेल तेथें रीतीचा प्रश्नहि विचारांत घ्यावा लागतो. तद्वत् ज्ञानदेवांनीं ज्ञानेश्वरींत उदाहरण सोडविण्याकडे विशेष लक्ष दिलें, तर अमृतानुभवांत विद्वत्तेवर भर दिला. यामुळेंच ज्ञानेश्वरींत अज्ञानवादाचाहि त्यांनीं अंगीकार केला आहे. वर जें सांगितलें ती केवळ आमचीच कल्पना नव्हे, तर ज्ञानदेवांचेंहि याविषयीं असेंच स्पष्ट म्हणणें आहे, हें खालील ओव्यांवरून दिसून येईल:—

“ एऱ्हवीं अवघेंचि आत्मा। हें सांगों जरी वीरोत्तमा। तरी तुझिया मनोधर्मा। गिळेल ना॥ म्हणोनि एकाचि संचलें। चतुर्धा आम्हीं केलें। जें अदळपण देखिलें। तुझिये प्रज्ञे॥ पैं बाळ जैं जेवविजे। तैं घासु विसा ठायीं कीजे। तैसें एकाचि चतुर्थ्याजें। काथिलें आम्हीं॥ ”

ज्ञा. अ. १३। ९४८-५०

या बाबतींत गीता अ. ९ श्लो. १५ यांतील “एकत्वेन पृथक्त्वेन बहुधा

विश्वतोमुखम्'' या श्लोकार्धावरील ज्ञानदेवांचें व्याख्यान वाचण्याजोगें आहे.

प्रस्तुत प्रश्नाकडे पाहण्याचें वरील मर्म ज्यांना समजलें नाहीं त्यांची तर गीताध्याय १३, श्लो. २१ वरील ओव्या व अमृतानुभव प्रकरण पहिलें यांत प्रकृतिपुरुष व शिवशिवा यांचें जें वर्णन केलें आहे त्यांवरून ज्ञानदेव हे द्वैती होते, असें म्हणण्यापर्यंत मजल गेली आहे! परंतु वस्तुस्थिति याच्या अगदीं उलट आहे. ज्ञानदेवांचें अद्वयानंदानुभवावर पराकाष्ठेचें प्रेम आहे, हें वर उद्धृत केलेल्या ज्ञा. अ. १३।१०५९ या ओवीवरून उघड झालेंच आहे.

आणखी एका मुद्द्याचा विचार करणें अवश्य आहे. ज्ञानदेव हे जगतास भ्रम म्हणावयास तयार नाहीत. याचा अर्थ ते जगत् सत्य मानतात असा कदाचित् समजला जाण्याचा संभव आहे. परंतु तशी वस्तुस्थिति नाहीं. जडवादी चार्वाक ज्याप्रमाणें जगतास सत्य मानतो, त्याप्रमाणें कांहीं ज्ञानदेव मानीत नाहींत. तथापि ते जगतास 'मायाकार्य' म्हणावयास तयार नाहींत. सर्व विश्व हा आत्माच आहे, असा त्यांचा सिद्धान्त आहे. विश्व एक वेगळें झालें असें जर ते मानीत असते, तर विश्व ऊर्फ जगत् सत्य अथवा मिथ्या हा प्रश्न उद्भवता. परंतु विश्व आत्म्याहून कांहीं वेगळें झालें, असें ज्ञानदेव मानीतच नाहींत. याविषयीं त्यांचें मत गौडपादाचार्यांच्या "न निरोधो न चोत्पत्तिः" (मांडूक्यकारिका प्र. २।३२) या मताशीं अतिशय जुळतें आहे. जगदाधार समजलेल्या आत्म्याची कल्पना ज्ञानदेवांनीं अवकर्तनपद्धतीनें (method of abstraction) न घेतां संकलनपद्धतीनें (method of comprehension) घेतली आहे. ते ज्यास आत्मा म्हणतात त्याची कल्पना येण्याकरितां अमृतानुभवांतील खालील ओव्या पाहाः—

" तया आत्मयाच्या भाखा । न पडेचि दुसरी रेखा । जरी विश्वा अशेखा । भरलें आहे ॥ दुवंर्धी क्षीरोदकीं । वाणें परी अनेकीं । दिसतीं तरी तितुकीं । सुतें आथी ॥ पातयाची मिठी । नुकलितां दिठी । अवधियाचि सृष्टी । पाविजे जरी ॥ न फुटतां बीजकणिका । माजीं विस्तारें वडु

असिका । तरी अद्वैतफांका । उपमा आथी ॥" अमृ. प्र. ७।१४६-४९

तसेंच ज्ञानदेव जगत् म्हणजे काय समजत होते याची खालील ओव्यांवरून चांगली कल्पना येईलः—

" प्रकाश तो प्रकाश कीं । यासि न वंचे घेई चुकी । म्हणोनि जग असकी । वस्तुप्रभा ॥ विभाति यस्य भासा । सर्वमिदं हा ऐसा । श्रुति काय वायसा । ढेंकर देती ॥ यालागीं वस्तुप्रभा । वस्तुचि पावे शोभा । जात असे लाभा । वस्तुसिचि ॥ " अमृ. प्र. ७।२८९-९१

वरील विवेचनावरून जगत् सत्य मानणारा जडवादी व ज्ञानदेव यांत किती अंतर आहे हें स्पष्ट झालें असेलच.

जगत् आत्म्याहून वेगळें झालेंच नाहीं असें ज्यांचें मत त्यांच्या मतांत जीव तरी आत्म्याहून वेगळा कसा आणि कोठें उरणार ? एवढ्याचकरितां ज्ञानदेवांनीं अमृतानुभवांत जीवाची स्वतंत्र व्याख्या देण्याचा प्रयत्न केला नाहीं. आतां जेथें श्रोत्यांस विषय समजून सांगण्यासाठीं मायावादाचा अंगीकार करून भाषा चाललेली आहे, तेथें वेदांत्याप्रमाणें त्यांनींहि जीव-स्वरूपाची व्याख्या दिली आहे ( ज्ञा. अ. १८।३२१ पाहा ). परंतु स्वतः वेदांत्यांतसुद्धा बिंबप्रतिबिंब अथवा अवच्छेद असे जीवस्वरूपाविषयीं दोन पक्ष आहेतच. जसें जगतासंबंधीं तसेंच जीवस्वरूपासंबंधींहि लोकांना कांहीं कल्पना यावी म्हणून ज्ञानदेवांनीं पुढील तीनचार दृष्टान्त दिले आहेत, ते लक्षांत ठेवण्यासारखे आहेतः—

"तया पुत्र तूं वटेश्वराचा । रवा जैसा कापुराचा ॥" चां. पा. ओ. ३७

" पैं परमाणु भूतळीं । हिमकणु हिमाचळीं । मजमाजीं न्याहाळीं । अहं तैसें ॥ हो कां तरंगु लहानु । परी सिंधूसी नाहीं भिन्नु । तैसा ईश्वरीं मी आनु । नोहेचि मा ॥ " ज्ञा. अ. १४।३८५-६

या दृष्टान्तांवरून ज्ञानदेव हे जीवस्वरूप 'परमाणु' एवढें समजत होते, हें मागील पुढील संबंध जो पाहणार नाहीं तोच म्हणेल. हे सर्व दृष्टान्त 'अहं' स्फुरण ज्यास होतें त्यानें आपण कसें आहों हें पाहण्याकरितां आहेत.

या सर्व दृष्टान्तांतून ज्ञानदेवांस आत्मा एक आहे व जीव त्याहून वेगळा कधीं पडलाच नाहीं, हेंच दाखवावयाचें आहे.

जीव वेगळा पडलाच नाहीं असें म्हटल्यावर त्याच्या बंधाचा व मोक्षाचा विशेष विचार करण्याचें कारण नाहीं. ज्ञानदेव म्हणतातः—

" म्हणोनि बंधचि तव वावो । मा मोक्षा कें प्रसवो ॥ " अमृ. प्र. ३।१५

हें त्यांचें वाक्यहि गौडपादाचार्यांच्या मताशीं कितीतरी जुळतें आहे तें वाचकांनींच पाहावें. ज्ञानदेवांच्या मतें मोक्ष प्राप्त होणें म्हणजे 'अहं ब्रह्मास्मि' या वृत्तिज्ञानावर येणें नव्हे; कारण ही वृत्ति हाहि एकप्रकारचा बंधच आहे ( अमृ. प्र. ३।२३). खरोखरींचें कैवल्य म्हणजे "इदमहं' या उभय वृत्तिशून्य होऊन राहणें. अर्थात् ज्ञान मोक्ष देतें हें खरें; पण जिवंत राहून नव्हे, तर मरून.

असो. येणेंप्रमाणें वर ज्ञानदेवांच्या तत्त्वज्ञानाचें जें थोडक्यांत स्वरूपाविष्करण केलें त्यावरून ते पूर्ण अद्वैती होते, ही गोष्ट लक्षांत आली असेलच. त्याचप्रमाणें ज्ञानदेव व शंकराचार्य हे दोघे अद्वैती असूनहि दोघांत भेद कोठें आहे हेंहि कळून चुकलें असेल. शंकराचार्यांनीं परमतखंडनाकरितां व शास्त्रव्यवस्थेकरितां एक अज्ञान पत्करलें; पण ज्ञानदेवांना तें पत्करणें देखील गौण वाटतें, एवढाच दोहोंमध्यें फरक आहे. आमच्या मतें एका दृष्टीनें ज्ञानदेवांनीं अद्वैताचें स्वतंत्ररीत्या पुनरुज्जीवनच केलें असें म्हणावयास हरकत नाहीं.

शंकराचार्यांचा अज्ञानवाद ज्ञानदेव पत्करीत नाहींत व अमृतानुभवाच्या सातव्या प्रकरणांत अज्ञानाचा धांडोळा घेत असतां, त्यांनीं अज्ञानाची अनुपपत्ति सिद्ध करण्याकरितां आश्रयानुपपत्ति इत्यादि ज्या युक्त्या आणिल्या त्यांचें आणि रामानुजाचार्यांनीं श्रीभाष्यांत अज्ञानाच्या अनुपपत्तीचे जे सात प्रकार दाखविले आहेत त्यांचें साम्य आहे, असें पाहून कित्येक लोक ज्ञानदेवांना रामानुजाचार्यांचे अनुयायी म्हणून विशिष्टाद्वैती संबोधूं लागले आहेत! परंतु वास्तविक प्रकार अत्यंत वेगळा आहे. रामानुजाचार्य हे विशिष्टा-

द्वैताचें सोंग घेऊन द्वैताची मांडणी करितात व त्या भूमिकेवरून अज्ञानाची अनुपपत्ति दाखवितात. उलटपक्षीं, ज्ञानदेव हे भावरूप अज्ञान मानणें हाहि शुद्ध आत्मस्वरूपाच्या ठिकाणीं जर डागच आहे तर केवळ आत्मस्वरूपच आहे, या पूर्णाद्वैतावरून अज्ञानाची अनुपपत्ति दाखवितात; इतका मोठा दोहोंमध्यें फरक आहे. ज्ञानदेवांना शंकराचार्य हेच जवळचे होत. रामानुजाचार्य व ज्ञानदेव यांत अज्ञान न पत्करणें याशिवाय दुसरें कसलेंहि साम्य नाहीं. श्रीचतुर्व्यूहादि भाग यांचा ज्ञानदेवांच्या तत्त्वज्ञानांत काहींहि संबंध नाहीं, हें पहिल्या प्रकरणांत सांगितलेंच आहे.

जसें रामानुजाचार्यांचें आहे तसेंच वल्लभाचार्यांचें. वरवर पाहणाऱ्यास अज्ञान न पत्करणें हें साम्य दोहोंत दिसून येईल. शिवाय वल्लभाचार्यांचें मत शुद्धाद्वैत म्हणून प्रसिद्धहि आहे. परंतु वल्लभाचार्यांचें शुद्धाद्वैत व ज्ञानदेवांचें पूर्णाद्वैत यांतहि महदंतर आहे. वसुदेवसुत श्रीकृष्णासच वल्लभाचार्य परमात्मा समजतात व त्याच्या सेवेकरितां पुष्टिमार्गाचा अवलंब करावा असें सुचवितात. ज्ञानदेवहि श्रीकृष्णभक्त खरे; तथापि श्रीकृष्णस्वरूप व त्याची भक्ति यांविषयींची त्यांची कल्पना वल्लभाचार्यांच्या कल्पनेहून फार वेगळी होती. ते एका ठिकाणीं म्हणतात:—

" देवाचिया दाटणीं । देउळा झाली आटणी । देशकाळादि वाहाणीं । येईच ना ॥ ... आतां देवातेंचि देवें । देववरी भजावें । अर्पणाचेनि नांवें । मलतिया ॥" अमृ. प्र. ९।३७-४०

यांत व वल्लभाचार्यप्रयुक्त पुष्टिमार्गांत दाक्षिणोत्तर ध्रुवांइतकें अंतर नाहीं असें कोण म्हणेल ! आतां ज्ञानदेवांच्या नीतिविषयक व अध्यात्मविषयक विचाराकडे वळूं.

ज्ञानदेवांचें नीतिशास्त्र हें अध्यात्माच्या पायावर रचिलेलें आहे; व तसें असणें अगदीं स्वाभाविक आहे. कारण, ते केवळ तर्कपटु पंडित नसून महान् आत्मानुभवी होते. अर्थात् नीतियुक्त आचार हा उच्च आध्यात्मिक जीवनाची पूर्वतयारी असल्यामुळें ज्ञानदेवांच्या अध्यात्मविषयक मतांची

चर्चा करण्यापूर्वी त्यांच्या नीतिविषयक विचारांची थोडक्यांत चर्चा करणें अवश्य आहे.

ज्ञानदेवांस केवळ देहभरण ही उघडी नागवण वाटत होती. केवळ विषयाचरण म्हणजे 'आत्मघात' होय, असें ते म्हणतात. विषयाचा संग सर्वथा करूं नये असेंहि सांगतांना ज्ञानदेव आपणांस दिसतील; परंतु याचा अर्थ प्रत्येकानें–मग तो विषयत्यागास अधिकारी असो किंवा नसो–विषय त्यागावा, असें त्यांचें मत नव्हतें. अथवा विषयच भोगावयाचा नाहीं-तर इंद्रियांचा नायनाट करावा, असेंहि त्यांचें मत नव्हतें. म्हणजे ज्ञानदेव हे केवळ त्यागवादी अथवा संन्यासवादी नाहींत. निषिद्ध केव्हांहि सेवन करूंच नये; तथापि अधिकारपरत्वें विहितांचेंहि सेवन करूं नये, असें ज्ञानदेव म्हणत नाहींत. त्यांनीं स्पष्ट म्हटलें आहे:—

"जयां ऐहिक धड नाहीं । तयांचें परत्र पुससी काई।" ज्ञा.अ.४।१५५

इंद्रियें मारून टाकूं नयेत तर त्यांचा निग्रह करावा, असेंच त्यांचें मत आहे. पुढील ओवीवरून सामान्य मनुष्यानें कसें वागावें याविषयीं ज्ञानदेवांचें काय मत होतें तें कळून येईल. श्रीकृष्ण अर्जुनाला म्हणतात:–

" तुवां शरीरपरा नोहावें । कामनाजात सांडावें ।
मग अवसरोचित भोगावे । भोग सकळ ॥ " ज्ञा. अ. ३।१८८

पुढेंहि अठराव्या अध्यायांत इंद्रियनिग्रह करून ब्रह्मप्राप्ति करून घेतल्यावर साधक हा वैराग्याचें अंगत्राण किंचित् शिथिल करितो, असें त्यानीं म्हटलें आहे. अर्थात् अर्वाचीन नामधारी योग्याप्रमाणें तो अंगत्राण फेकूनहि देत नाहीं किंवा अतिशय बळकट असें बांधूनहि ठेवीत नाहीं. या बाबतींतील ज्ञानदेवांची कल्पना प्रसिद्ध ग्रीक तत्त्ववेत्ता प्लेटो यानें 'फीड्रस' या संवादांत मांडलेल्या कल्पनेशीं फारच जुळती आहे.

संत गुणातीत आणि म्हणूनच पापपुण्यातीत असतात, असें ज्ञानदेव मानतात. परंतु त्याचा अर्थ त्या स्थितीस प्राप्त होणाऱ्यांनीं स्वैराचरण करावें अथवा ही स्थिति प्राप्त होण्याचा मार्ग, रशियन् भोंदू साधु रासपुटीन

म्हणतो त्याप्रमाणें पापांतून आहे, असें मात्र ते समजत नाहींत. परमार्थास अंतःशुद्धीची अत्यंत आवश्यकता आहे; व त्याकरितां पुण्याच्या मार्गानेंच चाललें पाहिजे, असा ज्ञानदेवांचा आग्रह आहे. जे भगवत्पदाला पावले त्यांचें ज्ञानदेव खालीलप्रमाणें वर्णन करितातः—

" उजू एकनिष्ठेच्या पाउलीं । रगडूनि विकल्पाचिया भालीं । महापातकांची सांडिली । अटवी जिहीं ॥ मग पुण्याचे धांवा घेतले । आणि माझी जवळीक पातले ।..." ज्ञा. अ. ७।१७३–७४

ज्ञानदेव हे पुण्यापुण्य, विहिताविहित ठरविण्याच्या बाबतींत सर्वस्वीं वेदावर अवलंबून राहतातः—

" चावडिये न्यावो अन्यावो । निवडी वेदु ॥ " ज्ञा. अ. १६।२९५

" कार्याकार्यविवेकीं । शास्त्रेंचि करावीं पारखीं ॥ " ज्ञा.अ. १६।४६६

असें ते ठिकठिकाणीं प्रतिपादन करितात. शास्त्रमर्यादा पाळण्यासंबंधीं त्यांचा किती आग्रह आहे हें मागें त्यांच्या स्वतःच्या मौंजीबंधनानिमित्त पैठणास जाण्यावेळच्या प्रसंगांत त्यांचे जे उद्गार दिले आहेत त्यांवरून व्यक्त झालेंच आहे. असो. परमार्थाला जो लागला त्याच्याकरितां पहिला पाठ अथवा परमार्थाची पूर्वतयारी म्हणून त्यांनीं कर्ममार्गाचा उपदेश केला आहे. ज्ञानदेवांनीं लाविलेली गीतेची संगति अगदीं स्वतंत्र आहे. कांहीं संस्कृत-प्राकृत टीकाकार ज्याप्रमाणें गीतेची पहिली षडध्यायी म्हणजे कर्मकांड, दुसरी षडध्यायी उपासनाकांड व तिसरी ज्ञानकांड समजतात, तसें ज्ञानदेव समजत नाहींत. ते म्हणतातः–

" तरी पहिला जो अध्यावो । तो शास्त्रप्रवृत्तिप्रस्तावो ।... मोक्षदानीं स्वतंत्र । ज्ञानप्रधान हें शास्त्र । येतुलालें दुजीं सूत्र । उभारिलें ॥ मग अज्ञानें बांधलेयां । मोक्षपदीं बैसावया । साधनारंभु तो तृतीया–। ध्यायीं बोलिला ॥... हा तिजा अध्यावो जो देवें । निर्णय केला तें जाणावें । कर्मकांड येथ ॥... हेंचि ईश्वरी कर्मयोगें । भजनकथनाचें खागें । आदरिलें शेषभागें । चतुर्थाचेनी ॥ तें विश्वरूप अकरावा । अध्याय संपे जंव

आघवा। तंव कर्में ईशु भजावा । हें जें बोलिलें ।। तें अष्टाध्यायीं उघड। जाण येथें देवताकांड ।।... तो बारावा अध्याय आदी । आणि पंधरावा अवधी। ज्ञानफळपाकसिद्धि । निरूपणासी ।।... तयाचेनि साधन ज्ञानेंसीं । वैर करी जो प्रतिदिवशीं । तो अज्ञानवर्ग षोडशीं । प्रतिपादिजे ।। तोचि शास्त्राचा बोळावा । घेवोनि वैरी जिणावा । हा निरोपु तो सतरावा । अध्याय येथ ।।...तया अर्थजातां अशेषां। केला तात्पर्याचा आवांका । तो हा अठरावा देखा। कलशाध्यायो ।।'' ज्ञा. अ. १८।१४३५–५५

गीतेची संगति लावतांनासुद्धा .गीतेंतील कर्ममार्ग हा पारमार्थिक जीवनसोपानाची पहिली पायरी आहे, असेंच ज्ञानदेवांनीं म्हटलें आहे. कर्ममार्गाचें आचरण हा साधनारंभ आहे. सामान्यव्यवहाररत मनुष्य हा अहंकारारूढ, एकदेशीमूढ असतो; आणि यामुळें तो परमार्थसोपानाच्या ध्यानधारणादि वरच्या पायऱ्यांवर एकदम चढण्यास अपात्र असतो. जिलबी पुष्टिकारक खरी, परंतु सायासानें स्तन्यसेवन करणाऱ्या अर्भकाला ती दिल्यास हितकर होण्याऐवजीं ती घातकच होईल. तसेंच निकृष्ट अधिकाऱ्यास एकदम नैष्कर्म्य सांगणें म्हणजे जडान्न खाऊं घालून क्षयरोग्यास मारण्यासारखें आहे. म्हणूनच अशा अधिकाऱ्यास नैष्कर्म्यता लीलेनेंसुद्धा दाखवूं नये, असें ज्ञानदेवांचें स्पष्ट मत आहे.

अध्यात्मलाभाकरितां कर्तव्य असलेली गोष्ट म्हणजे अंतःकरणांतील कामक्रोधादिकांचा नाश करून कुवासनारूपी मळ धुवून बुद्धि स्वच्छ करणें ही होय. यास उत्तम उपाय म्हणजे निष्कामकर्माचें आचरण. ज्ञानदेव म्हणतात, "तीर्थें बाह्य मळु क्षाळे । कर्में अभ्यंतर उजळें । एवं तीर्थें जाण निर्मळें । सत्कर्मेंचि ।।"* ज्ञानदेवांच्या मतें भगवद्गीता हें एक अलौकिक अध्यात्मशास्त्र असून तींत मुख्यतः आत्मयोग सांगितला आहे. तथापि असें जरी त्यांचें मत आहे, तरी कर्ममार्ग हा साधनारंभ असल्यामुळें, " म्हणोनि

* ज्ञा. अ. १८।१६०

फळीं लागु । सांडोनी देहसंगु । कर्मैं करावीं...। "[1] हा जो भगवंतांचा दिव्य संदेश त्याचें ज्ञानदेवांनीं निरनिराळे दृष्टान्त देऊन फारच सुंदर मंडन केलें आहे.

ज्ञानदेवांची कर्ममार्गांची मीमांसा ज्यांना थोडक्यांत पाहावयाची असेल त्यांनीं " स्वे स्वे कर्मण्यभिरतः " गी. अ. १८।४५ हा व यापुढील तीन श्लोक यांवरील ओव्या अवश्य वाचाव्या. त्यांवरून त्यांना ज्ञानदेव शास्त्र-विहित कर्माचरणास किती महत्त्व देत होते तें कळून येईल. त्यांतील दोन-चार महत्त्वाच्या ओव्या खालीं देतोंः—

"हें विहित कर्म पांडवा । आपुला अनन्य वोलावा। आणि हेचि परम सेवा । मज सर्वात्मकाची ॥ पैं आघवाचि भोगेंसीं । पतिव्रता क्रीडे प्रियेसीं। कीं तयाचीं नामें जैसीं । तपें तियां केलीं ॥... तैसे आपलिया विहिता। उपायो असे न विसंबितां । ऐसा कीजे कीं जगन्नाथा । आभारु पडे ॥ अगा जया जें विहित । तें ईश्वराचें मनोगत। म्हणौनि केलिया निभ्रांत । सांपडेचि तो ॥ "[2] तसेंच " तया सर्वात्मका ईश्वरा। स्वकर्मकुसुमांची वीरा। पूजा केली होय अपारा। तोषालागीं ॥ "[3]

ज्ञानदेवांचें विशेष कौतुक जर कोठें करावेंसें वाटत असेल तर त्यांनीं तिसऱ्या अध्यायांत यज्ञाच्या कल्पनेची जी स्पष्टता केली आहे तिजविषयीं. त्यांच्याच शब्दांत सांगावयाचें तर यज्ञ अथवा स्वधर्म न करणें म्हणजे खालील गोष्टी न करणें होयः—" अग्निमुखीं हवन । न करील देवता-पूजन । प्रासवेळे भोजन । ब्राह्मणाचें ॥ विमुखु होईल गुरुभक्ती । आदरु न करील अतिथी । संतोषु नेदील ज्ञाती। आपुलिये ॥"[4] यज्ञाच्या कल्पनेचें असें व्यापक स्वरूप वर्णन करण्यांत ज्ञानदेवांनीं मोठी दूरदृष्टि दाखविली आहे यांत शंका नाहीं.

---

१ ज्ञा. अ. १८।१७६. २ ज्ञा. अ. १८।९०६-९११. ३ ज्ञा. अ. १८।९१७. ४ ज्ञा. अ. ३।१०५-६

येणेंप्रमाणें सर्वात्मक ईश्वरास स्वकर्मकुसुमें अर्पण करण्यानें त्याची मोठी पूजा होऊन तो संतुष्ट होतो व वैराग्यरूपी प्रसाद देतो. हें वैराग्य प्राप्त झालें म्हणजे मनुष्य ज्ञान अथवा ध्यान याच्या अभ्यासास योग्य होतो; व साधन म्हणून मग कर्मांचें फारसें महत्त्व राहत नाहीं. ज्ञानदेव हे ज्ञानकर्मसमुच्चयवादी नाहींत. कर्म हें स्वतंत्ररीत्या मोक्षास नेऊन पोंचवितें असेंहि त्यांचें मत नाहीं. तथापि कर्म टाकावें असेंहि ते कोठें म्हणत नाहींत. ज्ञानदेवांनीं कर्म घडण्याच्या व कर्म सुटण्याच्या मर्यादा सांगितल्या आहेत. आत्मा जोंपर्यंत दृष्ट झाला नाहीं तोंपर्यंत कर्म करण्याचें कसें थांबेल ![1] परंतु एकदा आत्मसंतुष्टता प्राप्त झाली कीं कर्म थांबलेंच पाहिजे. " तृप्ति जालिया जैसीं । साधनें सरतीं आपैसीं । देखे आत्मतुष्टीं तैसीं । कर्में नाहीं " ॥[2] परंतु याचा अर्थ कर्म टाकावें असा केव्हांच होत नाहीं. ज्ञानदेव म्हणतात कीं, मनुष्यानें विहित कर्मांचा त्याग केला तरी इंद्रियांचे व्यापार थोडेच थांबणार आहेत ? श्वासोच्छ्वासादिक कर्में तर सुरूच आहेत. शरीराचें कारण कर्म होण्यास्तव शरीर असेंपर्यंत कर्मांचा त्याग होणेंच शक्य नाहीं. " तैसा शरीराचेनि आभासें । नांदतु जंव असे । तंव कर्मत्यागाचें पिसें । काइसें तरी ॥ "[3] तसेंच, ज्ञानदेव म्हणतात कीं, जे प्राप्तार्थ झाले आहेत, त्यांनीं कर्माचरण अवश्य केलेंच पाहिजे. कारण, " हां गा ऐसें जरी न कीजे । तरी अज्ञानां काय उमजे । तिहीं कवणेपरी जाणिजे । मार्गातें या ॥"[4] ते म्हणतात, " विशेषें आचरावें । लागे संतीं ॥ "[5] साधक जसजसा देहतादात्म्य सुटून या आत्मलाभाजवळ येत जातो तसतसा त्याचा कर्मांचा भर कमी होतो; व आत्मलाभ झाल्यावर कर्म थांबतेंच. " फळली केळी उन्मळे । तैसी आत्मलाभें प्रबळें । जयांची क्रिया ढाळेंढाळें । गळती आहे ॥ "[6]

---

१ ज्ञा.अ. १८।९३५. २ ज्ञा.अ. ३।१४८. ३ ज्ञा.अ. १८।२२२. ४ ज्ञा. अ. ३।१५७. ५ ज्ञा. अ. ३।१५९. ६ ज्ञा. अ. १५।२८७

इतकें सांगितल्यावरसुद्धा हें सांगणें अवश्य आहे कीं, ज्ञानदेव मोक्षापर्यंत कर्म टिकतें असें मानीत नाहींत. कर्मारंभाकरितां अहंतेची आवश्यकता आहे; परंतु गुरुकृपामृततुषारानें सत्त्वशुद्धि झालेल्या अंतःकरणांत एकदा कां आत्मबोध सरसावला कीं ती नाहींशी होते. ती नाहींशी झाली कीं, द्वैताभाव होतो; व द्वैत आणि द्वैतमूलक कर्मच ब्रह्म होऊन जातें. मग कर्म करावयाचा आग्रह धरावयाचा कोणीं! अशा निष्कर्म आत्मस्थितीवर येणें हाच खरा कर्मसंन्यास. “ अगा करितेनवीण कर्म । तेंचि तें निष्कर्म । हें जाणती सुवर्म । गुरुगम्य जें ॥ ”[१] याशिवाय ज्ञानदेवांच्या मतें कर्म सुटण्याचा दुसरा उपायच नाहीं.

असो. उत्तम निष्कामकर्माचरणानें अंतःकरणांतील रजतमांचा भाग स्वच्छ धुवून काढणें हीच आत्मऋद्धि प्राप्त करून घेण्याची अगदीं प्रारंभीची तयारी होय. अशी नैतिक तयारी झाली कीं, श्रीगुरुदेव साधकाला स्वतःच येऊन भेटतात व त्याच्या अधिकाराप्रमाणें पुढील अभ्यास त्याला सांगतात. एके ठिकाणीं तर ज्ञानदेव म्हणतात कीं, देवच त्याचा मशालजी होतो व त्याला मार्ग दाखवितो !

नैतिक तयारी करीत असतां साधक यमानियमांचा अभ्यास करतोच. तसेंच आपल्या ठिकाणीं सिद्धाचीं लक्षणें आणण्याचाहि तो प्रयत्न करितो. कारण, सिद्धाचीं लक्षणें तींच साधकाचीं साधनें. ज्ञान उत्पन्न झालें असतां प्रकट होणाऱ्या लक्षणांच्या व ज्ञानांच्या उत्पत्तीस अथवा वाढीस विरुद्ध असणाऱ्या दोषांचें ज्ञानेश्वरीच्या तेराव्या अध्यायांत ज्ञानाज्ञानलक्षणें म्हणून व सोळाव्यांत दैवासुरसंपत्ति म्हणून ज्ञानदेवांनीं फारच सुंदर वर्णन केलें आहे. नैतिक तयारी पूर्ण करण्याकरितां अध्यात्मसाधक हा गुरूपदिष्ट आत्मानात्मविवेकरूपी तीर्थांत बुद्धीवरील दोषसंस्कारकीट झाडून टाकतो, व सैरा पदार्थांच्या सेवनानें विटाळलेलीं इंद्रियें ‘ सवासना ’ विषय ओकवून शुद्ध

१ ज्ञा. अ. ५।६३

करितो, आणि मग प्रत्याहाररूपी तीर्थावर त्यांना आणून तो शुद्धिकारक अशीं प्रायश्चित्तें करितो व तदनंतर सात्त्विक धैर्याचें साहाय्य घेऊन त्यांना मनासह योगाभ्यासाकडे लावतो. तात्पर्य, यमनियम व प्रत्याहार करून तो मुमुक्षु अभ्यासाची पूर्ण तयारी करितो.

इतकी तयारी झाल्यावर पुढील अभ्यास करण्याकरितां साधक गिरिकपाट अथवा निकुंज यांचें सेवन करितो. या अभ्यासाकरितां स्थान कसें असावें याचें सुंदर वर्णन ज्ञानदेवांनीं 'शुचौ देशे प्रतिष्ठाप्य' ह्या गीतेच्या सहाव्या अध्यायांतील ११ व्या श्लोकावर टीका लिहीत असतां केलें आहे, तें वाचकांनीं अवश्य वाचावें.[1] अशा स्थलीं तो आपला अवयवसमुदाय एवढाच कायतो सोबती घेऊन जातो; व हळूहळू आहारनिद्रादि शरीरभाव जिंकून बाह्य प्रदेश आपल्या कबज्यांत पूर्णपणें घेतो. नंतर तो ध्यानाचें आकाश आकळण्यास आरंभ करितो. साधकाचा हा ध्यानाचा प्रकार व त्याची मर्यादा ज्ञानदेव पुढीलप्रमाणें वर्णितातः—

"गुरुवाक्यें उठविला। बोधीं निश्चयो आपुला। न्याहाळीं हातीं घेतला। आरिसा जैसा॥ पैं ध्याता आपणचि परी। ध्यानरूप वृत्तिमाझारीं। ध्येयत्वें घे हे अवधारीं। ध्यानरूढी गा॥ तेथ ध्येय ध्यान ध्याता। ययां तिहीं एकरूपता। होय तव पंडुसुता। कीजे तें गा॥"[2] पण हें करीत असतांना त्यानें योगाभ्यासाचें पूर्ण साहाय्य घेतलेलें असतें. या मार्गानें साधक चालला असतां त्यास प्रतिभाश्रवण, दर्शन इत्यादि अनुभव कसकसे येतात याचेंहि ज्ञानेश्वरींत फार सुंदर वर्णन आलेलें आहे. वैराग्यरूपी वज्रकवच अंगांत घालून व राजयोगरूपी घोडयावर बसून साधक मोक्षलक्ष्मीला वरण्याकरितां निघतो; आणि मार्गांत अडविण्यास कोणी आलेंच तर त्याचें निराकरण करण्यासाठीं पाजळलेलें असें आत्मध्यानरूपी तीक्ष्ण खड्ग विवेकरूपी मुष्टींत तो नेहमी तयार ठेवतो. या ध्यानयोगासच ज्ञानदेव

---

१ ज्ञा. अ. ६।१६३–८१. २ ज्ञा. अ. १८।१०३२-३४

' पंथराज ' म्हणतात. गीताध्याय ६, श्लो. १२-१५ यांत त्यांस त्यांचें बीज प्राप्त झाल्यामुळें त्यांनीं तेथें 'पिंडेपिंडाचा ग्रास' ह्या नाथपंथांतील रहस्याचें सविस्तर वर्णन केलें आहे, तें मुमुक्षूंनीं पाहावें. येथें एक गोष्ट अवश्य ध्यानांत ठेविली पाहिजे कीं, ज्ञानदेव जरी यास 'पंथराज' म्हणत असले तरी गीतेंत तो मुख्यत्वें प्रतिपाद्य आहे, असें ते म्हणत नाहींत. उलट, गीतेंत त्याचें केवळ दिग्दर्शन असून आपणच ही संधि साधून त्याचें सविस्तर वर्णन केलें आहे, असें ते स्पष्ट सांगतात.

वर सांगितल्याप्रमाणें या संसाररणांतून मोक्षश्रीला वरण्यास साधक जात असतां त्याचा मार्ग अडविण्यास शत्रु उभे राहतातच, पण हा शूर योद्धा आपल्या ध्यानखड्गानें या अहंकारादि षड्रिपूंचा नायनाट करितो व संसारावर अलौकिक विजय मिळवितो. अशा रीतीनें एकदा कां त्यानें शत्रुनिःपात करून पराक्रम दाखविला कीं, अमानित्वादि ज्ञानगुण हेच कोणी कैवल्य-देशांतील मांडलिक राजे या चक्रवर्तीस आपआपला करभार देण्यास पुढें येतात. ह्या विजिगीषूची स्वारी निघाली कीं, प्रवृत्तीच्या राजमार्गांत जाग्रतादि तिन्ही अवस्था याच कोणी प्रमदा त्याजवरून सुखाचें लोण उतरवितात; विवेकरूपी भालदार बोधरूपी काठीनें दृश्य समुदाय दूर करतात; आणि योगभूमिका जणूं आरत्या करण्याकरितां पुढें येतात. अशा समयीं त्याला प्राप्त होणाऱ्या अनेक ऋद्धिसिद्धि हीच जणूं त्याजवर पुष्पवृष्टि होते. येणें-प्रमाणें तो विजयी वीर स्वराज्याजवळ येत चालल्यानें जिकडेतिकडे आनंदी-आनंद होतो. त्यास आतां शत्रुच काय, पण मित्र म्हणण्यालासुद्धा त्याहून वेगळें कोणी राहिलें नाहीं,असली त्याची एकट्याची अकुंठित सत्ता प्रस्थापित होते. इतकें झाल्यावर मात्र आपोआपच योगतुरगास स्थिरता प्राप्त होते व तो स्वार वैराग्याचें अंगत्राण किंचित् शिथिल करितो. परंतु लक्षांत ठेवण्या-सारखी गोष्ट ही कीं, अद्यापि त्यास ब्रह्मैक्यता प्राप्त झालेली नाहीं. तथापि ब्रह्म होण्याच्या जवळजवळ तो आला आहे. आतां त्याच्यांत व ब्रह्मांत चतुर्दशीचा चंद्र आणि पौर्णिमेचा चंद्र यांच्या एवढेंच काय तें अंतर आहे.

आतां त्यास आणखी निराळें साधन म्हणून करण्याची आवश्यकता नाहीं. अन्न हें उष्णतेनें शिजून तयार होतें; तथापि जेव्हां तें तयार होतें तेव्हां कढत असतें. त्या वेळेस तें शिजलेलें असलें तरी तोंडांत घालतां येत नाहीं. पण तेंच थोडेंसें निवूं दिलें कीं, 'प्रसन्न' होतें. तसेंच आत्मबोध प्राप्त होण्याकरितां दृढ प्रयत्न करतांना होणारे श्रमहि जेव्हां शान्त होतात, त्याच वेळेस खरोखर तो साधक 'ब्रह्म' या भावास अथवा 'आत्मबोधप्रशस्ति' या स्थितीस प्राप्त होतो.

ब्राह्मी स्थितीचें वर्णन करण्याची ज्ञानदेवांची एक ठराविक पद्धत आहे. ती थोडक्यांत अशी. जागृति, स्वप्न, सुषुप्ति या तिन्ही अवस्थांना पोटांत घालणारें 'अहं ब्रह्मास्मि' वृत्तिज्ञानहि ज्या ठिकाणीं नाहींसें होतें; ऐक्याचा एकपणा जेथें संपतो; वृत्तिगत आनंदकणहि जेथें विरतो; फार काय सांगावें, जें कांहीं न उरतां शिल्लक असतें तें तें.[1] तें नाहीं म्हणण्याची सोयच नाहीं. कारण, तो तर शून्यवादच होईल. तें आहे, परंतु शब्दानें तें काय आहे हें सांगतां येण्यासारखें नाहीं. त्यांनींच म्हटल्याप्रमाणें, "तैसें द्रष्टा दृश्य हें जाये । मग कोण म्हणे काय आहे । हेंचि अनुभवें तेंचि पाहे । रूप तयां ॥[2]" एवंगुणविशिष्ट (वास्तविक ती स्थिति निर्गुण आहे, पण व्यवहाराकरितां असें म्हटल्याशिवाय गत्यंतर नाहीं) "सोऽहं तेंही अस्तवलें । जेथ सांगतेचि सांगणें जालें । द्रष्टत्वेंसी गेलें । दृश्य जेथ ॥"[3] अशी जी निर्धर्म, निरुपाधिक स्थिति, तिलाच ज्ञानदेव 'ब्रह्म' या नांवानें संबोधितात व असें होणें म्हणजेच ब्रह्म होणें म्हणून म्हणतात. यासच ज्ञानदेवांच्या दृष्टीनें गीतेंत उत्तमपुरुष (अ. १५), नैष्कर्म्यसिद्धि (अ. १८), अधियज्ञ (अ. ८) इत्यादि निरनिराळीं नांवें दिलेलीं आहेत. ज्ञानदेवांच्या मतें याच्या पलीकडे साधकास मिळविण्याचें कांहीं राहिलें नाहीं, "सा काष्ठा

१ ज्ञा. अ. १८।१००४-५. २ ज्ञा. अ. १५।५४४. ३ ज्ञा. अ. १५।५४१

सा परागतिः । ". ही आत्मसिद्धि श्रीगुरुकृपालब्धि झाली असतांनाच भाग्यवान् साधकास प्राप्त होते. या स्थितीस प्राप्त झालेला पुरुषच पूर्ण ज्ञानी, खरा भक्त, श्रेष्ठ योगी व पहिल्या प्रतीचा कर्मयोगी होय. गीतेंत ज्याला स्थितप्रज्ञ अथवा गुणातीत म्हटलें आहे तो हाच. ज्ञानदेवांच्या मतें गीतेंत ज्ञान, भक्ति, योग व कर्म या सर्वांचा फारच सुंदर रीतीनें समन्वय करण्यांत आलेला आहे. या आत्मैक्यस्थितीस (पाश्चात्य परिभाषेंत हिला unitive life असें म्हणतात ) पावलेल्या ज्ञानी पुरुषाच्या सहज-समाधिस्थितीचें चित्र ज्ञानदेवांनीं जितक्या कुशलतेनें रंगविलें आहे तितकें इतरत्र क्वचितच आढळेल ( गीताध्याय १८ श्लोक ५५ वरील ज्ञानेश्वरीचें व्याख्यान व अमृतानुभव प्रकरण ९ वाचकांनीं अवश्य पाहावें ). ज्ञात्याच्या ठिकाणचें द्वैत नाहींसें झाल्यामुळें त्याला आतां 'भय' हा शब्दच उरला नाहीं. "...सर्वत्र सच्चिदानंदु । मीचि एकु स्वतःसिद्धु । "[१] हा अनुभव प्राप्त झाल्यामुळें आतां त्यास यापलीकडे ज्ञानानें आणखी कांहीं मिळविणें शिल्लक राहिलें नाहीं; म्हणूनच तो पूर्ण ज्ञानी. विषयाचा संबंध होऊन इंद्रियें त्याकडे धांवली असतां ज्ञात्याला विषयस्फूर्तिच होत नाहीं. या अवस्थेस प्राप्त झाल्यामुळें 'सर्वत्र पुरुषोत्तम' ही स्थिति तो अनुभवितो व म्हणूनच तो चौथ्या म्हणजे ज्ञानी भक्तीचा अनुभव घेतो. ज्ञानदेव म्हणतात, "ज्ञानी इयेतें स्वसंविति । शैव म्हणती शक्ति । आम्ही परम भक्ति । आपुली म्हणों ॥ "[२]; "हें त्रैलोक्याचि पुरुषोत्तमु । ऐसा साचु जयांचा मनोधर्मु । "[३]; अथवा "वासुदेवः सर्वमिति "[४] असा ज्याचा अनुभव तोच खरा भक्त. जसें आपलेंच रूप आरशांत प्रतीत व्हावें तसें आपणच त्याला प्रतीत होतो. आतां तो अद्वय, अभय या स्थितीस प्राप्त झाला.

तरंग जसा सर्वांगानें पाण्याशीं समरस असतो, तसा परमात्मस्वरूपाशीं

---

१ ज्ञा.अ. १५।५६२. २ ज्ञा.अ.१८।११३३. ३ ज्ञा.अ.८।१९३.
४ गी. अ. ७।१९

समरस झालेला हा पुरुष जें जें करितो तें तें नारायणासच समर्पित होतें. असा भक्त सर्वांगानें परमेश्वरास भजतो. " जीवु परमात्मा दोन्ही । बैसले ऐक्यासनीं । जयाचिया हृदयभुवनीं । विराजती ॥"[१] म्हणूनच तो श्रेष्ठ योगी. या योगाची ही मौज आहे कीं, याची सहजसमाधि बोलतांना, चालतांना, निजतांना अखंड चालूच असते; तिला भंगच नाहीं. ज्ञानदेव म्हणतात कीं, कर्माचरणांत जर समाधि बिघडत असेल तर ती खरी समाधिच नव्हे. या बाबतींत त्यांचें असें झालें कीं, " व्यापाराचे गाडे । मोडतांहि अपाडे । अक्रियेचें न मोडे । पाऊल कैंही ॥"[२]

या स्थितींत त्याचे व्यापार बंद पडत नाहींत. "मुक्ताचे देह तैसें। हालत संस्कारवशें ।"[३]. कारण, ज्ञानी झाला म्हणजे कांहीं तो आंधळा होत नाहीं,कीं त्याच्या डोळ्यांचे व्यापार बंद पडतील; तो कांहीं बहिरा होत नाहीं, कीं त्याच्या कानांचे व्यापार बंद पडतील. तो लुळापांगळासुद्धा होत नाहीं, कीं त्याच्या हातापायांचे व्यापार बंद पडतील. त्याचा सर्व स्थूलसूक्ष्मसंघात टवटवीत असल्यानें त्याचा क्रियाकलाप आघवा सुंदर सुरू असतो. उलट मोहनिरास झाल्यामुळें तो प्राप्त कर्म अव्हेरीतच नाहीं. अशा सिद्धाकडून लीलेनें घडलेल्या कर्मानेंहि नीति जगते; आणि मौज ही आहे कीं, या सर्व क्रिया चालू असतां कर्मच ब्रह्म होणें अशा उच्च प्रतीतीस तो पोंचलेला असल्यामुळें तो स्वतः मात्र कर्ताच होत नाहीं; व म्हणूनच आतां हा पूर्ण निष्काम कर्मयोगी ( super-moralist ) बनला. " आणि तयां करणेयाआंतु । घडो तिहीं लोकां घातु । परी तेणें केली हे मातु । बोलोंचि नये ॥"[४] गीतेच्या द्वारा श्रीकृष्णांनीं अर्जुनाला, ज्ञानदेवांच्या दृष्टीनें, हीच ब्राह्मी स्थिति प्राप्त करून दिली. ज्ञानदेवांच्या भाषेंत बोलावयाचें म्हणजे अर्जुनास ' स्वानंदसम्राट् ' भगवंतांनीं बनविलें; व

---

१ ज्ञा.अ.१२।१५३. २ अमृतानुभव प्र. ९।२१. ३ ज्ञा.अ.१८।४४७
४ ज्ञा. अ. १८।४४८

असा समाधिस्थ करून त्याजकडून युद्ध करविलें, हेंच ज्ञानदेवांच्या दृष्टीनें गीतेचें सार होय.

असल्या ह्या सिद्धावस्थेस प्राप्त होणें म्हणजेच गुणातीत होणें. ज्ञानदेवांनीं ज्ञानेश्वरीच्या चौदाव्या अध्यायांत गुणातीताचेंहि फार सुंदर वर्णन केलें आहे. त्यांच्या मतें ही स्थिति प्राप्त करून घेणें हेंच मनुष्यजन्माचें ध्येय असून नैतिक व धार्मिक आचरणाचें अंतिम साध्यहि तेंच होय.

ज्ञानदेवांचें ध्येय कर्मप्रधान ( activistic ) होतें कीं ध्यानप्रधान ( contemplative ) होतें याचा निर्णय वरील वर्णनावरून आपोआपच स्पष्ट होणार आहे. ज्ञानदेवांच्या दृष्टीनें या दोन ध्येयांत विरोधच नाहीं. उत्तम क्रियाकारित्व येण्याकरितां या ब्राह्मी स्थितीची आवश्यकता असून ज्ञात्या पुरुषानें आपण पूर्ण झालों तरी कर्म करीत राहावें हें चांगलें, असा त्यांचा सात्त्विक आग्रह आहे; आणि तो "विशेषें आचरावें। लागें संतीं ॥"[१]; " जे पुरुषार्थसिद्धि चौथी । घेऊनि आपुलिया हातीं । रिगाला भक्तिपंथीं । जगा देतु ॥ "[२]; " जीवन्मुक्त ज्ञानी जरी झाले पावन। तरी देवतीर्थभजन न संडिती ॥ "[३] इत्यादि त्यांच्या वचनांवरून उघड होत आहे. प्लेटोनें आपल्या 'रिपाब्लिक्' मध्यें सातव्या पुस्तकाच्या प्रारंभीं गुहेंतील मनुष्याचा दृष्टान्त देऊन ज्ञात्या पुरुषानें कर्म करावें हें जसें सांगितलें, अगदीं तसेंच पण आपल्या संस्कृतीशीं जुळणारें व आपल्या व्यवहारांत नित्यशः आढळून येणारें उदाहरण देऊन ज्ञानदेवांनींहि सांगितलें आहे. ते म्हणतात, " मार्गीं अंधासरिसा । पुढें देखणाही चाले जैसा । अज्ञाना प्रकटावा धर्मु तैसा । आचरोनि ॥ "[४]

ज्ञानदेव हे ज्ञानी असूनहि भक्त कसे होते, हें अद्वयानंदानुभवावर प्राप्त झाल्यानंतर देखील ज्ञानी पुरुषास सगुण परमात्म्याची सेवा करावी अशी

---

१ ज्ञा. अ. ३।१५९. २ ज्ञा. अ. १२।२१९. ३ नामदेव अ. ९१४
४ ज्ञा. अ. ३।१५६

इच्छा कशी होते आणि ती झाल्यावर हा ज्ञानी भक्त देव तयार करून त्यास कसा भजतो, यांचें जें अतिशय मार्मिक विवेचन अमृतानुभव प्रकरण ९, ज्ञानेश्वरी अध्याय १२ व त्यांचे स्वतःचे कांहीं अभंग यांत त्यांनीं केलें आहे त्यावरून आढळून येईल. ही गोष्ट मुळांत ध्यानीं न आल्यानेंच दोन ज्ञानदेव कल्पिण्याकडे कित्येकांची प्रवृत्ति होते. असो. ज्ञानदेवांचें तत्त्वज्ञान, नीति व अध्यात्म यांचा वरीलप्रमाणें विचार केल्यास तें सर्व सुसंगत व अनुभवाच्या भक्कम पायावर कसें उभारलेलें आहे, हें वाचकांच्या लक्षांत येईल. आतां पुढील उपसंहारांत या आध्यात्मिक तत्त्वज्ञानाचा ज्ञानदेवांनंतरच्या महाराष्ट्रावर काय परिणाम झाला तें पाहूं.

---

# प्रकरण सातवें

## उपसंहार

ज्ञानदेवांच्या ग्रंथांचा महाराष्ट्रीय वाङ्मयावर, मुख्यतः आध्यात्मिक वाङ्मयावर व महाराष्ट्रीय तत्त्वज्ञानावर कधींहि न पुसटणारा असा चिरंतन संस्कार झालेला आहे. महाराष्ट्राच्या ग्रंथसंपत्तींत भर घालणारे ज्ञानदेवांचे समकालीन नामदेव–जनाबाई आदिकरून संतकवि, तसेंच त्यांच्यानंतर झालेले एकनाथ–दासोपंत, तुकाराम–रामदास, मुक्तेश्वर–मोरोपंतादि संत व कवि हे सर्व ज्ञानदेवांस ‘ ज्ञानाचा आगर ’ समजतात व त्यांचे ज्ञानेश्वर्यादि ग्रंथ महाराष्ट्र–सारस्वतांत ‘ गुरुवतीच्या ठायीं ’ बसण्यायोग्य आहेत असें जाणून त्यांच्यापुढें आपलीं मस्तकें नमवितात, एवढा ज्ञानदेव व त्यांचे ग्रंथ यांचा महाराष्ट्रीय सारस्वतभक्तांत असाधारण मान आहे.

ज्ञानदेवांच्या प्रभावळींतील नामदेव हे तर ज्ञानदेवशिष्य विसोबा खेचर यांच्या द्वारा नाथपरंपरेंतच समाविष्ट झाले होते. अशा रीतीनें ज्ञानदेव

हे नामदेवांच्या गुरूचे गुरू. ज्ञानदेवांचें जें चरित्र आज उपलब्ध आहे त्यास नामदेवकृत आदि, तीर्थवळि व समाधि नामक अभंग हेच मुख्यत्वें आधारभूत आहेत. शिवाय नामदेवांच्या कांहीं अभंगांमध्यें ज्ञानदेवांच्या अद्वैततत्त्वज्ञानाचा परिणाम झालेला स्पष्ट दृग्गोचर होतो. पैठणकर एकनाथांच्या ग्रंथांवर ज्ञानदेवांच्या ग्रंथांचा इतका मोठा परिणाम झालेला दिसून येतो कीं, कित्येक भाविक लोक एकनाथांस ज्ञानदेवांचा अवतार समजण्यासहि कमी करीत नाहींत; आणि वस्तुतः पाहतां नाथांचें 'भागवत' म्हणजे कल्पना, शब्द व मांडणी या सर्व दृष्टींनीं ज्ञानेश्वरीची विस्तारून काढलेली सुलभ आवृत्तिच होय, असें म्हणावयास हरकत नाहीं. नाथांनींच शके १५०६ तारणनाम संवत्सरांत पाठांतरानें शुद्धावद्ध झालेली ज्ञानेश्वरीची प्रत शुद्ध केली व तिच्या अभ्यासास जोराची चालना दिली. भागवत-धर्ममंदिराचे कळस जे तुकोबा त्यांच्याहि अभंगांवर जसा एकनाथांच्या, तसाच ज्ञानदेवांच्याहि ग्रंथांचा परिणाम झालेला दृष्टोत्पत्तीस येतो. रंगनाथकृत चित्सदानंदलहरी म्हणजे ज्ञानेश्वरींतील ओव्यांच्या ओव्या घेऊन केलेली ओव्यात्मक टीका आहे.

अशा रीतीनें ज्ञानदेवांनंतर झालेल्या अनेक लहानथोर संत कवींवर ज्ञानदेवांच्या ग्रंथांचा कसा परिणाम झाला आहे हें बरींच उदाहरणें देऊन सविस्तर दाखवितां येणें शक्य आहे. परंतु स्थलसंकोचास्तव एवढेंच सांगणें पुरे कीं, महाराष्ट्रियांनीं ज्ञानेश्वरी अतिशय आत्मसात् केलेली असून ज्ञानदेवांचे दृष्टान्त व त्यांच्या कल्पना ही महाराष्ट्र-सारस्वतभांडारांत एकजीव होऊन सर्वतोमुखीं झालीं आहेत. ज्ञानदेवांस महाराष्ट्रभूमीवर अवतीर्ण होऊन सहाशेंवर वर्षें लोटलीं तरी आजमितीसहि महाराष्ट्रांत अध्यात्म, नीति व व्यवहार यांचा प्रसार करणाऱ्या हरिदासांच्या कथा त्यांच्या ओवीवांचून क्वचितच झालेल्या आढळतील.

ज्ञानदेवांच्या अद्वैततत्त्वज्ञानाचीहि महाराष्ट्रीय तत्त्वज्ञानावर मोठी छाप पडलेली आहे. ज्ञानदेवांचे ग्रंथ हे महाराष्ट्रास गेलीं सहाशें वर्षें आध्यात्मिक

जीवनाचा पुरवठा करीत आहेत. ज्ञानदेव हे मोठे स्वतंत्रप्रज्ञ पंडित व साधु. त्यांचें अध्यात्महि भावनेपेक्षां बुद्धीवर जोर देणारें; व त्यांनीं महाराष्ट्रभूमंडळांत अध्यात्माचा प्रसार होण्याकरितां ज्याचा आधार घेतला तो ग्रंथ म्हणजे युद्धरूपी कर्तव्य टाकून रणांगणांतून विषण्ण मनानें परत जाऊं पाहणाऱ्या धनंजयास कर्तव्योन्मुख करणारी भगवद्गीता. या कारणसमुच्चयाचा महाराष्ट्रावर असा एक बलवत्तर संस्कार झालेला आहे कीं, महाराष्ट्रियाची वेदादिकांवर श्रद्धा आहे, परंतु तो अंधश्रद्धेनें बुद्धीच्या स्वतंत्र शिकवणीस पारखा होत नाहीं. यामुळें कालपरत्वें तो 'कसें करूं, काय करूं ?' या अष्टाक्षरी मंत्राचा जप करील तर पुनश्च आयुधें घेऊन उठलेलाहि दिसेल.

ज्ञानदेवांच्या नाथसंप्रदायाचें वैशिष्ट्य राखणारे असे कांहीं शाखाभेद आजहि महाराष्ट्रांत उपलब्ध आहेत. परंतु ज्ञानदेवांच्या अद्वयानंदवैभवास आत्मसात् करून, ज्ञानदेवांच्या ग्रंथांचें पठनपाठन करून, ज्ञानदेवांस आपली गुरुमाउली समजून, ज्ञानदेवांचें ग्रंथ व त्यांचें तत्त्वज्ञान हीं मोठ्या प्रमाणावर जर आजकाल कोणीं जिवंत ठेविलीं असतील तर ती पंढरपुरच्या भागवतधर्मी ऊर्फ वारकरी पंथानें. या पंथावर, ज्ञानदेवांच्या ग्रंथांत आढळून येणारा भक्तिज्ञानाचा अपूर्व मिलाफ व 'माझें जिवींची आवडी। पंढरपुरा नेईन गुढी' म्हणून त्यांनीं केलेली पंढरपुरच्या श्रीपांडुरंगाची वारी यांचा मोठा परिणाम झालेला आहे.

थोर आत्मानुभवाच्या भरभक्कम पायावर अधिष्ठित असें पूर्णाद्वैती तत्त्वज्ञान व ज्ञानदेवांच्या सारख्या रसाळ भाषेंत तें मांडलें गेलें. मग त्याच्या गोडीनें जन वेडावून न गेले तरच आश्चर्य ! यामुळेंच ज्ञानदेवांनंतर महाराष्ट्रांत तत्त्वज्ञानाची वाढ अशी फारच थोडी दृष्टीस पडते. त्यांच्या मागून झालेल्या तत्त्वज्ञानी साधूंनीं प्रायः त्यांच्याच कल्पना लोकांस समजतील अशा विस्तृत व अधिक सुलभ रीतीनें सांगितल्या. कित्येक वेळां कोणीं सगुणावरच जोर द्यावा, कोणीं कर्मांवरच जोर द्यावा, कधीं कोणीं नुसत्या पांडित्यावरच जोर द्यावा, असें झालेलें आपणांस ज्ञानदेवानंतरच्या महाराष्ट्रीय तत्त्वज्ञानाच्या

इतिहासांत आढळून येतें. परंतु भक्ति, कर्म व ज्ञान यांच्या अध्यात्मभूमिकेवरून समन्वय करणाऱ्या ज्ञानदेवांच्या ग्रंथांचें वजन मुळापासून जें अढळ आहे तें कायमचेंच. महाराष्ट्रियांची मनोभूमिका इतस्ततः आंदोलनें घेत पुनः त्या समन्वयभूमिकेवरच येऊन बसते. सारांश, ज्ञानदेवांचे ग्रंथ जोंपर्यंत हयात आहेत तोंपर्यंत महाराष्ट्रास आध्यात्मिक जीवनाकरितां दुसऱ्याच्या तोंडाकडे पाहण्याचें कारणच नाहीं.

मराठी भाषेची सेवा तर ज्ञानदेवांनीं आपल्या 'अमृताला जिंकणाऱ्या बोलांनीं' अपरंपार केली आहे. मराठी भाषा किती श्रीमंत आहे हें ज्ञानेश्वरीसारखा अलौकिक व सुंदर अध्यात्मग्रंथ निर्माण करून त्यांनीं जगासमोर कायमचें सिद्ध केलें आहे. खरोखर, ज्ञानेश्वरी हा असा एक अपूर्व ग्रंथ आहे कीं, त्याचा मुळांतून आस्वाद घेण्याकरितां तरी परकीयांनीं मराठीचा अभ्यास करावा. अर्थात् मराठी भाषेस सदैव ललामभूत झालेला हा अमूल्य ग्रंथ प्रसवून ज्ञानदेवांनीं मराठीस अजरामर केलें आहे.

तात्पर्य, ज्ञानदेवांच्या मराठी ग्रंथरचनेचा व त्यांनीं तद्वारा प्रसृत केलेल्या अद्वैततत्त्वज्ञानाचा महाराष्ट्रियांच्या प्रत्यक्ष आचारविचारांवर जो महत्त्वाचा परिणाम झालेला दिसून येतो तो येणेंप्रमाणें. पहिली गोष्ट ही कीं, ज्ञानदेवांनीं धर्मरहस्यभूत जें अध्यात्म तें महाराष्ट्राच्या कोनाकोपऱ्यापर्यंत नेऊन पोंचविलें आणि त्यामुळें सर्व आचाण्डाल जनांस अध्यात्मजीवन सुलभ झालें. दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हटली म्हणजे, याच शिकवणुकीमुळें महाराष्ट्रावर मुसलमानांच्या स्वाऱ्या होऊनहि येथें वैदिक धर्माचा पाया बळकट राहिला. तसेंच महाराष्ट्रांत शैववैष्णवांचा कलह न माजण्याचें कारणहि ज्ञानदेवांनीं प्रसृत केलेला भागवतधर्म हेंच होय. शेवटचा संस्मरणीय परिणाम हा कीं, ज्ञानदेवांनीं जनतेंत मराठी भाषेविषयीं नितान्त प्रेम उत्पन्न केलें. त्यामुळें महाराष्ट्रांत परकीय भाषा बोलणारे राज्यकर्ते अनेक झाले तरी मराठी भाषा चांगली जिवंत राहिली.

असो. येणेंप्रमाणें ज्ञानदेवांनीं जें महत्कार्य केलें तें कोणत्या प्रेमानें केलें हें त्यांनीं आपल्या सद्गुरूजवळ ग्रंथसमाप्तीनंतर जें 'पसायदान' मागितलें आहे त्यावरून कळून येणारें आहे. तेव्हां सरतेशेवटीं तें त्यांच्याच शब्दांत खालीं उद्धृत करून ही अत्यल्प वाङ्मयसेवा त्यांच्या चरणीं विनम्रभावें समर्पितोंः—

" आतां विश्वात्मकें देवें । येणें वाग्यज्ञें तोषावें । तोषोनि मज द्यावें । पसायदान हें ॥ जे खळाची व्यंकटी सांडो । तया सत्कर्मीं रती वाढो । भूतां परस्परें पडो । मैत्र जीवाचें ॥ दुरिताचें तिमिर जावो । विश्व स्वधर्म-सूर्ये पाहो । जो जें वांछील तो तें लाहो । प्राणिजात ॥ वर्षत सकळ-मंगळीं । ईश्वरनिष्ठांची मांदियाळी । अनवरत भूमंडळीं । भेटो तयां भूतां ॥ चलां कल्पतरूंचे अरव । चेतनाचिंतामणीचे गांव । बोलते जे अर्णव । पीयूषाचे ॥ चंद्रमे जे अलांछन । मार्तंड जे तापहीन । ते सर्वांही सदा सज्जन । सोयरे होतु ॥ किंबहुना सर्वसुखीं । पूर्ण होऊनि तिहीं लोकीं । भजिजो आदिपुरखीं । अखंडित ॥ आणि ग्रंथोपजीविये । विशेषीं लोकीं इयें । दृष्टादृष्टविजयें । होआवें जी ॥ येथ म्हणे श्रीविश्वेशरावो । हा होईल दानपसावो । येणें वरें ज्ञानदेवो । सुखिया झाला ॥ "

ज्ञा. अ. १८।१७९३-१८०१

REFBK-0004616

समाप्त

४६१६

# विषयसूचि

अमृतानुभव--रचना स्थलकाल ६२; ज्ञानेश्वरी-अमृतानुभवांतील फरक ९५; स्वमतसिध्यर्थ रचना ९५; मायावादाविषयीं स्पष्ट मत ९९; आत्म्याची कल्पना १०१

**ज्ञानदेवकालीन महाराष्ट्र-राजकीय** देवगिरीचे यादव व तत्कालीन सुवत्ता ३-८; धार्मिक ८-२६; अवैदिक पंथः जैन, लिंगायत, महानुभाव इ. १०-१४; वैदिक पंथः रामानुजपंथ १४-१५, नाथपंथ २२-२३, भागवत ऊर्फ वारकरीपंथ २३-२६, ११९; अहिंसातत्त्व १०-११, १६-१९; वाङ्मयिक २६-२७

**ज्ञानदेवचरित्र**—गुरुसंप्रदाय २८-३४; कुलपरंपरा ३५-४६; वंशावळ ३६; चार भावंडें—जन्म-शक, तिथि ४८-५०; विद्या-संस्कार, तपश्चर्या व सद्गुरुभेट ५१-५२; कुटुंबाचा छळ व पैठणचें शुद्धिप्रकरण ४७-६०; चांगदेवभेट ६२-६३; तीर्थयात्रा ६३-६५; समाधि ज्ञानदेवादि भावंडांची ६५-६७

**ज्ञानदेवांचा महाराष्ट्रावर परिणाम**-धार्मिक, आध्यात्मिक व वाङ्मयिक ११७-१२१

**ज्ञानदेवांची ग्रंथरचना**—६७-७९; ज्ञानदेव एक कीं दोन ! ६९-७२

**ज्ञानदेवांचें कवित्व**-८१-९६; सत्-काव्याची व्याख्या ८१; रसविचार ८२-८४; शब्दालंकार, अर्थालंकार ८४-८५; उपमा, दृष्टांत ८५-९०; रूपकें ९०-९२; काव्याचे विशेष ९२-९५; काव्याचें महत्त्व ९५-९६

**ज्ञानदेवांचें तत्त्वज्ञान व अध्यात्म**-९६-११७. तत्त्वज्ञान ९६-१०४; नीति व अध्यात्म १०४-११६; ज्ञानदेव नाथपंथी पूर्णाद्वैती, पूर्णाद्वैताचें स्वरूप ९६-९७; वेद-प्रामाण्य व वैदिकधर्म १४-१७; १०५-१०६; ज्ञानदेव व गौडपादाचार्य १०१-०३; ज्ञानदेव व शंकराचार्य ९७-१०३; ज्ञानदेव व रामानुजाचार्य १४-१५; १०३-१०४; ज्ञानदेव व वल्लभाचार्य १०४; यज्ञाची कल्पना १०८; 'ध्यानयोग' अथवा 'पंथराज' ११०-१३; ज्ञानदेवांच्या दृष्टीनें गीतासंगति व सारः 'आत्मबोध-प्रशस्ति,' ज्ञानी भक्तीचा अनुभव ११३-१६; ज्ञानदेवांचें ध्येय कर्मप्रधान कीं ध्यानप्रधान ! ११६-११७

ज्ञानेश्वरी—रचनास्थल व काल ६१; पहिला ग्रंथ ७९